IRBK-0100669

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ६६९

IRBK-0100669
IRBK-0100669

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

श्रीजनता-जनार्दनाय नमः

# सौभाग्य-लक्ष्मी

लेखक

रा० रा० सदाशिव अनंत शुक्ल

संगीत-'सम्राट् कोण?' 'शापित सिंहासन!' 'दहावा ग्रह' 'एकशेंपांच' 'न्यायाचें नाटक' 'सतीचा सत्याग्रह' इ. नाटकांचे कर्ते

आवृत्ति पहिली

सन १९२५

IRBK-0100669

किं० १ रुपया.

प्रकाशक—
शंकर रामचंद्र सरनाईक डायरेक्टर—
यशवंत संगीत नाटक मंडळी,
किर्लोस्कर थिएटर, पुणें शहर.

* * * *

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यांनें आपल्याकडे राखून ठेविले आहेत.

* * * * *

मुद्रक—
रा. रा. शंकर नरहर जोशी.
१०२६ सदाशिव पेठ, 'चित्रशाळा' प्रेस,
पुणें शहर.

# समर्पण

जनता-जनार्दना !

भाग्यशाली भारतवर्षाच्या भावी भाग्योत्कर्षा-
साठीं राक्षसी रूढीचे लोखंडी लंगर ताड-
कन् तोडून सुधारणेच्या सरहद्दीवर
समतोल बुद्धीनें सरसावलेल्या,सत्य-
शील-धर्म न्यायादि स्वर्गीय सद्गुण-
सौंदर्याच्या शृंगारसाजानें सज-
लेल्या समाज-स्वरूप सर्वे-
श्वरा ! तुझ्याच महन् मंगल
पवित्र पद-कमलीं ही
कृति सप्रेम सादर
समर्पण असो.

ग्रंथकर्ता.

# आत्मनिवेदन

नाट्यप्रदेशांत स्वतंत्र नाटककार म्हणून पहिलें पाऊल टाकतांना या प्रसंगीं हा अल्पमति नवखा प्रवासी रसिकजनांच्या तीक्ष्ण आणि मार्मिक दृष्टीबरोबरच त्यांच्या सहृदयतेकडेंही तितक्याच आशेनें पहात आहे.

आतां खुद्द नाटकासंबंधीं मला कांहींच सांगावयाचें नाहीं पण एवढें मात्र सांगावेसें वाटतें कीं या नाटकांत रंगविलेलीं सर्वच पात्रें केवळ कपोलकल्पित नाहींत. 'भीमा मावशी,' 'नरेंद्र,' 'शामसुंदर,' 'विमल,' 'सरो-जिनी' वगैरे पात्रें कल्पनासृष्टींतील भासण्याचा बराच संभव असला तरी वस्तुस्थिति तशी नसून हीं पात्रें या महाराष्ट्रांत—सत्यसृष्टींत अद्यापीही नांदत आहेत. अर्थातच निराळ्या नांवाखालीं !

'**सौभाग्य–लक्ष्मीला**' जन्म देऊन मला जवळ जवळ दीड वर्ष होत आलें; परंतु तशाच कांहीं अनेक अकल्पित अडचणींमुळें, जाहिराती जगांत ती तत्काळ नांदूं लागली तरी रंगभूमीवर अवतीर्ण होण्याचा योग तिला लौकर लाभला नाहीं.

अस्तु. आतां उरलें आभार–प्रकरण ! पण केवळ सांप्रदायिक शिष्टाचा-नुरूप शाब्दिक आभार--प्रदर्शनाचें अवडंबर नव्हे तर अंतःकरणांतून उस-ळलेल्या उत्कट भावनांचा उमाळा व्यक्त करण्याला माझी कृतज्ञताच मला भाग पाडीत आहे.

माझ्या विनंतीला मान देऊन विख्यात, विद्वान् वाग्भट **प्रिन्सिपाल गो. चि. भाटे. एम्. ए.** यांनीं आपल्या नित्याच्या प्रेमळ, उदार बुद्धीनें प्रस्तावना लिहून मला अखंड ऋणाईत करून ठेविलें आहे. त्यांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत हेंच समजत नाहीं.

स्वावलंबनाच्या पायावर उभे राहतांना पडत्या काळांतील परिस्थितीच्या फेऱ्यांत हेलकावे खाणाऱ्या माझ्या हृदयाचा कलता तोल सांवरून, सक्रिय सहानुभूतीनें आणि प्रोत्साहनबुद्धीनें **रा. अनंतराव गद्रे** (संपादक—'मौज') यांनीं मला धीर दिला नसतां तर ही कृति माझ्या हातून निर्माण झाली असती कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. तेव्हां त्यांचाही मी अखंड उपकारबद्ध आहेच. त्याचप्रमाणें माझ्या या पहिल्या प्रयत्नांत ज्यांनीं मला सहानुभूति दाखविली त्या माझ्या सर्व हितचिंतक परम मित्रांचा—

विशेषतः, महाराष्ट्राच्या परिचयाचे सुप्रसिद्ध कवि श्रीयुत '**काव्यविहारी**,' **नरहर गणेश कमतनूरकर (सरस्वतीकुमार)**, '**गिरीश**,' '**यशवंत**,' **गो. गो. अधिकारी**, यांचा मी अत्यंत आभारी आहे.

पुस्तकांत प्रसंगानुसार श्री. '**काव्यविहारी**' आणि '**गिरीश**' यांच्या अनुक्रमें '**कृष्णाकांठीं**' आणि '**अभागी कमल**' या काव्याचा मी परवानगीवांचून उल्लेख केल्याबद्दल ते मला उदार मनानें क्षमा करतील अशी आशा आहे.

माझ्या '**सौभाग्य–लक्ष्मीचा**' रंगभूमीवर अवतार म्हणजे **यशवंत संगीत मंडळीचे** कर्तबगार डायरेक्टर **महाराष्ट्र–कोकिळ श्री. शंकरराव सरनाईक** यांच्या निर्व्याज बंधुप्रेमाचा, उत्साही मॅनेजर, **रा. नानासाहेब हर्डीकर** आणि एजंट **रा. श्रीपतराव उपरे** यांच्या अकृत्रिम स्नेहभावाचा प्रत्यक्ष परिचय असें म्हटलें असतां अतिशयोक्तीचा अपराध माझ्या पदरीं पडणार नाहीं खास !

**रा. राजारामबापु पुरोहित** (तालीम मास्तर) यांनीं नाटक बसविण्याचे कामीं फारच मेहनत घेतली. पदांच्या श्रुतिमनोहर, रसपरिपोषक चाली मुख्यतः **महाराष्ट्र–कोकिळ रा. सरनाईक**, कंपनींतील सुप्रसिद्ध गायन–पटु नट **रा. बाळकोबा बावडेकर** आणि **रा. गोविंद विठ्ठल भावे** (हार्मोनियम मास्टर) यांनीं दिल्या. **रा. जोशी एम्. एम्.** ऊर्फ सुप्रसिद्ध **छोटू पेंटर** यांनीं अतिशय अल्पावधींत नाटकाच्या सजावटीसाठीं सुंदर सीनसीनरी करून दिली. कंपनींतील कुशल नटवर्गानें आपले निरनिराळ्या प्रसंगांचे फोटो दिले. अशा रीतीनें **यशवंत कंपनींतील** वरील मंडळींनीं हें नाटक 'यशवंत' करण्याचें कामीं फारच परिश्रम घेतले याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

या नाटकाचा प्रथम प्रयोग शनिवार तारीख ११ एप्रिल १९२५ रोजीं रात्रौ ९॥ वाजतां 'यशवंत संगीत मंडळीनें' किर्लोस्कर थिएटर, पुणें, येथें केला.

शेवटीं, या सदोष नाट्यकृतीची साधी सेवा साजरी करून घेण्यासाठीं समाज–सर्वेश्वराला पुनः एकवार अत्यंत नम्रपणें विनंति करून लेखणीला विराम देतों.

ता. १६।४।१९२५ }
पुणें शहर. }

रसिकांचा नम्र कृपाकांक्षी
**सदाशिव अनंत शुक्ल.**

# प्रस्तावना

ज्याप्रमाणें परदेशांत असतांना दोन एकमेकांना अगदीं अपरिचित माणसांना मातृभूम्यैक हें एकच कारण परस्परांना आपलेपणा वाटून मदत करण्यास कारणीभूत होतें, मग त्या व्यक्तींमध्यें धर्मभेद, जातिभेद, वयोभेद किंवा व्यवसायभेद कितीही असो, त्याप्रमाणें देशांतल्या देशांत एकमेकांना अगदीं अपरिचित माणसांना आपलेपणा वाटून मदत करण्यास मतैक्य हें एकच कारण पुरें होतें असें वाटतें. निदान माझ्या बाबतींत तरी तें खरें आहे. नाहींतर या नाटकास मला प्रथम विचारल्यापासून एका आठवड्याच्या अवधीच्या आंत मी प्रस्तावना लिहिण्यास लेखणी हातीं धरली या कोड्याचा उलगडा होणें शक्य नाहीं. कारण या नाटकाचे कर्ते रा. शुक्ल हे काळे कीं गोरे हेंही मी पाहिलें नाहीं. प्रचलित मराठी वाङ्मयाशीं परिचय करून घेण्यास मला सवड नसल्यामुळें रा. शुक्ल हे अलीकडे वाङ्मयसेवा करीत असूनही एका आठवड्यापूर्वी मला त्यांचें नांवसुद्धां ठाऊक नव्हतें. इतक्या अपरिचित लेखकाच्या नाटकास मध्यस्थाच्या सांगीवरून व लेखकाच्या विनंतीवरून मी या नाटकास प्रस्तावनारूप चार शब्द लिहिण्याचें मनांत आणिलें याचें कारण विधवाविवाह या विषयाविषयींचें नाटककाराचें व माझें मतैक्य !

'सौभाग्य-लक्ष्मी' हें नाटक लेखकाचें पहिलेंच स्वतंत्र नाटक असून तें विधवा विवाहाला जनमन अनुकूल करून घेण्याच्या बुद्धीनें लिहिलेलें आहे.

रा. गडकऱ्यांच्या पहिल्या विधवाविवाहविषयक नाटकास मी प्रस्तावना लिहिली होती व आज त्याच विषयावरील रा. शुक्ल यांच्या नाटकास ही मी प्रस्तावना लिहीत आहे हा योगायोग विलक्षण आहे. रा. गडकऱ्यांच्या नाटकाप्रमाणें रा. शुक्ल यांचें हें ' सौभाग्य-लक्ष्मी ' नाटकही लोकप्रिय होवो अशी आशा करून नाटकाविषयीं व तदन्तर्गत विषयाविषयीं मी आपले विचार वाचकांना सादर करण्याचें धाडस करतों.

'सौभाग्य-लक्ष्मी' हें तीन अंकी लहान नाटिकावजा सामाजिक नाटक आहे. नाटकाच्या हेतूला साजेल अशाच तऱ्हेची संविधानकाची रचना आहे. स्थळ,

काळ व संविधानकांतील स्त्रीपुरुष हीं 'आजकालचीं' आहेत. मुंबई व मुंबईच्या जवळचें एक गांव हें स्थळ आहे. नाटकाचा काळही हल्लींचा आहे. त्याचा अवधि महिना पंधरा दिवसांतलाच आहे. सुशिक्षित हिंदु पांढरपेशा जातींतील पात्रें कल्पिलेलीं आहेत. पांच सहा बायका व पांच सहा पुरुष इतकींच एकंदर नाटकांत पात्रें असल्यामुळें संविधानक साधें व सहज समजण्यासारखें आहे. त्यांत गुंतागुंत किंवा ओढून ताणून आणलेले प्रसंग मुळींच नाहींत.

विमला—या नाटकांतील नायिका—ही एक बालविधवा आहे. हिच्या लग्नानंतर एकाच वर्षाच्या आंत हिचे आईबाप व नवरा वारले व म्हणून विमला ही अगदीं निराधार होऊन तिला आपल्या भावासह आपल्या विधवा सासूवर सर्वस्वीं अवलंबून रहावें लागलें. विमलेची सासू भीमाबाई ही पुष्कळ श्रीमंत आहे. तिला श्यामसुंदर नांवाचा, परीक्षेच्या वाऱ्या करून थकलेला पण ऐटबाज व उनाड असा भाचा आहे. हाच या नाटकांतला दुष्ट मनुष्य आहे. भीमामावशी ही धर्मवेडी, भोळसर, निर्दय, श्रीमंतीनें फुगलेली अशी म्हातारी आहे व श्यामसुंदरच्या चिथावणीनें ती विमलेचा अमानुषपणें छळ करते. असा छळ करविण्यांत शामसुंदरचा दुहेरी दुष्ट हेतु; एक विमलेला भ्रष्ट करण्याच्या प्रयत्नांत आपल्याला आलेल्या अपयशाचा तिच्यावर सूड उगवावयाचा व दुसरा अशा छळानें तरी ती आपल्याला वश होईल ही अंधुक आशा ! विमलेची शेजारीण वारूताई फार दयाळू होती. ती विमलेला व दीनानाथाला होईल तितकी मदत करी व त्यांचें दुःख हलकें करण्याच्या प्रयत्न करी. तिचा भाऊ नरेंद्र हा नेहमीं बहिणीकडे येत असे; शिवाय विमलेची त्याला बालपणापासून माहिती असे व तिच्याबद्दल त्याला फार सहानुभूते वाटे; व यामुळें आपल्या समाजांतील विधवांच्या दुःस्थितीबद्दल त्याच्या मनांत सारखे विचार घोळत व आपण त्यांची दुःस्थिति नाहींशी करण्यास कांही तरी करावें असें त्याच्या मनांत येत असे. तो मेडिकल कॉलेजांत होता व तेथें त्याचा सरोजिनी नांवाच्या एका सुस्थितींतिल गृहस्थाच्या—कर्त्या सुधारकाच्या—एकुलत्या एक मुलीशीं मैत्री जमली होती. तीही मेडिकल कॉलेजांत होती. त्यांच्या एम. बी. बी. एस. च्या परीक्षेच्या निकालाच्या दिवशींच नाटकाला प्रारंभ झालेला आहे. दोघेजणही हुषार विद्यार्थ्यांपैकी असल्यामुळें त्यांना परीक्षेच्या निकालाबद्दल खरोखरी धाकधुक वाटत नाहीं. यामुळें तीं प्रेमानंदाच्या भरांत थट्टामस्करी करीत बसलीं असतांना टेलीफोन मधून दोघेजणही फर्स्टक्लासांत पास झाल्याबद्दल कोर्टांतून नानासाहेब(सरोजिनीचे वडील)

यांचेकडून बातमी कळते. अर्थात् दोघांनाही परमानंद होतो. पण दोघांनाही भावी आयुष्याबद्दल व त्यांतील कर्तव्यकर्माबद्दल चिंता उत्पन्न होते. नरेंद्राच्या मनांत सरोजिनीबद्दल प्रेम व विमलेबद्दल सहानुभूति व तदनुषंगिक विधवांची दुःस्थिती दूर करण्याबद्दलची कर्तव्यबुद्धि अशाभावना एकसमयावच्छेदेकरून उधृत झालेल्या त्याला आढळून येतात. इतक्यांत त्याला श्रीयुत–एक कविब्रू–भेटतो व त्याच्या कवितेच्या बाडांतून सहज गळून पडलेलें, श्यामसुंदरच्या दुष्ट वृत्ति स्पष्ट दाखविणारें, श्यामसुंदरचेंच एक पत्र त्याला मिळतें. अशा रीतीनें सहजच त्या श्रीयुताच्या अजागळपणाचा फायदा नरेंद्राला मिळून तो विमलेवरची आपत्ती टाळण्यासाठीं नंदापूराला तत्काळ निघून जातो. श्यामसुंदरचें विमलेला विद्रूप करण्याचे वगैरे सर्व बेत ढांसळून पाडतो व विमलेला मुंबईला आणून विधवाश्रमांत ठेवण्याचें ठरवून त्याप्रमाणें तो व्यवस्था करतो.

श्यामसुंदराला हें समजतांच तो, सवंग लोकप्रियतेची अनिवार हांव असलेल्या आपल्या मेहुण्याची, श्रीयुताची गांठ घेतो आणि त्याच्याकडून दोन आचरट प्रेमविषयक कविता मिळवितो. नंतर त्या कविता व दुसरीं बनावट पत्रें विमलेच्या दुर्वर्तनाचा पुरावा म्हणून शाळेच्या मुख्य मास्तरिणीकडे पाठवून नरेंद्राचा डाव हाणून पाडण्याचा तो प्रयत्न करतो. पण त्यांतही त्याला अपयश येतें.

नरेंद्राचें प्रेम द्विधा झालेलें आहे हें सरोजिनीच्या ध्यानांत आल्यापासून आपल्या प्रेमाचा होम करून विमलेचा व नरेंद्राचा विवाह घडवून आणण्याचा ती निश्चय करिते व आपल्या डॉक्टरी ज्ञानाचा, अविवाहित राहून सर्व समाजाला लाभ करून देण्याची स्वार्थत्यागी बुद्धि धरते. व एक मोफत रुग्णालय चालविण्याचा विचार करिते. सरोजिनी मग नरेंद्राचें मन या गोष्टीला वळवितें व तोही विमलेचें मन वळवितो. मध्यंतरीं श्यामसुंदर मावशीबाईंना पांच सात हजार रुपये बरोबर घेऊन काशीयात्रेस निघण्याची सल्ला देतो आणि त्याप्रमाणें तिला घरून घेऊन बेऊन मुंबईन सोडून पैसे घेऊन पसार होतो, पळतो. या आपत्तीमुळें मावशीबाईंचे डोळे उघडतात व तीही मग विमलेच्या पुनर्विवाहास परवानगी देते. श्यामसुंदरलाही केल्या कर्माचा पश्चात्ताप होतो. यामुळें सर्वत्र आनंदीआनंदांत नाटकाचा शेवट होतो. प्रत्येक नाटकांत विनोदी पात्रें घालण्याचा प्रघात अलीकडे पडला आहे. तदनुरूप श्रीयुत व कांता या कविकवयित्रींचें एक जोडपें या नाटकांत कल्पिलें आहे पण त्याचा मुख्य संविधानकाशीं फारसा संबंध येत नाहीं असें वरील संविधानकाच्या संक्षेपावरून ध्यानांत येईल.

येणेंप्रमाणें नाटकाचें संविधानक आहे. नाटककाराचा उद्देश बालविधवां बद्दल समाजांत सहानुभूति उत्पन्न करून त्यांची स्थिति सुधारण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांना पुनर्विवाहाची परवानगी देणें हा होय हें दर्शविण्याचा आहे व या नाटकाच्या वाचनानें व प्रयोगानें तो उद्देश बऱ्याच अंशानें सिद्धीस जाईल यांत शंका नाहीं. विमलेच्या अमानुष छळाबद्दल कोणत्या सहृदय माणसाला राग येणार नाहीं ? नाटककारानें वर्णन केलेली स्थिति थोडीशी अतिशयोक्तीनें भरलेली असेल. चित्र काहीं भडक रंगांत रंगविलें असेल, पण आमच्या समाजांत बालविधवांचा थोडा फार छळ चालू नाहीं, त्यांच्या असहाय स्थितीचा फायदा घेऊन त्यांना दुर्वर्तनी बनविण्याचा श्यामसुंदरसारख्या माणसाकडून प्रयत्न होत नाहीं व आमच्या समाजाच्या आहेत त्या चालीरीती समाधान-कारकच आहेत असें कोणता समंजस व सहृदय मनुष्य म्हणेल ? समाजाचें ज्या-प्रमाणें इतर चालीरीतींच्या बाबतींत स्थित्यंतर होत आहे, त्याप्रमाणें पुनर्विवा-हाच्या बाबतींत होणें रास्त नाहीं काय ? नवीन बदललेल्या परिस्थितींत जुन्या चालीरीतींनांच आपण चिकटून बसलों तर त्यापासून नवीन नवीन अनर्थ उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहींत. समाजांत हल्लीं स्त्रीशिक्षणाचा प्रसार होत चालला आहे. बालविवाहाचा प्रघात कमी होत चालला आहे. स्त्रीपुरुषांच्या संमेलनांचे प्रसंग वाढत आहेत. समाजांत व्यवहारिक वाङ्मयाचा प्रसार होत चालला आहे. समाजांतील व्यक्तींना थोडेफार स्वातंत्र्य मिळत चाललें आहे. अशा परिस्थितींत जुलुमानें व सक्तीनें विधवांचे बाबतींत पूर्वींच्या विवाहप्रति-बंधाचा निर्बंध चालू ठेवल्यास त्यापासून स्वैराचार व अनीति वाढल्याखेरीज राहणार नाहींत. शिवाय प्रत्येक माणसाला जगांत येऊन सुखानें व नीतीनें आयुष्य-क्रमण करण्याचा अधिकार आहे असें मत फैलावत चाललें आहे. मग हा न्याय विधवांना लागू नाहीं काय ? तेव्हां या विषयासंबंधीं लोक-जागृती करणें अवश्यक आहे. व रा. शुक्ल यांचा प्रयत्न योग्य दिशेनें होत आहे यांत शंका नाहीं !

नाटकावरून न कळत मी नाट्यविषयाकडे वळलों. पण आतां आवरतें घेतलें पाहिजे. रा. शुक्ल यांचें नाटक वाचून माझ्या मनावर एकंदरींत अनुकूल परिणाम झाला, तसाच तो प्रेक्षकवर्गावर होईल अशी मला आशा आहे.

रा. शुक्ल यांचें विमलेचें चित्र करुणरसपूर्ण उतरलें आहे खास. तिचें बंधु-प्रेम, तिचा सोशिकपणा, तिचें नीतिधैर्य वगैरे गुण आर्यस्त्रीला साजेसे नाहींत

असें कोण म्हणेल ? सरोजिनीचें चित्रही उदात्त आहे. हल्लींच्या काळीं नरेंद्रासारखी परिस्थिति पुष्कळांची असते. त्यांत धोपट मार्गानें न जातां नवा सुधारणेचा मार्ग काढणारे नरेंद्रासारखे तरुण पुढें येणें अवश्यक आहे.

रा. शुक्ल यांची या नाटकांतील भाषा-शैली गडकरी पंथाची आहे, येवढें सांगितलें म्हणजे [illegible] कल्पना करतां येईल. या नाटकांतील पद्यें साधीं व प्रसादयुक्त आहेत, हें अभिनंदनीय गोष्ट आहे. आतां, तीं गातांना कशी काय वठतात हें प्रयोग पाहिल्याखेरीज सांगणें कठिण आहे.

झालें; प्रस्तावनेची मर्यादा संपली. तेव्हां रा. शुक्ल यांचें हें पहिलें सामाजिक नाटक चिरंजीव होवो, असा आशीर्वाद देऊन लेखणी खालीं ठेवतों.

विलिंग्डन कॉलेज, जिल्हा सातारा. } **गोविंद चिमणाजी भावे.**
ता. १५।४।१९२५

# प्रकाशकाचे चार शब्द

**रा० सदाशिव अनंत शुक्ल उर्फ 'कुमुद-बांधव'** यांचा, एक प्रतिभाशाली कवि, या नात्यानें महाराष्ट्र रसिकवृंदास परिचय आहेच. परंतु एक उत्तम नाटककार या नात्यानें त्यांचा या पुस्तकाच्याद्वारें वाचकांस **प्रथम** परिचय करून देण्याची सुसंधि मला मिळाली याबद्दल आनंद वाटतो.

या पुस्तकांतील फोटो मुंबईचे सुप्रसिद्ध फोटोग्राफर रा. **बी. बी मयेकर** यांनीं मुद्दाम पुण्यास येऊन काढून दिले, मनोरंजन प्रेसच्या चालकांनीं त्यांचे उत्तम ब्लॉक करून छापून दिलें व चित्रशाळेचे मालक रा. **वासुदेवराव जोशी** व मॅनेजर रा. **शंकरराव जोशी** यांनीं अल्प अवकाशांत छपाईचें काम अत्यंत काळजीपूर्वक सुबक करून दिलें याबद्दल वरील सर्वत्रांचा मी फार आभारी आहे.

कांहीं अनपेक्षित अडचणीमुळें पुस्तक पहिल्या प्रयोगाचे वेळीं वाचकांचे हातीं पडलें नाहीं याबद्दल दिलगीर आहे.

सर्वांचा नम्र,
**शंकर रामचंद्र सरनाईक.**

# सौभाग्य-लक्ष्मी

## प्रवेश पहिला

[ शृंगारलेला भव्य दिवाणखाना—मध्यभागीं सुंदर टेबल—त्यावर एक फ्लावरपॉट—एका बाजूला सरोजिनी दिलरुब्यावर पुढील पद म्हणत बसली आहे—पद चालू असतां नरेंद्र येतो—बाजूच्या टेबलावर टोपी काठी ठेवून ऐकत तिच्या मागें उभा राहतो.]

### नांदी पद १

**अभिराम प्रभु—नाम—धर प्रेम-परब्रम्ह ! नमन निष्काम त्या महोदारा ॥ ध्रु० ॥ देश परमेश सम, हा दया धर्म मम, सुमंगल धाम बल आत्मोद्धारा. ॥ १ ॥ लोक—हित—रत सुमन हें करित सुमन—गुण निजार्पण जाण तुज विश्वाधारा ! ॥ २ ॥**

नरेंद्रः—[ पद झाल्यावर फ्लावरपॉटमधील फुलें तिच्यावर उधळून ] अहाहा ! रंगदेवता प्रसन्न आहे ! झालं इतकं ईशस्तवन बस्स आहे.

सरोजिनीः—[ दचकून उठून ] कोण ? नरेंद्र ? मी केवढ्यांदा दचकलें बाई ! काव्यदेवीच्या क्रीडोद्यानांत कल्पनेशीं खेळून खेळून कंटाळा आला म्हणून वाटतं कविराजांनीं करमणुकीसाठीं यावेळीं इकडे येणं केलं ?

नरेंद्रः—छे—छे—तसं नव्हे तर या काव्याच्या प्रत्यक्ष प्रतिमेची प्रेम-पुष्पांनीं अशी पूजा बांधण्यासाठींच अस्मादिकांची स्वारी इकडे आली आहे. सरोजिनी, देवि, करा—या भोळ्याभावड्या भक्ताच्या पूजेचा स्वीकार करा.

सरोजिनीः—अस्सं—अस्सं—एकूण आज अशा महापूजेचा समारंभ साजरा करणार वाटतं ! पण प्रेमाच्या साम्राज्यांत हा बाई कुठला उलटा न्याय !

दिलवर, या दिलाच्या देवाची मनाच्या मंगल मंदिरांत प्रेमानं प्राणप्रतिष्ठा करून पूजा बांधण्याचा अधिकार माझा ! देवळांतल्या देवानं कां पुजाऱ्याची पूजा करायची ? असं करून मला इतकं हिणवू नये गडे !

## पद २

**कां विलोल प्रीति बाला दावि चंचला लीला ॥ ध्रु ॥**
**विविधा वरि कला; करि वृत्ति विकला । करि नाचवी सकला ब्रम्हांडगोला ॥ १ ॥ जीव हा विलासी लोभला**
**सुखाला । प्रेमासवा प्याला बेभान झाला ॥ २ ॥**

[ नरेंद्र पुनः फुलें उधळतो. ] इश्श हें काय भलतंच ?

**नरेंद्रः**—भलतंच–सरोज, हें भलतंच ? या राजस रंगदेवतेवर हा प्रेमाचा सूत्रधार ही जीवफुलांची रास अशी भक्तिभावानं उधळीत आहे यांत विशेष नवल तें काय आहे ? ( हातांत हात घेऊन हंसत ) हा नाटकाच्या सुरवातीचा नटी-सूत्रधार प्रवेश आहे.

**सरोजिनीः**—म्हणजे ? आपण सूत्रधार ? हो–पण तेंही खरंच. या माझ्या प्रेमी हृदयाची सूत्रं आपल्या नजरेच्या तालावर खेळविणारे आपण सूत्रधार तर खरंच. पण या सूत्रधारांनीं या प्रवेशाला सुरवात करून आज इथं नाटक आरंभलं आहे वाटतं ?

**नरेंद्रः**—ऑफ कोर्स ! यांत काय संशय ? आपल्या प्रेममय जीवित-नाटकाची नांदी तर बहारदार झाली !

**सरोजिनीः**—पण शेवटचं भरतवाक्य गायला—

**नरेंद्रः**— तो अनेक चमत्कृतिपूर्ण भविष्यकाल समर्थ आहे. जगाच्या रंगभूमीवर मोहरंगानं नटलेलें जीवमात्ररूपी नट बऱ्यावाईट भूमिका वठवून मृत्यूच्या पडद्याआड कायमचे जाण्यापूर्वी त्यांच्या भवितव्यतेचं भरतवाक्य गाण्याची कामगिरी, जगत् सूत्रधारी परमेश्वरानं अघटित–घटना–चतुर अशा त्या काळावर आधींच सोंपविली आहे.

**सरोजिनीः**—मग आपल्या या प्रेममय जीवित—नाटकाचा शेवट तो काळ कसा काय करणार ?

**नरेंद्रः**—हें त्यालाच विचारलं पाहिजे. आपल्या राक्षसी पावलाखाली प्रतिक्षणीं प्रेमी हृदयांच्या पायघड्या तुडवीत प्रलयकालचं अक्कांडतांडव

करणारा, अघटित स्थित्यंतरांच्या समूहांनीं हा संसार सजविणारा, आणि विषमतेच्या विचित्र लीलालहरीवर विश्वाला विहारवश करणारा हा काळ—

**शामसुंदरः**—[ प्रवेशून ] नानासाहेब आहेत कां ? हॅलो ! कोण नरेंद्र ? मिस् सरोजिनी—

**नरेंद्रः**—कोण श्यामसुंदर ? कमॉन—कमॉन—ग्लॅड टु सी यू इंडीड. [ शेकहँड ].

**शामसुंदरः**—कां ? नांवापुरतीसुद्धां ओळख राहिली नाहीं ? बाकी असल्या या रोमँटिक मोमेंटमधें जिथं जिवाचं भान हरपायचं तिथं जिवलग दोस्ताचं नांव कशाला ? [ सरोजिनी तिरस्कारयुक्त नजरेनें पहाते ]

**नरेंद्रः**—( त्यास एकीकडे ) तुझ्या नांवारूपाप्रमाणंच तुझ्या हृदयाचाहि काळेपणा तूं असा उघड रीतीनं नांवारूपाला आणशील ही कल्पना नव्हती. आहेस—नांवाप्रमाणं कृति करणारा आहेस.

**शामसुंदरः**—आहे हा असा आहे. बरं पण नानासाहेब कुठं आहेत ?

**सरोजिनीः**—कुठं म्हणजे ? ऑफिसांत !

**शामसुंदरः**—ऑफिस ! आज कसचं ऑफिस ? आज गुड फ्रायडे ना ? सुट्टी !

**नरेंद्रः**—तुमच्या डायरींत वाटतं ? अहो राजे, आज शनिवार आहे.

**सरोजिनीः**—यांच्या कॅलेंडरमधें गुड फ्रायडे शनवारींच आला असला तर ?

**शामसुंदरः**—येस् आय सी ! आज शनिवार ! मी समजत होतों शुक्रवारच.

**नरेंद्रः**—बाकी जगाच्या मागं दिवसाचे दिवस राहणं हा आम्हा महाराष्ट्रीयांचा प्रकृतीधर्मच आहे. हिंदुस्थानच्याही प्रगतीचं रहस्य यांतच आहे. पण बैस असा—टेक युवर सीट—( बसल्यावर ) नंदापुराहून केव्हां आलास ?

**शामसुंदरः**—कालच आलों. खेडेगांवचं तें रेचेड लॉइफ ! वीट आला-बुवा त्याचा.

**नरेंद्रः**—म्हणून मधून मधून मुंबईच्या अशा ट्रीपस् मारतोस वाटतं ?

**शामसुंदरः**—शिवाय आमच्या कांताकालाही भेटून बरेच दिवस झाले होते—

नरेंद्रः—कोण ?

सरोजिनीः—[ तिचा टांगलेला फोटो दाखवून ] हीच ती सुप्रसिद्ध "शैलबाला" कवयित्री. माझी ती बालमैत्रिण आहे.

शामसुंदरः—शिवाय आमचे मेहुणे-श्रीयुतरावही कवितेचे फार नादी-

नरेंद्रः—वः तो तर फर्स्टक्लास इडिअट आहे. त्याला या जगांत प्रेम आणि काव्य याशिवाय कांहीं दिसतच नाहीं. ( सरोजिनीस ) पुढं मागं इन्ट्रोडयूस करून देईन तुम्हांला-[ शामसुंदरास ] बरं-आमच्या ताईकडील कुशलवर्तमान—

शामसुंदरः—बारूताई ना ? आमच्या विमलावहिनींकडं रोज येतात. त्यांचं ठीक चाललं आहे.

नरेंद्रः—विमलेची प्रकृति वगैरे ठीक आहे ना ?

सरोजिनीः—विमला म्हणजे जिच्या कमनशिबाची कर्मकहाणी तुम्ही सांगत होता तीच ना ती बालविधवा ?

नरेंद्रः—होय तीच. त्या अभागी जिवाची काय हालहवाल आहे ?

सरोजिनीः—तिची हालहवाल कसली ? तिची सासू हाल तर करीतच असल आणि वैधव्याच्या वज्राघातानं व्याकुळ झालेली ती गरीब गाय दैवावर हवाला ठेवून कष्टानं काळ कंठित असेल झालं. कां ? असंच ना मिस्टर श्यामसुंदर ?

शामसुंदरः—आणखी काय तर ? सासूपणा गाजवायला लागून भावशी अकांडतांडव करूं लागली कीं मलासुद्धां अंगांत सूनबाईसारखं कांपरं भरतं. मावशीनं सारा बोजा-देणंघेणं, शेतभात, तिचा एकुलता एक वसंत बेऱ्यापासून माझ्याच अंगावर टाकला आहे.

नरेंद्रः—तुझं काय वाईट झालं ? म्हातारी दत्तक घेईल तुला. इकडं बी.ए.ला पंढरीच्या वाऱ्या करीत होतास. युनिव्हर्सिटीचे वन्समोअर खातां खातां मेटाकुटीस आलास—

सरोजिनीः—शेवटीं यांनीच केला नो मोअर !

शामसुंदरः—आमचं तकदीरच तसं सवाई शिकंदर माझ्या बरोबरीचे कुणी वकीली करूं लागले-कुणी प्रोफेसर झाले—

सरोजिनीः—( नरेंद्राकडे पहात ) कुणी डॉक्टर झाले.

शामसुंदरः—हो-खरंच.नरेंद्र, आज तुमच्या परिक्षेचा रिझल्ट ना ?

पद ३

मन द्विधा तापदा वरित विषादा, भावविरोधा धरित, जराहि स्थिर नं राहि यशभरेंही कदा ॥ ध्रु० ॥ विमल चंद्रिका खल तम; गांजित; झुरत आणि चंद्रमणि सुख-विमुख मुकत मोदा ॥ १ ॥

सरोजिनी:—( प्रवेशून ) चलायचं ना ?

नरेंद्र:—यावं—शृंगारमंजरी ! यावं. हा दिलरुबा आपल्या गोड गळ्याला मंजुळ साथ देण्यासाठीं उत्सुक झाला आहे. त्याची अन् आमची इच्छा तृप्त करा.

सरोजिनी:—तुम्ही आहांत नामांकित कवि ! कवीच्या स्फूर्तीला स्थळकाळाचा तर निर्बंधच नसतो आणि कल्पनेच्या खेळकर स्वैर चालेला अतिशयोक्तीचा अलंकार तर साजेसाच आहे.

नरेंद्र:—या दिलाच्या दिलरुब्याचं संगीतसुद्धां कांहीं कमी कर्णमधुर नाहीं.

पद ४

दिल् दिल्रुबा हा बोले । ॥ ध्रु० ॥ प्रेमैकतालावरि भावलीला करि; रंजवी या नव मंजु बोलें ॥ १ ॥ मधु-गीत-गंगा आनंद-रंगा उधळी अभंगा; मन गुंग डोलें । ॥ २ ॥ [जातात.

---

# प्रवेश दुसरा.

[ परसांतील तुळशीवृंदावनाला टेकून विमला पुढील भूपाळी म्हणत खिन्न मुद्रेनें बसली आहे ]

विमला:—' घनश्याम सुंदरा ! श्रीधरा ! अरुणोदय झाला !
उठि झडकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला—! '

चारूताई:—[ प्रवेशून ] कोण ? विमल, तूंच कां ही भूपाळी म्हणत

बसली आहेस ! तूं अशी गोड गळ्यावर भूपाळ्या म्हणूं लागलीस कीं घरांतला सारा कामधंदा सोडून तुझी भूपाळीच ऐकत बसावंस वाटतं. पण तूं आज सकाळच्या प्रहरीं अशी रिकामी आणि उदास अवतारानं कशी बसलीस ?

**विमला:**—वारूताई, आवशीपासूनच मी या तुळशीमातेच्या अंकावर अशी अलोचन निद्रा घेते आहे.

**वारूताई:**—म्हणजे ? ( जवळ बसते. ) कालची भर अवसेची रात्र तूं अशी इथं अंधारांत एकटी बसून काढलीस अं ?

**विमला:**—होय. पण त्याचं काय ? असल्या आपत्त्या सहन करणं आतां किनई माझ्या अंगवळणींच पडून गेल आहे. काल—

**वारूताई**—कांहीं विशेष झालं वाटतं सास्वासुनांचं ?

**विमला:**—विशेष तें काय ? रोजचंच—

**वारूताई:**—पण सांग तर खरं—रात्रभर तुला मावशींनीं अशी घराबाहेर काढली एवढं काय झालं सांग ना ?

**विमला:**—[ रडण्याचा उमाळा आंवरून. ] सांगूं ? काय सांगूं ? वारूताई, नको—हा संसार नको, ही यातना नको, हें जगणं नको. देवळांतला देव गेला. पुजाऱ्याची प्रतिष्ठा काय उरली ? संसाराचं सौभाग्य सरलं. स्मशानांतलं जिणं नशीबीं आलं. रात्रीं मेला वारा तरी किती मणमणत होता. थंडीनं हाडं फुटत होतीं—

**वारूताई:**—तरी तशी बसून रात्र काढलीस अं ?

**विमला:**—पुष्कळदां मनांत आलं कीं गळ्याला धोंडा बांधून या विहिरींत उडी घ्यावी नाहीं तर या फरशीवर डोकें आपटून प्राण सोडावा आणि या विषारी जगाचा कायमचा निरोप घ्यावा. [ रडते. ]

**वारूताई:**—उगी बाळ, रडूं नकोस सकाळच्या प्रहरीं. विमल, तूं समजूतदार, जाणती आणि असा अविचार—

**विमला:**—अविचार कसला यांत ? आत्महत्त्या नशिबांतच लिहिली असेल तर—

**वारूताई:**—चुप् बोलूं नकोस असं भलतं अभद्र.

**विमला:**—जगून तरी काय करायचं आहे ? या जीवानं आतां जगांत काय मिळवायचं आहे ?



विमलाः—' भार जगाला विधवा बाला '  [ पान ९

मनोरंजन प्रेस, मुंबई नं. ४.

## पद ५

**निराशा निशा ये सुखशा-नाशा! या भवपाशा जीव विटे अशा ॥ ध्रु० ॥ भार जगाला विधवा बाला स्थिति जाची परवशा ॥ १ ॥ दाहि दुर्दशा हृदया मृतशा चढे काळाची नशा ॥ २ ॥**

**वारूताई:**—विमल, तुझी ही दशा उघड्या डोळ्यांनीं पहावत नाहीं गं. ( पदरानं डोळे पुसते ) बरं-उजाडलं फटफटीत. माझ्या घरीं चल. काल रात्रीं पोटांत कांहीं नसेल. थोडसं दूध तरी घे-चल—

[ दीनानाथ आंतून-' ताई-ताई ' अशा हांका मारतो. ]

**विमलाः**—( पाहून दीनपणानें ) वारूताई, मी येत नाहीं. पण माझ्या दीनाला तेवढं घरीं नेऊन जेवूं घाला. सासूबाईंनीं बाळाला काल दुपारीं ताटावरून अर्धपोटींच उठवलं. रात्रींही उपाशीच ठेवलं. म्हणून म्हणते—

**वारूताई:**—देवा, काय रे ही बहीणभावंडावर तुझी वक्र दृष्टी !

**दीनानाथः**—[ धांवत येऊन विमलेला मिठी मारतो. ] ताई-ताई, तूं रात्रीं होतीस तरी कुठं ? मी तुला चहूकडं शोधलं. पण ताई, मला भूक लागली गं. मावशींना मी खायला मागितलं. त्यांनीं थोबाडींत मारली-( रडतो. )

**विमलाः**—जा-बाळ, वारूताईच्या बरोबर जा.

**वारूताई:**—चल बाळ, तुला जेवूं घालते हं. विमल तूंही चल—

**विमलः**—नको. देवांच्या कांकड आरतीला सासूबाई गेल्या असतील, इतक्यांत येतील नि मी तुमच्याकडं गेले हें त्यांना कळलं तर——

**वारूताई:**—आकाशपाताळ एक करायची ती बया. अहाहा ! काय पण तुझी सासू गं-कैदाशीण ! बरं इथंच उभी रहा. मी दूध घेऊन येतें. [ दीनानाथाला घेऊन जाते. ]

**विमलाः**—[ स्वगत ] वारूताई किती कनवाळू, गोड स्वभावाच्या ! माझ्यावर त्यांचं केवढं प्रेम ! पण माझ्या फाटक्या नशीबाला त्यांच्या प्रेमाची पांखर-मायेची शाल कशी झांकणार ? या सहानुभूतिशून्य जहरी जगांत दैव-जर्जर जळत्या जीवाला आशेचा ओलावा देण्याला दयामूल प्रेमाचा परमाणुसुद्धां पुरेसा होतो. या प्रशांत प्रभातकाळीं निराश जीवालासुद्धां

नवा उत्साह वाटतो आहे. [ पडद्यांत—' कार्ट्या, पोटांत आग पडली कां तुझ्या ? ' ] ही गर्जना कुणाची ? दुसऱ्या कुणाची ? सासूबाईंचीच—

**मावशी:**—[ दीनानाथाला मारीत आणून जमीनीवर लोटून देते. ] कार्ट्या, पोटांत आग पडली कां तुझ्या ? दुसऱ्याच्या घरीं गिळायला जातोस ? घरीं तुला उपाशी ठेवतात होय ? काय बाई कार्टं अब्रू काढणारं. ही—ही—सारी शिकवण या अवदसेची दिसते. [ तिला मारीत ] बोल—तूंच त्याला तिकडं धाडलंस नां ?

**विमला:**—वारूताईच घेऊन गेल्या त्याला. [ रडते. ]

**मावशी:**—तर—तर—दिन्या, भोकाड पसरून रडायलं काय झालं ? ती प्राजक्ताची फुलं वेंच, स्नान कर, देवपूजा कर, तर दुपारीं जेवायला मिळेल. नाहीं तर आजसुद्धां अन्नाचा कण कीं पाण्याचा घोंट नाहीं देणार ?

**दीना:**—( रडत ) मला शाळेंत जायचं आहे.

**मावशी:**—जळूंदे तुझी शाळा. काय शिकून दिवे लावणार आहेस ठाऊक आहे! हं वेंच. कुठली मेली ही बहिणभावंडाचीं काळीं तोंडं आणि पांढरे पाय घरांत घुसले कुणाला ठाऊक ! रिकामें पिंड पोसणं नशीबीं आलंय ! माझा बाळ गेला आणि हे खायला काळ पुढें उभे राहिले—[ चडफडत जाते. ]

**दीना:**—अर्ध्या वाटेंतूनच—ताई—मावशींनीं मला मारीत आणलं.ताई, भूक लागली गं.

**विमला:**—फुलं वेंच मग—[ कुरवाळते. ]

**दीना:**—[ कांहीं फुलं वेंचून ] ताई—ताई या, हिरव्यागार गवताच्या गालीच्यावर हें दंवाचे बिंदू चमकताहेत. मला वाटलं मोतीच ते. वेंचायला हात पुढं केला.तर मातीच हातीं आली ! (पुनः वेंचू लागतो)

**विमला:**—( स्वगत ) आयुष्याच्या प्रभातकाळीं बाळपणाच्या बहरत्या बागशाईत बागडतांना अशा आशेच्या चमकदार हिमबिंदू मौक्तिकांनां वेंचायला मानवी जीवाची दुबळी माया हात पुढं करते पण भयाण भविष्यकाळीं निराशेची अशी मातीच हातीं लागते ! [ मावशी—' दिन्या ' अशी हांक मारते. दिनानाथ ' आलों ' म्हणत निघून जातो. वारूताई दुधाचा पेला घेऊन येते. ]

**वारूताई:**—[ दुधाचा पेला ओंठाला लावीत विमलेस. ] हं—घे—घे लौकर. नको म्हणू नकोस. घे.

**विमला:**—वारूताई, सासूबाई इथं आल्यातर—

**वारूताई:**—आल्यातर काय करतील ? खाईल कीं गिळील ती खाष्ट कैदाशीण ?

**मावशी:**—[ प्रवेशून लपून ऐकते—स्व. ] खाष्ट कैदाशीण ! असं काय ?

**वारूताई:**—तिची कांहीं माणसांत कां जिम्मा आहे ? येऊं दे तरी—मी भिणार नाहीं तिला. अशी खरडपट्टी काढते कीं वरची नक्षत्रंच मोजत राहावीत तिनं. नक्षत्रासारख्या पोरांचा काय हा मेला छळवाद ! सासू कसली ? राक्षसीण ती ! हं—घे हें दूध. येऊं दे तर खरी—[ विमला दुधाचा पेला ओठाला लावते. ]

**मावशी:**—[ एकदम पुढें होऊन ] हां—हां—पहा आलें. काय करणार तुम्ही माझं ? व: वारूताई, फारच तोंडाचा पट्टा चालवलांत आणि हें काय ? दूध ? या सटवीच्या नरड्यांत ओततां होय ? चला व्हा दूर ! [ पेला फेंकते. ]

**वारूताई:**—भीमा मावशी, धन्य आहे तुमच्या उलट्या काळजाची ! या बिचारीला उपाशी तापाशी रात्रभर घराबाहेर ठेवलीत—

**मावशी:**—अहो, आहेच ती तशी गुणाची. चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा ! उगीच नाहीं घराबाहेर वळचणीला उभी केली रात्रभर—

**वारूताई:**—एवढं तिनं केलं तरी काय ?

**मावशी:**—काय केलं—! काय सांगायचं तुम्हाला काय केलं तें ? अहो, एवढी थोरली घोडी वाढली आणि आपल्या हातांनीं घेऊन खाते !

**वारू:**—काय खाल्लं एवढं तें तरी सांगा.

**मावशी:**—अहो, भाकरी—चतकोर भाकरी आपल्या हातांनीं घेतली न् त्या कार्ट्याला खायला घातली. दुष्काळांतून उठलंय पोरटं जसं कांहीं.

**वारू:**—त्या बाळाला भाकरीचा कोर इनं खाऊं घातला हा तिचा गुन्हा झाला वाटतं ? मला वाटलं कांहीं दूध तूप चोरून खाल्लं. भीमाबाई, तुम्हाला काळीज तरी आहे कांहो ? म्हशीच्या अंबवणांत अन्नाचा पर्वत

न असेल, गोग्रासाला सबंध भाकरी देत असाल आणि हीं तरणी ताठी पोरं—

**मावशीः**—होय तर—तरणीताठी पोरं! हिला तर सगळ्या कामांचा कंटाळा आणि [illegible] पाहिजे. सोंगल त्या कामाची न् घालील त्या अन्नाची!

**वारूः**—मोलकरीण वाटतं ही?

**मावशीः**—हो—हो—मोलकरीण—मोलकरीण बरं, पण तुम्ही हो कां तिचा एवढा निर्वाळा घेतां?

**वारूः**—या गरीब गाईच्या तोंडांत शिळ्यापाक्या तुकड्याचा एक घांसही सुखानं नाहीं ना पडूं देत? तुमची वैरीण कां आहे ती पूर्वजन्मींची? प्रत्यक्ष सून!

**मावशीः**—बरं—बरं—पुरे तुमचं! मोठ्या कैवार घेऊन आल्या आहेत तोंडपाटिलकी करायला. तुम्ही अशी हिला आंतून चारतां म्हणूनच ही मस्तवाल म्हैस अशी माजली आहे. मोठ्या परोपकारी तुम्ही! आपल्या घरचा रस्ता सुधारा. दुसऱ्याच्या घरच्या पंचाईती तुम्हांला काय करायच्या? फुकट चौकशी न् कोंबडा मोकाशी! खबरदार पुनः घराचा उंबरठा चढाल तर. काय बघा, माझ्या घरांत येऊन मलाच शहाणपणा शिकविते. किती झालं तरी त्या नरेंद्राची बहीण. तो आला म्हणजे असाच मला ब्रह्मज्ञान शिकवितो.

**वारूः**—नाहीं त्या गोष्टीवरून हा एवढा थैमान थयथयाट! देव जाणे कसं त्या पोरांना उभं जाळीत असाल तें. शेजाऱ्यांना—आमच्यासारख्यांना दया येते इची पण तुम्हांला कांहीं आहे कां दयामाया ठाऊक? उलटं काळीज खरं गं बाई!

**मावशीः**—हो—हो—मी आहे उलट्या काळजाची! आपलं सुलटं काळीज घेऊन तोंड काळं करा कशा. जा. मी म्हणे इला बाहेर कां ठेवलं? दुसरी एखादी कजाग सासू असती तर मारे तिनं हातावर डागण्याच दिल्या असत्या. [ वारूताई मावशीकडे रागानें पहात पहात जाते. ] [ विमलेला लाथ मारून ] आणि काय गं सटवे, काय एवढ्या गुजगोष्टी करतेस? माझ्या नांवाचा डांगोरा पिटवतेस गांवभर? बोल, दांतखिळी कां बसली? गाणं म्हणायला लागली म्हणजे कशी मंजूळ कोकिळा! मस्ती नाहीं जिरली

अजून ? कोडगीच तूं—चल ऊठ, हो पुढं. ती थोरली घागर घेऊन पाणी ओढ. पन्नास घागरी पाणी ओढ. कानठिली बसली कीं काय ? चल म्हणते ना ? हो पुढं. [ मारीत घेऊन जाते. ]

---

# प्रवेश तिसरा,

[ श्रीयुतरावांचें घर. कांता आणि शामसुंदर प्रवेश करतात. ]

**शामः**—आक्का, ज्यास्त आग्रह करूं नकोस रहायचा.

आक्काः—पण दादा, आल्यासारखं चार दिवस तरी रहायचं होतंस. कीं आमच्या या घरच्या प्रकाराला कंटाळलास ?

**शामः**—तें कसं काय बुवा ?

**कांताः**—हो–त्यांचा स्वभाव पडला तऱ्हेवाईक. तूं आलास पण तुझ्याशीं चार शब्द तरी नीटपणें बोलले कां ?

**शामः**—बाकी आक्का, तूं सुद्धां कांहीं कमी तापट आणि बडबडी नाहींस. श्रीयुतरावांना बोलबोलून भंडावतेस.अगोदरच तें चक्रम् आहेत! बाकी योग और आहे बुवा ! नवराबायको दोघंही कवि. कवितेचा कारखाना काढा तुम्ही.

**कांताः**—तुझं आपलं कांहीं तरीच.

**शामः**—कांहीं तरीच कसं ? तूं "शैलबाला"–नांवाजलेली कवियित्री !

**कांताः**—शैलबालेचा अवतार तिच्या लग्नानंतर लौकरच संपला.

**शामः**—म्हणजे ?–संसाराच्या अडगळींत काव्याला जागा नसतें कीं काय ?

**कांताः**—एखाद्या भांडकुदळ अडाणी बायकोप्रमाणं मुद्दाम वागून उद्दामपणानं उलट उत्तरांनीं नेहमीं ताडन करते म्हणून इतपत तरी त्यांची वेताल प्रकृति ताळ्यावर राहते. नाहीं तर कवितेपुढं त्यांना जेवणखाणाचीही शुद्ध राहिली नसती.

**शामः**—बाकी तूंच ती " शैलबाला " हें अजून श्रीयुतरावांना कळलं

नाहीं. अँ! जगांतलं दहावं आश्चर्य आहे बुवा! जेव्हां हें त्यांना कळेल तो प्रसंगही त्यांना एक कवितेचाच विषय होईल. त्यांचं हें कवितेचं मॅन्युस्क्रिप्ट करमणुकीखातर गाडींत वाचायला घेतो. बरं टाईम झालीच. श्रीयुतरावांना सांग मी गेलों म्हणून—

**कांता:**—थांब—इतक्यांत येणं होईलच.

**शाम:**—छे—छे, ही गाडी चुकली कीं दुसरी कन्व्हीनियंट ट्रेन नाहीं.

**कांता:**—बरं, चल तर. [ जातात. दुसऱ्या बाजूनं श्रीयुत प्रवेश करतो. ]

**श्रीयुत:**—वीट आला बुवा या संसाराचा! ही बॉंबे ऑफिसची नोकरी म्हणजे जिवंतपणीं मरण आहे मरण. गिरणींतल्या मजुराप्रमाणं बारा तास राबावं आणि पगार काय तर सारा साठ रुपड्या. ऑफिसांत मानेवर खडा ठेवून खपायचं आणि पुनः उरलेलं काम असं घरीं आणून रात्रीं डोळेफोड करायची! [कागदाचें पुडकें टेबलवर आदळतो.] हंबक्! बरं या थकल्याभागल्या जीवाला घरीं तरी कांहीं सुखाचा वारा! घरीं तर साराच आनंदी आनंद! छे बुवा—माझ्यासारख्या कवीला—कल्पनेच्या करामतीवर सप्तलोकांची सातदां उलथापालथ करणाऱ्या या श्रीयुताला हा संसाराचा गाडा नेटानं हांकतां येऊं नये अँ: पिटी—रिअली पिटी! रोमान्स, पोइट्री, चार्म! छट् कांहींच नाहीं. ही घोरपड गळ्यांत पडली ती तरी किती बावळीन अजागळ. [ इकडे तिकडे पाहून ] आहे कीं नाहीं घरांत? कीं गेली शेजारीं गप्पाष्टकं झोडायला—रिकामपणींची कामगिरी करायला: अग ए! अजागळे! अँ—सामसूम! आतां जरा काव्याच्या शृंगारिक भाषेंत हांक मारावी म्हणजे कळी खुलेल. एरव्हीं नाहीं. हे प्राणेश्वरी! सुंदरी, लाडके, गडे, सखे, छट् तें कांहीं नाहीं. ए कांते, कांता, तिच्या नांवानं तरी किती हांका मारायच्या? (त्रासून) ए गांवगौरी.कुठं गेलीस दुसऱ्याचीं घरं पुजायला?

**कांता:**—[ प्रवेशून ] काय—काय म्हटलंत: मी गांवगौरी अन म्हणे दुसऱ्याचीं घरं पुजायलं गेले—असं काय!

**श्रीयुत:**—हां—हां—पण सबूर! ही मंगळागौर माझी अशी महापूजा बांधायला इथं आली आहे. आतां तर झालं: खामोश—सबूर—[ जवळ जातो. ]

**कांता:**—चला व्हा दूर. जेव्हां पहावें तेव्हां अशा नांवानं हांका मारायच्या?

**श्रीयुतः**—बरं. हें नावाचं प्रेम पाहिजे कशाला ? नांवच टाकून देतो—

**कांताः**—पुरे पुरे—अष्टौप्रहर घरीं डांबून घेते. कुठं घटकाभर मेलं शेजारीं जावून बसावं तर झालीच तोंडाची टकळी सुरू. आपणाला मात्र काळ नाहीं वेळ नाहीं—सदा हिंडायचं,-पायावर मेलं नक्षत्रच पडलं आहे. जरा कुठं घरांत बसलं कीं खुपसलंच कवितेंत डोकं. माझ्याशीं पांच मिनिटं तरी मिळतात कां दिवसांतून बोलायला ?

**श्रीयुतः**—अग, तुझ्या तोंडाला तोंड देण्यापेक्षां असं वाटतं कीं आपणच कुठं तरी तोंड घेऊन निघून जावं. सकाळीं आठ वाजल्यापासून ऑफिसचा वेध लागतो—

**कांताः**—अहाहा ! काय पण कामाचे ! हापीसांत कांहीं काम करतां कीं तिथंही कविताच खरडतां कोण जाणे. जळला मेला मला कसा वैताग आला आहे. एकटीला करमत नाहीं. चार दिवस नक्षापुरलाच दादाबरोबर जाणार होते. दिवाळी करून आले असते—

**श्रीयुतः**—आणि तूं नसतीसच आलीस दिवाळी करून तर शिमगा साजरा करायला आम्ही तिकडंच आलों असतो. करमत नाहीं करमत नाहीं असा तुझा सारखा बाजा चालतो म्हणून करमणुकीसाठीं बाजाची पेटी आणून दिली. तरी पुनः बाजा तो बाजाच ! या घडीला जातेस कां माहेरीं ? जा. पण ही तोंडाची फोनोग्राफची कर्कश प्लेट बंद कर.

**कांताः**—हो माझी कुठं आहे म्हणा तुम्हांला गरज ? तुमचं सर्वस्व म्हणजे कविता ! मुलुखांत कवि असतील पण हा मासला कांहीं औरच !

**श्रीयुतः**—हो—हो—पण जरा आस्ते ! आस्ते ! लय बढूं देऊं नकोस. ( स्वगत ) ऑफिसांत ते कामाचे गट्ठे ! यांव गोळेच ते ! घरांत हा तोंडाळ त्राटिकेचा तोफखाना ! आणि या संसाराचं नाटक पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं सोडलेले टीकेचे टारपेडो ! चोहोंकडून एकदम मारा ! ठार झालों बुवा ! बस्स. डन् अप् ! लाईफमध्यें रोमान्स नसला तरी ओढून ताणून कोंबला पाहिजे. [ प्र. ] हे प्रणयनंदिनी !

**कांताः**—काय ? मी नंदिनी ? आणि तुम्ही ?

**श्रीयुतः**—नंदी ! शुद्ध नंदीबैल ! एरवी 'मारायिसमभार्या' या नाट्याचार्य वचनाधारें माझी वेसण तूं आपल्या हातांत कशी धरली असतीस ? हे सुंदरी ! अशी रागावतेस काय ? नाहीं पण रागाव. तुझ्या या गालांच्या

गुलाबी-प्लीज एक्सक्यूज मी-निळ्याभुऱ्या आकाशावर या रागाच्या रागरंगाची रंगीबेरंगी छटा कशी पण चमकते आहे! हा चढलेल्या भिवयांचा तिरकमठा, या तुझ्या अरुंद कपाळपट्टीच्या वैराणवाळवंटावर आठ्यांच्या सीमारेषा, मारक्या म्हशीप्रमाणं टवकारलेले डोळे-आगीचे गोळे, हे क्रुद्धसुंदरी, प्रकोप-संताप-ताप-तापद-रंग-रंजिते! तुझ्या सांवळ्या सौंदर्याची साजरी शोभा कशी पण खुलल्या खुमारीनं खुलवीत आहेत! माझ्याकडं अशीच डोळे फाडून पहा. रागाशिवाय अनुरागाची महती नाहीं. मला आतां प्रेमाचा पान्हा फुटला. कविता आठवली. माझी काव्यप्रतिभा खडबडून जागी झाली. **नाक फेंदारुनी नयन शेंदारुनी**-( हात धरतो.)

**कांता:**—( झिडकारून ) जळली मेली ही वेड्यासारखी बडबड अष्टौप्रहर कानीं कपाळीं आहे—

**श्रीयुत:**—ही बडबड ? **नशीब माझं** ! अग मूर्ख ! हा रोमान्स आहे. याला पोइट्री म्हणतात. यांत चार्म आहे. रोमान्स, पोइट्री, चार्म !

**कांता:**—या तिन्हींच्या त्रिदोषाची बाधा झाली आहे तुम्हांला ! उठलं सुटलं काव्य ! संसारांत कांहीं लक्ष आहे कां काडीचं ! या पक्षां कवितेतल्या काल्पनिक प्रियेलाच कां नाहीं माळ घातलीत ?

**श्रीयुत:**—तूंच जिती जिवंत काव्याची साडेतीन हात ताडमाड दीपमाळ होतीस ना ? अग, मानवी जीवित म्हणजेच काव्य आहे. प्रेम हा त्या काव्याचा आत्मा. आनंद हा रस—

**कांता:**—पुरे करा हें प्रेमाचं रसाळवर्णन. इश्श-मला नाहीं कळत तुमचं तें प्रेम आणि काव्य. घाला चुलींत.

**श्रीयुत:**—माय गॉड !हॉरिबल्! तुझ्यांत कांहीं रोमान्स-रसिकता-प्रेम ! जी स्टायलीश नाहीं, जिला काव्य कळत नाहीं, जिला प्रेम कशाशीं खावं हें कळत नाहीं ती बायको कसली ? पशू-अगदीं पशू ! तें कांहीं नाहीं तूं स्टायलीश झालंच पाहिजेस. तूं अशी तशी नाहींस. कवीची बायको आहेस. या कवीची—

**कांता:**—कवीची बायको म्हणजे राजाची राणीच कीं नाहीं !

**श्रीयुत:**—हां-होल्ड युवर टंग ! चुप, हा माझा धडधडीत इन्सल्ट होतो आहे. आजच तुला स्टायलीश होण्याचा पहिला धडा देतो, आजपासून नांव श्रीमती. मी श्रीयुत अर्थात् तूं श्रीमती! घोक दहा वेळां.

**कांता**:—काय श्रीमती ? हातांत नाहीं फुटकी कवडी आणि नांव मात्र श्रीमती. नांव सोनुबाई आणि हातीं कथलाचा वाळा ! तशांतलीच गत.

**श्रीयुत**:—अगं नांवाची श्रीमती ! श्रीयुत किंवा श्रीमती याचा अर्थ लक्ष्मीनं युक्त असा करायचा नाहीं.

**कांता**:—तर मग कसा करायचा ?

**श्रीयुत**:—व्यवहारज्ञानाचा श्रीगणेशासुद्धां ज्याला नाहीं तो श्रीयुत ! आणि पुस्तकीज्ञानाच्या भाडोत्री बुद्धिबलावर चटोर चवचाल चाळे करणाऱ्याची जिला कायदेशीर मुभा ती श्रीमती ! श्रीयुत आणि श्रीमती या कवि लेखकांच्या जन्मसिद्ध हक्काच्या पदव्या आहेत.

**कांता**:—पण मी कुठं आहे कवी न् लेखक ?

**श्रीयुत**:—होशील. हॅव पेशन्स ! धीर धर. आण ती फुंकणी !

**कांता**:—कशाला ? माझ्या पाठींत घालायला ?

**श्रीयुत**:—नव्हे. तिच्यावरून कविता करायला !

**कांता**:—इश्श ! मी नाहीं आणीत फुंकणी !

**श्रीयुत**:—फुंकणी राहूं दे ! कवितेला दुसरे विषय काय थोडे आहेत ! चूल—घागर—छत्री—केरसुणी—बुटपॉलिश—

**कांता**:—पोतेरं, पालीपीठ—

**श्रीयुत**:—अलबत ! डोकं आहे तुला ! अगदींच शंख नाहींस. तारा, फूलें, चंद्र, सूर्य, कमळ, समुद्र—हे काव्याचे सर्वसाधारण विषय आतां पाणचट झाले आहेत. नांवांतसुद्धां नवीन नोक झोंक पाहिजे. जसं ' जवि जातांना पाहून '

**कांता**:—' स्वयंपाक करतांना पाहून—'

**श्रीयुत**:—ब्रॅव्हो ! शाबास ! गो ऑन. आणखी कवितेला विषय काढ.

**कांता**:—आतां उरलों तुम्ही न् मी आणि हा फाटका संसार !

**श्रीयुत**:—नॉन्सेन्स ! माझ्यासारख्या कवीची बायको व्हायला तूं अगदींच नालायक आहेस !

**कांता**:—माझे आईबाप वेडे ! त्यांना काय ठाऊक होतं कीं आपल्या पोरीला स्टायलीश पतिराज मिळणार आहेत म्हणून ! नाहीं तर कवितेचंच बाळकडू पाजवून भारत भागवताऐवजीं तमाम नाटककादंबऱ्यांचींच पारायणं त्यांनीं माझ्याकडून करून घेतलीं असतीं !

**श्रीयुत**:—नेव्हरमाइन्ड ! कुछ फिकीर नाहीं. त्यांची ती घोडचूक

आतां मला निस्तरणं भाग आहे! उद्यां भारत भागवत चट् सारीं हीं नीरस पुस्तकं जुन्या बाजारांत टाकतों विकून आणि काव्य—नाटक—कादंबरी या ललित वाङ्मयांतून काढतों तुला डुचकळून! पाहूं तर खरं कांहीं कोरडा पाषाण पाझरला तर! उद्यांपासून पुढील कार्यक्रम रोज अम-लांत आणायचा!

**कांता**:—तो कोणता?

**श्रीयुत**:—जीभ लांब करून बोलूं नकोस. कान लांब करून नीट ऐक. उद्यांपासून नाटक, कादंबरीखेरीज हातांत पुस्तक धरायचं नाहीं. नाटकांतील पदांशिवाय, अर्थात् शृंगारिक पदांशिवाय गाणं म्हणायचं नाहीं. बाकी लाडके, तुला गळा कुठं आहे म्हणा! तुला थोडं जरी सुरेल गातां आलं असतं तरी या आपल्या रोमान्सच्या नाटकाला असा भडक रंग चढला असता कीं यँव! [ सुस्कारा सोडून ] पण काय करायचं बुवा!

**कांता**:—काय झालं बाई?

**श्रीयुत**:—पुरे पुरे. फावल्या वेळांत कवितेवर मेहनत घ्यायची! आणि संध्याकाळीं बॅकबेवर माझ्याबरोबर नटून थटून फेरफटका करायला यायचं! असं केल्याशिवाय रोमान्स येणार नाहीं.

**कांता**:—आग लावा त्या रोमान्साला. [ जाऊं लागते ]

**श्रीयुत**:—हो—हो—पण जरा चहाचं आधण तर टाक झटपट. तोंपर्यंत मी एखादी कविता खरडतो.

**कांता**:—मग लिहा म्हणे कविता. माझं दुखतंय आज कपाळ! चूल पेटवून चहा करा. तुम्ही घ्या, मलाही द्या. हो पण अगोदर ही घागर घ्या आणि नळाचं पाणी आणा—[ घागर आणून पुढें आदळते. ]

**श्रीयुत**:—वः बायकोसाहेब, धन्य आहे तुमची! ( स्वगत ) रोमँटिक बनवावी या उद्देशानं हिला फाजील लाडानं डोक्यावर चढवून घेतली, ती तर तिथंच मिरे वाटूं लागली.

**कांता**:—हं आटपा ना? पाणी आणा, चहा करा.

**श्रीयुत**:—झक् मारतो तुझा चहा. मला नको आहे तो.

**कांता**:—तुम्हांला नको पण मला तर पाहिजे. अहाहा! काय पण प्रेम! माझी एवढी सुद्धां दया येत नाहीं ना? कवितेपुरतंच कां तेवढं प्रेम?

**श्रीयुत**:—चारी मुंडे चीत! ( उठत ) ऊठ बाबा, कविराजा, घ्या ही

सागर आणि व्हा आतां सागरगडचे सुभेदार ! करतां काय ? रोमान्स तर पाहिजे. त्याशिवाय पोइट्री सुचत नाहीं आणि पोइट्रीशिवाय चार्म नाहीं. रोमान्स—पोइट्री—चार्म ! [ सागर घेतो. ] बरं तोंपर्यंत शेगडी तर पेटीव.

**कांताः**—तुम्हीच घेऊन पेटवा. माझा उठलाय कपाळशूळ ! मी जाऊन निजते.

**श्रीयुतः**—वः छान ! अग हा रोमान्स आहे. पण थांब, या प्रसंगावर एक छानदार कल्पना सुचली आहे तेवढी अगोदर नोट डाऊन करतों. माझी कवितेची चोपडी कुठं गेली बुवा? ( टेबलावर शोधतो. )

**कांताः**—दादा घेऊन गेला आहे सहज गाडींत वाचायला.

**श्रीयुतः**—काय म्हणतेस काय ? शामराव गेले ? आणि माझी कवितेची चोपडी घेऊन गेले ? त्यापेक्षां ते माझे प्राण घेऊन गेले असते तरी हरकत नव्हती. छे—छे असाच जाऊन त्यांना गांठतों—( कपडे चढवतो. )

**कांताः**—पण एवढी कां तारांबळ ? देईल पाठवून पोष्टानं-

**श्रीयुतः**—( घाबऱ्या स्वरांत ) तूं अगदीं बेअकली आहेस. गहाळ झाली तर ? तुला डोकं नाहीं.

**कांताः**—डोक्यांत कांहीं तरीच वेड घ्यायचं.

**श्रीयुतः**—माझं डोकंच या वेळीं ठिकाणावर नाहीं. चल—आतां एकदम क्विक मार्च ! ( जातो. )

---

# प्रवेश चवथा

[ व्हिक्टोरिया टर्मिनस प्लॅटफॉर्म. ]

[ शामसुंदर ओव्हरकोट घालून हातांत पोर्टमँटो घेऊन प्रवेश करतो. ]

**शामसुंदरः**—दुनियादारी ! वः रे दुनिया ! निर्दोष सौंदर्याकडे काक-दृष्टीनं बघणारी ही मतलबी दुनिया दिव्य प्रेमाच्या पांघरुणाखालीं स्वार्थी-पणाचा कसा पण धुमाकूळ घालीत असते ! प्रेम—म्हणे दिव्य—प्रेम ! नरेंद्राचं विमलेवर दिव्य प्रेम आहे. दया येते तिची—असं काय ? मग सरोजिनीशीं

कां शृंगार चालतो ? जग म्हणजे वेड्यांचा बाजार ! जगाच्या बावळ्या बुद्धीला या कर्तबगार शामसुंदरचा कपटी कावा कोठून कळणार ? विमला ! भोळी बिचारी ! माझ्या मायावी मानभावीपणाच्या विषारी मोहिनीमंत्रानं मोहून, मतलबी मनौदार्याच्या जादूनं भारली जाऊन, माझ्या जाळ्यांत ती जखडली जाणार नाहीं हें शक्यच नाहीं. तिला काय ठाऊक कीं हा सुंदर, खाल्ल्या घरचे वासे मोजून सभ्यतेच्या सोंगाखालीं स्वतःचा स्वार्थ साधणारा हा साळसूद संभावीत म्हणजे एक अस्तनींतील निखारा आहे. तिच्या बेवारसी पांढऱ्या फटफटीत कपाळींची काळी लिखितं नष्ट करणं किंवा वाढविणं केवळ या शामसुंदरच्या लहरीवर अवलंबून आहे. मावशी ! ते गंजलेल्या मेंदूचं चालतं बोलतं बाहुलं तर माझ्या नजरेच्या तालावरच नाचत आहे. अगोदर विमलेला वश करतों आणि मग तिची मोट आवळतों. नरेंद्र आणि विमला यांच्या विषयीं विषारी विचारांची पेरणी मावशीच्या मवाळ मेंदूत केलीच आहे. माझा मतलब साधायला एवढी बॅक ग्रॉऊंड तूर्त बस्स आहे. खरोखर, या दिवाण्या दुनियेला जर बेवकूफ बनवायचें असेल तर या नादान संसाराला नाटकाचंच स्वरूप देऊन दुसऱ्याच्या सुखाच्या होळीच्या हलकल्लोळांतच आपल्या आंखलेल्या ध्येयाची दिवाळी साजरी केली पाहिजे. जगाला लीलया आपल्या जाळ्यांत जखडून टाकण्याची नाटकी विद्या जगांतल्या जातिवंत नटांच्याही अंगीं माझ्याइतकी मुरली नसेल खास ! विमलेच्या दुर्दैवाचं नाटक चाललंच आहे. आपल्या अल्प शक्त्यनुसार आपणही आपली भूमिका भडक रंगवण्यासाठीं एकदम ॲक्शनला सुरवात केली पाहिजे. विमलेला माझं मनोगत स्पष्ट सांगणारं हें पराक्रमी पत्र, हा शामसुंदर या नाटकांतला व्हिलन आहे हें लौकरच प्रत्येकाच्या प्रत्ययाला पटवून देईल. [ श्रीयुताच्या कवितेची चोपडी काढतो. ] एकजात दिव्य प्रेमाचं पोकळ अज्ञान भरलं आहे यांत ! कवि म्हणजे वेडा पीर याचा हा जिवंत पुरावा ! या पागल प्रेमाच्या पोटांतच या माझ्या साळसूद संभावितपणाला स्थान द्यावं झालं—( पत्र चोपडींत ठेवतो. ) दुनियेच्या मैदानांत नटव्या प्रेमाचं हें पाजी प्रदर्शन—[ श्रीयुत लगबगीनें येतो त्यास पाहून ] हॅलो ! कोण ? श्रीयुतराव ? इकडे कसें झुकलांत ?

श्रीयुतः—तुमच्या प्रेमासाठीं न माझ्या काव्यासाठीं.

**शामसुंदर**:—तुम्हाला तर प्रेम आणि काव्य या खेरीज बोलायला दुसरा विषयच नाहीं कां हो ?

**श्रीयुत**:—अहो गुरु, प्रेमाचा प्रश्न फार गूढ आहे—

**शाम०**:—प्रेम ! जगाच्या या स्वार्थी बाजारांत कसलं घेऊन बसलांत प्रेम ? तुमच्यासारख्या कविपीरांच्या कलमांनीं या प्रेमाला नसतं महत्व दिलं आहे. व्यवहारी जगांत प्रेमाची देवघेव कशी चालते ठाऊक नाहीं ? जगाला पोंखरणारी ही प्रेमाची कीड—

**श्रीयुत**:—हां, तुमच्या बोलण्याची आली आहे मला चीड. प्रेम ! शब्दच किती कर्णमधुर आहे !

**शाम०**:—नाटक कादंबऱ्यांतून रिकामा रुळलेला हा पाणचट शब्द कोशांतूनच काढला पाहिजे. ( स्वगत ) अद्याप गाडीचा ठिकाणा नाहीं. टाईम टेबलस् बदललीत कीं काय ?

**श्रीयुत**:—मी तर म्हणतों कीं प्रेम आणि काव्य एवढे दोनच शब्द कायम ठेवून नव्या भाषेचा कोश बनविला पाहिजे.

**शाम०**:—ही भाषाच पुरे करा हो !

**श्रीयुत**:—प्रेम म्हणजे काय ? तुम्हाला काय कळलं ?

**शाम०**:—सर्व कांहीं कळून चुकलं आहे.

**श्रीयुत**:—चुकीचंच कळलं आहे.

**शाम**:—प्रेम म्हणजे उल्लूपणा ! सडक्या मेंदूचा एक विकार !

**श्रीयुत**:—तुमच्या मेंदूतच प्रेमाचं वारं न शिरल्यामुळें तो असा पिसाट कल्पनांच्या वाऱ्यावर तरंगतो आहे. ठिकाणावर नाहीं. तुम्हाला प्रेम कळत नाहीं मग काव्य कसं कळणार ?

**शाम०**:—( त्रासून स्वगत ) परमेश्वरा, जगांतल्या वाटेल त्या अघोर आपत्तीला धैर्यानं तोंड देण्याचा प्रसंग आण,पण अशा आचरट गोष्टीवल्हाळ कवीचं तोंड पाहण्याचा प्रसंग प्राणांतींही कुणावर आणूं नकोस. ( प्र. ) श्रीयुतराव, तुमचं हें प्रेमाचं पुराण आणि काव्याचा काथ्याकूट पुरे करा.

**श्रीयुत**:—प्रेमाचे प्रकार, काव्याच्या तऱ्हा—

**शाम**:—अहो तऱ्हेवाईक ! माफ करा. ( हात जोडतो. )

**श्रीयुत**:—अरसिक आहांत झालं. ( गाडीची घंटा होते. ) पहा ! सत्य आहे.

**शाम:**—ओ हो ! ही सेकंड बेल् ! ए हमाल,बॅग सेकंड क्लासमें ले चलो। [ हमाल येऊन बॅग नेतो. ] बरं. गुड इव्हिनिंग, श्रीयुतराव, जातो. [ घडबडीनें जाऊं लागतो. ]

**श्रीयुत:**—[चोपडी हिसकावून घेत ] जा.पण माझी कवितेची चोपडी—

**शाम:**—नंतर पोस्टनें पाठवीन.

**श्रीयुत:**—छे ! छे ! भलतंच. [ ' बरं घ्या. ' म्हणून चोपडी देऊन शामसुंदर घाईनें निघून जातो.] ' अरसिकेषु कवित्व निवेदनं ! ' या अजा-गळ अरसिकाला माझ्या मौल्यवान कवितेची किंमत कशी कळणार ? [ चोपडी चाळतो. ] पण हें काय ? हा खलिता कसला यांत ? (वाचतो) ' विमल,मला आपला म्हण नाहीं तर तुझ्या जन्माची धूळदाण–' अरेच्या, हा प्रेमाचा सांवळा गोंधळ दिसतो आहे. चव्हाटा उपयोग नाहीं. अशा प्रेमाच्या घोंटाळ्यांना आजकाल मलबार हीलचीच हवा चांगली मानवत असते. चला तर तिकडंच. [ जातो. ]

---

## प्रवेश पांचवा

[ घर—विमला प्रवेश करते. धुण्याची मोट ठेवते. ]

**विमला:**— पद ६

**कां करुणा नच कुणा ? ये दशा दारुणा ! । ना मना कामना मरणा ! तुजविणा ॥ ध्रु० ॥ हें शापसें पाप-जीवित वितरि ताप, आंवरि देवा ! कोप लोपली वा तव घृणा ? ॥ १ ॥**

जगणं ! हें कसलं जगणं ? क्षणाक्षणींच्या मरणांतील जिणं ! जिवाला जोंपर्यंत या जहरी जगपणाची जाळती जाणीव झाली नव्हती तोंपर्यंत अज्ञानाच्या आल्हादकारक अंधारांत सुखाचा काळ पळत्या पायीं किती भरभर निघून गेला ! मुग्धावस्थेंतील तो अंधार आणि जाणत्या जीवाभंवतीं पसरलेला मेसूर दुःखाचा हा अंधार ! देवा ! देवा !! वैध-व्याच्या वैश्वानरानें—दुर्दैवाच्या दावानलानें अकालीं होरपळणाऱ्या हळव्या हृदयाच्या या हतभागिनीला, या अनाथ अपंग अबलेला, समाजाच्या तिर-

स्काराला—जगाच्या निंदेला बळी पडलेल्या, या अभागी बालविषवेल अद्याप कशाला रे जिवंत ठेवलीस ? निष्प्रेम आयुष्य कंठीत जगाच्या मोकाट मैदानावर, भर दिवसाच्या काळोखांत, या जीवानं कुठवर रे वावरा-यचं ? आशा ! आतां कसची आशा ? कोणत्या आनंदाची—कुणाच्या प्रेमाची—कुठल्या दयेची आशा ? आशानिराशा, सुखदुःख, जगणंमरणं सारं एक झालं. ( रडूं लागते. ) पण रडूं नको. विमल रडूं नकोस. जन्म-भर जरी अशी रडत रक्ताची आसवं ढाळलीस तरी कुणाचा उदार प्रेमळ उदार हात तुझी ही अनाथ आसवं पुसून टाकायला धांवून येणार ? वेडे, ही अश्रुमण्यांची माळ सारा जन्म जरी जपत बसलीस तरी कोणता दयेचा देव तुझ्या दीन आळवणीला धांवणार ? देवांत दिसत नाही देव-पण ! जगांत दिसत नाहीं जीवकळा ! हो पण मी अशी विचार करीत काय उभी राहिलें ? दुर्दैवाशीं टकरा देत, येईल त्या आपत्तीची आग मला मुका-ट्यानं नको का घ्यायला ? धुवून लौकर आलं पाहिजे. नाहीं तर तेवढंच निमित्त व्हायचं सासूबाईंनां बोलायला. ( जाऊं लागते. )

**दीनानाथः**—( प्रवेशून ) ताई—ताई, वारूताईंनीं हा पहा मला लाडू खायला दिला. वारूताई चांगल्या आहेत नाहीं ?

**विमलाः**—खा बरं बाळ.

**दीनानाथः**—ताई, आपलं मुंबईला भलं जंगी घर होतं नाहीं ? मी त्यावेळीं रोज लाडू खायचा. आई होती. आपले बाबा होते. ताई, आई न् बाबा देवाच्या घरीं गेले म्हणतेस ते पुनः गं कधीं इथं येणार ? ते तिथंच राहणार होय ? ताई, सांग नां ? आपली आई केव्हां येईल ?

**विमलाः**—( स्व. ) आई ! आई ! कुठं आहे आई ? आई, तूं सुद्धां आम्हां पोरक्या पोरांना या पापी जगांत एकटं टाकून बाबांच्या मागोमाग स्वर्गाची वाट धरलीस नां ? आई म्हणून कुणाला हांक मारूं ? कोण 'ओ' देणार ? कुणाच्या कमरेला कडकडून कवटाळून जीवाचं दुःख आम्ही हलकं करावं ? गेली ! आई गेली आणि तिच्याबरोबरच निर्व्याज प्रेमाचाही लोप झाला. बाबा—बा—बा ! आपल्या लाडक्या लडिवाळांना अशा ओसाड जगाच्या जंगलांत, दैन्याच्या वणव्यांत होरपळत ठेवून तुम्ही सुद्धां परलोकीं प्रयाण कसं हो केलंत ? ( रडते )

**दीनानाथः**—ताई, असं गं काय ? तूं आपली जेव्हां तेव्हां रडतीस कां ? तुला आईची आठवण होते होय ? हांस ना जरा.

**विमलाः**—बाळ दिना, जिथं दुर्दैवानंच रडायला लावलं तिथं कोण हंसवणार ?

**दीनानाथः**—ताई, तूं रडायला लागलीस कीं मला वाईट वाटतं **गं.** ताई, तूं कां रडतेस ? तुला असं होतंय तरी काय ?

## पद ७

**रडसी सदा कां ऐसी । बससी उदास ताई ? । दिसणार**
**देवाघरिंही । आपुली न काय आई ? ॥ ध्रु० ॥ मशिं बोल नां**
**जराशी । कुर्वाळुनी उराशी । मनिं जें भलें बुरें तें । हांसोनि**
**बोल कांहीं ॥ १ ॥ प्रभु तारि जो त्रिलोका । रुसला अम्हा-**
**वरी कां ? । दैवा तशीच देवा । ये ना दया कशीही ! ॥ २ ॥**

**विमलाः**—[ स्व. ] मला काय होत आहे काय सांगू ? आम्हां बालविधवांच्या जिवाच्या जाळत्या जाचण्या आमच्या आम्हालाही नीटशा उमगत नाहींत.

**दीनानाथः**—ताई, ते पहा भगवान आले. त्यांनीं कांहीं तरी खास खायला आणलंय.

**भगवानः**—होय बाळ, खायलाच आणलंय, हें घ्या, माझा बाळराजा फार गुणाचा. पण ताईसाहेब, तुमच्या डोळ्याला कां पाणी आलं ?

**विमलाः**—आज वरसाचा दिवस ! दसरा ! आणि माझ्या दीनाच्या अंगावर धड सदराही नाहीं म्हणून थोडं वाईट वाटलं झालं.

**दीनानाथः**—ताई, आपले बाबा होते त्यावेळीं माझी जरीची टोपी होती. अंगरखा होता. आतां हा एकच अंगरखा—तोही फाटक न् मळका—

**भगवानः**—काढा, मी धुवून आणतो.

**दीनाः**—पण मी उघडा बसूं ?

**विमलाः**—( स्व. ) अरेरे, देवा, माझा बाळ दीनानाथ, दीन, अनाथ जिणं कंठण्यासाठींच कां जन्माला आला ? श्रीमंतीच्या सुखराशींत वाढला तो शेवटीं असा दीन दरवेशी होण्यासाठींच काय ?

**मावशीः**—( आंतून ) भगवान्, भगवान्, तो गोठा झाड--काय कर-तोस तिकडे ?

**भगवानः**—जी बाईसाहेब. ( जातो. )

**मावशी.**—( प्रवेशून ) ए अवदसे, अझूनी तूं इथंच ! बाई, बाई, बाई, शर्थ झाली तुझ्यापुढं ! बोला मारा कांहीं करा. तुझ्या अंगचा मुर्दाडपणा कांहीं केल्या जात नाहीं. एवढे चार पिळे कुस्करायला फावनां तुला ? आणि काय रे कार्ट्यां, तूं कां इथं ? जा. बाजारांतून भाजी आण. ऐतं गिळायला पाहिजे. सदासर्वदा काय एवढ्या बहीणभावंडांच्या गुलगुल गोष्टी चालतात दैव जाणे. चल--चालता हो, (दीनाथाला मारून घालवते) मुखस्तंभासारखी गप्प कां ? बोल, काय केलंस यावेळपर्यंत ? नाहीं म्हणायला चार घागरी पाणी ओढलं नि दोन शेर गहूं काढले जात्यावरून कीं आणखी कांहीं जुंपली होती मोटेला ? हजारदां बजावलं कीं भल्या पहांटे ऊठ म्हणून. पण अशी झोंपेची खबीर तूं कीं दिवस चार हात वर आला तरीं तूं आपली अंथरुणावरच ! उद्यां उठूं तरी नकोस पहांटे नाहीं डोळ्यांची बुबुळं बाहेर काढली तर नांवच बदलून देईन. काय मेली बायकोची जात मुलुखावेगळी ! चल जा--झटपट ये धुवून. ( विमला जाऊं लागते. ) हो खरंच झणकाऱ्यानं निघालीस खरी पण धार कोण काढील म्हशीची ? अगोदर धार काढ नि मग जाऊं दे तुझी धिंडका नदीवर.

**विमलाः**—म्हैस लाथ मारते; शिवाय मला धार काढतां येत नाहीं.

**मावशीः**—अगं म्हशी, म्हैस लाथ मारते. धार काढायला येत नाहीं. गिळायला येत कां गळभर ? हात दुखत असतील ? वा गं वा ! भारीच जिवाचे लाड करतेस कीं ? नाजुक नार आणि चाबकाचा मार ! चल हो पुढं--घे ती चरवी अन् बैस धार काढायला. पहाते कशी काढतां येत नाहीं ती ?

**विमलाः**—धार काढतां येत नाहीं मला. किती सांगूं ? दूध कमी निघालं म्हणजे तिकडूनही आणखी बोलतां.

**मावशीः**—काय म्हणालीस ? पुनः बोल. जरा वाचा उमटूं दे कीं--धार काढल्याखेरीज आज जेवण मिळणार नाहीं. याद राख. कुठली मेली पांढरपायी अवदसा घरीं घुसली कोणास ठाऊक ? लग्गीन होऊन महिना कांहीं लोटला नाहीं तोंच नवऱ्याला टाळून बसली. तिकडं माहेरी आई-

बापानांही थंड केलं. आतां बसली आहे आमच्या मुळाला! सोन्यासारखा माझा बाळ वसंत गेला. त्याच्या वांटणीची ही काळतोंडी कपाळकरंटी सांथींत उलथली असती तर? कामाचा कंटाळा तर कशाला आलीस बायकाच्या जन्माला? मेली कां नाहींस उपजतां क्षणींच? काडीचं वळण नाहीं. लाडे लाडे झाले वेडे! आहे काय नी नाहीं काय? अगबाई, पण हें काय? माझी देवपूजेची, स्वयंपाकाच्या पाण्याची कळशी घेऊन निघाली होतीस? आणलीस कोठून?

**विमला:**—देवघरांतून-—

**मावशी:**—काय देवघरांतून? राम राम राम! अगं चांडाळणी, तुला कांहीं आचार विचार? तूं तर काय लोकांतूनच उठली आहेस, पण आम्हाला कांहीं देव धर्म? सारा भ्रष्टाकार जळाला येथून तेथून! तुला कांहीं जनरीत? एवढं कळूं नये कां, फुटक्या कपाळाची सकेशा आपण! कसं शिवावं? ( मारते ) बोल, कळशीला कां शिवलीस? कशासाठीं शिवलीस?

**विमला:**—मला माहित नव्हतं. ही गोष्ट माझ्या लक्षांत आली नाहीं.

**मावशी:**—माहीत नव्हतें? अगं कपाळफुटके, तुझं हें असं झालं आहे हें तरी तुला कळतं कां? म्हणे माहीत नव्हतें. कुणी ऐकलं तर थुंकतील तोंडावर. थोतांड सारं! वेड पांघरायला पाहिजे. उद्यां स्वयंपाकांत हात घालशील. मनमानेल तसं तूं उद्दामपणानं वागायचंस आणि बोललं म्हणजे सासू कजाग! सुनेला छळते! लोकांना काय मेल्यांना? हे–हे कुणी येतं कां बघायला न् निस्तरायला! सारा वाईटपणा मात्र माझ्या माथ्यावर! ही मात्र अगदीं गुणी बाळ. जगाचा मेला न्यायच उलटा! भगवान, अरे भगवान, कुठं गेला हा थेरडा? तूं कां उभी? कळशी नेऊन न्हाणीत ठेव. पाणी टाकून घेते. जा–( रडत जाते. ) रडून साजरं करायची विद्या मात्र कशी भरपूर येते. ( भगवान येतो. ) भगवान, काय करीत होतास?

**भगवान:**—रोजचा धंदा. गोठ्याची झाडलोट, वैरणपाणी—

**मावशी:**—तेंच–तेंच. आजपासून हीं सारीं कामं हिनं केलीं पाहिजेत.

**भगवान:**—छे–छे–छे–बाईसाहेब, भलतंच? अहो हीं कामं गड्याचीच—

**मावशी:**—तूं गप्प बैस. तुला काय कळतंय ? इला पुजून ठेवायची आहे कां देव्हाऱ्यावर ? मारे अष्टौ प्रहर बटकीसारखी राबवून घेतल्यावर कुठवर झडत नाहीं अंगाचा आळस ? लकडी शिवाय मकडी वळत नाहीं!

[रागानें फणफणत जाते.]

**भगवानः**—धन्य आहे या मावशीबाईची ! खरी महामाया ! ताईसाहेब किती गुणाच्या ! देवता ! खास देवता ! पण ही बया मात्र अशी आणि ते आमचे सोकाजी शामसुंदरराव तसे ! मी ओळखून आहें त्याचा डाव. प्रसंग पडला तर घेईनच पाहून. (गहिंवरून) ताईसाहेब—पण इकडंच आल्यां या. अरेरें, काय ही यांची दैना !

**विमलाः**—भगवान,

**भगवानः**—काय ताईसाहेब ?

**विमलाः**—ती शेणाची पाटी तेवढी बाहेर परसांत नेऊन ठेव रे. मला उचलत नाहीं.

**भगवानः**—काय गोठा तुम्ही झाडलांत ?

**विमलाः**—होय. अतां—

**भगवानः**—ताईसाहेब, हीं कामं तुमचीं नव्हत. अहो कुणबटाच्या धणधाकट बायकासुद्धां जेरीला येतात—

**विमलाः**—आणि त्यांतून हे बघ, भगवान् काल धार काढतांना म्हशीनं लाथ मारली. हात सुजला आहे. बोटं ठणकताहेत.(सुजलेला हात दाखविते.)

**भगवानः**—अरेरे !बरं तुम्ही जा. मी करतो सारं. साऱ्या जगावरून ओवाळून टाकलेली ती बया—

**विमला**—बाबारे, आपलं पूर्वसंचित खोटं ! दुर्दैवाशिवाय दुसऱ्या कुणाला दोषी धरायचं? मला तर किनई या आगींत होरपळण्यापेक्षां विष खाऊन प्राण द्यावंस वाटूं लागलं आहे. जगांत जिव्हाळ्याचं असं कोणीच नाहीं. आईचं आंतडं, बापाचा पाठिंबा, पतीचं प्रेम, कांहीं कांहींच लाभलं नाहीं. माझं एक असो. पण माझ्या दीनानाथाचं दैन्य मला पाहवत नाहींरे ! दुष्ट दैवानं दुस्मान दावा साधला—( रडूं लागते. )

**भगवानः**—उगी, रडूं नका, तुम्हीं मला माझ्या लेकीसारख्या, उगी. आहे एक मासलेवाईक माणूसघाण स्वभाव म्हणावं न सोडून द्यावं. बरं, हा शेणामातीचा हात धुवा चला. ( भगवान जातो. )

**विमला**:—जिथं सारा जन्मच मातीमोल झाला तिथं याचं काय ? हात धुवून दुर्दैव पाठीं लागल्यावर हा हात अश्रूंच्या पाण्यानंच धुतला पाहिजे. [ जाऊं लागते. वारुताई समोरून प्रवेश करते. ] कोण वारुताई ? फार गडबडींत दिसतां ?

**वारुताई**:—विमल, आनंदाचं वर्तमान— [ शामसुंदर प्रवेशून आड उभा राहतो. ]

**विमला**:—अगबाई तें कोणतें ?

**वारुताई**:—नरेंद्रभाऊ डॉक्टरीची परीक्षा फर्स्ट क्लासांत पास झाला. आतांच हें पत्र आलें.

**विमला**:—[ सहर्ष ] खरंच कां ?

**वारुताई**:—खरंच म्हणजे ? आणि उद्यां परवां येणारही आहे तो. बरं पण जातें. [ जाते. ]

**शाम**:—[ पुढं येऊन ] कसं काय वहिनी ? ठीक आहे ना ?

**विमला**:—कोण भाउजी ? केव्हा आलांत मुंबईहून ?

**शाम**:—एक तास झाला.

**विमला**:—भाउजी, नरेंद्र म्हणे, फर्स्ट क्लासांत पास झाले. डॉक्टर झाले. तुमच्या बरोबरच शिकत होते नाहीं ते ? [ शामसुंदर दांत ओंठ खातो. ] उद्यां परवां येणारही आहेत म्हणे.

**शाम**:—[ स्वगत ] समजलों. या पोरीनं हे विषारी वाग्बाण वर्मी झोंबण्यासाठीं, जीवाला जाळण्यासाठीं तर सोडले नसतील ? नरेंद्राची प्रतिष्ठा माझ्या पुढं ? कळलं. इच्या मनोवृत्तीचा कल कसा कुणीकडं झुकतो आहे हें स्पष्ट कळलं. परस्पर प्रेमाच्या मूक भावना हृदयाच्या हृदयांत किती जरी दडपून ठेवल्या तरी त्यांना वाचा फुटून त्यांचं अस्तित्व जाहीर होणारच ! (आंतून दिनानाथ रडल्याचा आवाज येतो.) [ प्रगट ] अरे पण दीना क रडतोय ? [दीना पळत येऊन विमलेला मिठी मारतो. मावशी लाटणं घेऊन पाठीं लागली आहे. ]

**दीना**:—[ रडत ] ताई, ताई—

**मावशी**:—अरे, कार्ट्या, तुला जगांतलं ज्ञान येणार तरी कधीं ? असाच कां संसार करशील पुढं ? शाम, हें हे पहा. दोन आणे मातींत दवडले. लांकड्यासारख्या भेंड्या वाळक्या आणि ही मेथी कचऱ्यासारखी !

दहा वर्षांचा घोडा वाढला तरी भाजी आणायला येत नाहीं अजून. (मारते.)

**शाम:**—पण मावशी, पुरे नां आतां ? त्याला भाजी नाहीं आणतां येत मग सांगतेस कां आणायला ? आज सणावाराचा दिवस ! दसरा आज. मारूं नको त्याला. दुर्दैवानंच त्या बिचाऱ्यांनां गांजलं आहे म्हणून अशीं तुझ्या आश्रयाला आलीं आहेत. [ गालगुच्चे घेतो. ]

**मावशी:**—खायला काळ आणि भुईला भार ! उलथनां कां एकदांचं कारटं ? ( मारते. )

**विमला:**—पण मारून मारून त्याचा जीव कां घेणार आहांत ? नका हो मारूं त्याला. नका असं अभद्र बोलूं. एकुलता एक भाऊ—या जगांत त्याच्याशिवाय मला—[ रडूं लागते. ]

**मावशी:**—तर—तर—मोठा कैवार घेते भावाचा. [ त्याला तिच्या हातून हिसकावून घेते. ] पुनः आणशील अशी भाजी ? गप्प रडूं नकोस. [ डोक्यांत लाटणें मारून जमीनीवर लाथाडते. खोक फुटून रक्त वाहतें. शाम, मावशी जातात. ]

**विमला:**—[ त्याला उठवून जवळ घेते. ] हायरे दुर्दैवा ! देवा ! तुला आमची दया येणार तरी केव्हां ? दीनवत्सला, नको—इतका निष्ठुर होऊं नकोस.

### पद ८

**धांव सदया देवराया ! सभय हृदया ठाव ना ! हाय सखया ! जाय विलया काय करुणा-भावना ? ॥ ध्रु० ॥ संकटीं त्राता अनाथा दिनानाथा ! तूंच नां ? । दे दया-छाया जिवाच्या या हराया तापना ॥ १ ॥ शून्य हा सारा पसारा ! दैन्य जाळी जीवना: । दीनकैवारी ! निवारी यातना, ही याचना ! ॥ २ ॥**

---

## प्रवेश सहावा

[ हँगिंग गार्डन—नरेंद्र आणि सरोजिनी प्रविष्ट. ]

**सरोजिनी:**—अहाहा ! परमेश्वरी शक्तीनं सौंदर्याच्या सहजसुंदर शृंगार-

साजानं खुलविलेल्या या खुल्या निसर्गाची नवलाईची जादू अजब नव खरीच; पण मानवी प्रयत्नांनीं नटवलेल्या--करामतीनं निर्मिलेल्या या कृत्रिम बगिच्याचीही ही शोभा, नरेंद्र, तितकीच अपूर्व आणि आल्हादकारक नाहीं कां ? खुल्या आनंदानं हंसणारीं हीं गोंडस फुलं, विशाल वृक्षाला कौतुकानं कवटाळणाऱ्या या सुंदर फुलवेली, जागजागीं उभारलेले हे मनोहर लताकुंज, खरोखर, मानवी बुद्धीचं वैभव किती थोर आहे ! उदास जीवाला घडीभर तरी रिझवायला हें उद्यान म्हणजे किती उत्तम विश्रांतिस्थळ आहे !

## पद ९

**देइ आनंद-लाभा विशाला दशदिशाला । प्रभु उधळी चला-चलिं यशाला प्रेमलीला ॥ध्रु० ॥ नवल नवति न्यारी ! खुलत डुलत प्यारी गुणकला मंगला सृष्टि-बाला शांति-शीला ! ॥१॥**

**नरेंद्र:**—या उद्यानाची शोभा अंतःकरणाला आनंददायक आहे खरी' पण मनाची मोदवृत्ति एकदां मावळली कीं पुनः फुलणं मुष्कीलीचंच असतं. विषण्ण विचारांनीं वृत्तींची उदासी वाढवून दुबळ्या दिलावर आपला मारा सुरू केला कीं स्वर्गीच्या नंदनवनांतही सहारा वाळवंटाचीच रुक्ष शून्यता दिसूं लागते.

**सरोजिनी:**—पण अशा या उदास उद्गारांचं कारण ? नित्याच्या हंसऱ्या मुद्रेवर चिंतेची छटा चमकण्याचं कारण ? तुम्ही तर आतां एम्. बी. बी. एस् झालांत. तुमचं आतां नवं आयुष्य सुरू होऊन---

**नरेंद्र:**—त्या नव्या आयुष्याबरोबरच नव्या विचारांनाही प्रारंभ झाला आहे. छात्रवृत्तींतून यशस्वी रीतीनं पार पडून गृहस्थवृत्तीच्या सीमा रेषेवर आज मी उभा आहें म्हणूनच जबाबदारीच्या जाणिवेनं जिवाला जबरदस्त झोला दिला आहे.

**सरोजिनी:**—अगबाई. हें तर नवलंच. वेडर !

**नरेंद्र:**—यांत नवल तें काय ? चार वर्षांपूर्वी मेडिकल कालेजांत प्रथम प्रवेश केला तो प्रसंग किती बहारीचा ! नवी परिस्थिती, नव्या ओळखी, नवी स्वैरता, सारीच नवी नवलाई ! त्यावेळीं निष्काळजी बेफिकीर वृत्तीनं भावी आयुष्याची रूपरेषा रेखाटतांना, जगाचा अनुभव नसलेल्या नवख्या तरुणाला व्यवहारी जगाच्या भयाण आखाड्याची कल्पनाच नसते. कल्प-

नेच्या स्वर्गीय सुखाशेवर वाढलेला जीव कठोर सत्यांच्या ठोकरींनीं बेजार होऊन या प्रॅक्टीकल जगांतील कडू अनुभवाचे जहरी प्याले पितांना भांबावून भलत्याच मार्गानं वहात जाण्याचा बराच संभव असतो. कर्तव्याची खरी दिशा दिसत नाहीं किंवा ती दाखविणारा प्रेमळ हितचिंतकही त्याला लाभत नाहीं. वर्ल्ड ऑफ कॉंपिटिशन ! परोत्कर्ष सहिष्णुता, परोपकार बुद्धि, सक्रिय सहानुभूती, यांचा आजकाल अभावच आहे. स्वार्थसाधू बेमानांनीं भरलेल्या या दुनियेच्या बाजारांत दुसऱ्याला हाणून पाडण्यासाठीं हपापलेल्या हितशत्रूंचाच सुकाळ फार !

## पद १०

**झुंझार खासा मत्सर हा साचा ॥ ध्रु० ॥ जीवन-समर घोर । करि नीति-संहार । गुणबल सकल ठार ! ॥१॥ नटला असुखसार हा स्वार्थ-संसार ! दिसत न मति उदार ॥ २ ॥**

**सरोजिनी:**—असं आहे खरं. पण आपला मार्ग कांटण्याची अक्कल-हुशारी, अनुकूल साधनांची परिस्थिती निर्माण करण्याची प्रगल्भ बुद्धिमत्ता आजकालच्या पदवीधरांत नसते म्हणूनच ते या व्यवहारी जगांत कुचकामाचे, गुड फॉर नथिंग ठरतात.

**नरेंद्र:**—पण हा दोष त्यांचा नसून त्यांना मिळालेल्या सदोष शिक्षण-पद्धतीचा आहे. चार वर्षे कॉलेजांत मेंदू पचवून रक्ताचं पाणी करून परीक्षा पास व्हाव्यांत एवढंच त्याचं ध्येय ! बरं, आर्टस् कोर्सपेक्षां दुसरा कोर्स घेणं जरी श्रेयस्कर असलं तरी सांपत्तिक परिस्थितीची अडचण आड येते; शिवाय पदवीचा मोह अनिवार असल्यानं थोडक्या खर्चाच्या किफा-यतशीर धंदेशिक्षणाकडे तरुण मनाची प्रवृत्ति होत नाहीं. म्हणूनच ग्रॅज्यू-एट होऊन दोन जीवांचांच काय पण एका जीवाचाही चांगला चरितार्थ चालणं प्रस्तुत परिस्थितीला कठिण झालं आहे.

**सरोजिनी:**—आर्टस् कॉलेजं म्हणजे कारकुनांचे तांडे निर्माण कर-णाऱ्या, मानसिक व शारीरिक शक्तीचा ऱ्हास करणाऱ्या गिरण्याच आहेत खास ! पण तुम्हाला काय ? तुम्ही एम्. बी. बी. एस् ! त्यांतून फर्स्ट क्लास !

**नरेंद्र:**—फर्स्टक्लास आणि सेकंडक्लास ! जगाच्या व्यवहारी दृष्टीला दोहोंचा

दर्जा एकच आहे. सरोज, भलत्याच भावनांचं काहूर मनांत माजल्यामुळं कांहींच सुचत नाहीं. यावेळीं धीर देणार कुणी प्रेमळ जीव---

**सरोजिनी**:---कुणीच नाहीं कां ?

**नरेंद्र**:---या प्रश्नाचं उत्तर तुझं हृदयच तुला देईल. आपल्या परस्पर प्रेमाचा परिचय होऊन परिचयानं आपलं प्रेम वाढलं. निर्हेतुक, निर्व्याज प्रेमाची भावना वाढत्या विकासानं फुलून, समान ध्येय, समान शील, समान विचार यांनीं आपलं जीवन समरस झालं. समान अभ्यासक्रमाची, स्वभावाची जोडही आपल्या प्रेमसंयोगाला पोषकच झाली पण आतां---

**सरोजिनी**:---त्या प्रेमसंयोगाची सुंदर स्मृति चिरस्थायी व्हायला-- ( लाजते. )

**नरेंद्र**:---बोल, बोल, ओंठावर अडलेले ते गोड शब्द मोकळ्या मनानं बोल. प्रेमाच्या नशेंत उदासीन मनोवृत्ति क्षणभर तरी जागच्या जागीं जिरून जाऊं देत.

## पद ११

**बोल बोल सखि ! प्यारे ! अधरिं जे उसळले स्वर्ग विचार ॥ ध्रु० ॥ मुक्या मनींचे प्रगटतां भाव लाजरे सारे । सुभाग्य भासत हांसत आज साजरें. ॥ १ ॥**

**सरोजिनी**:---कवीचं अंतःकरण तर अकल्पित आनंदाचं अत्युच्च अधिष्ठान असतं. शिवाय तुम्हींच नां आपल्या ' जीवनांतील जादू ' या उत्कृष्ट कादंबरींत ' आनंदवृत्ती शारीरिक मानसिक रोगांवर रामबाण आहे ' असं तत्त्व प्रतिपादन केलं आहे ! आशावादीपणाच्या आवेशानं मंजूळ काव्याचे सुरेल सूर आळवणाऱ्या या कवीच्या भावनाप्रधान हृदयाला मळ-कली सूडमचं विपारी वारं कां शिवावं कळत नाहीं.

**नरेंद्र**:---प्रत्यक्ष परिस्थितीचा पेंच पुढं पडल्यावर कल्पनाशक्तीची कर्तबगारी कवडीमोलच ठरत असते. वस्तुस्थिति आणि तिची अनुमानाची अप्रत्यक्षता यांत जमीन अस्मानाचं अंतर आहे. समाधानवृत्तीच सुखाचं सर्वतोपरी सहज सुलभ साधन आहे हं मलाही समजतं. पण समाधान मानावं कसं ? मातापित्यांच्या प्रेमछत्रावांचून पोरकं जिणं कंठणं कठिण आहे ! जगांत जिव्हाळ्याचं जवळचं

म्हणायला फक्त एक माझी ताई! वयाच्या पांचव्या वर्षी वडील वारल्यानंतर काकांनीं आम्हांला ईथं मुंबईला आणलं, मला उत्तम प्रकारें शिक्षण दिलं; पण तेही माझ्या दुर्दैवानं इन्फ्ल्यूएंझाला बळी पडले! जन्मदात्रीच्या जिव्हाळ्याला तर जन्मतःच पारखा झालों! आतां माझं कौतुक करणारं कोण आहे? (सुस्कारा सोडून) डेस्टिनी! मग बोल, सरोज, जिवाला जीव देणारा जिवाचा जिवलग जोडीदार जर जगाच्या जंजाळांत लाभला— संसाराला स्वर्गाच्या शोभेनं सजविणारी सद्गुणी स्वामिनी लाभली तरच आतां आनंद! पण विधीच्या विषमतेची विचित्रता जशी अगम्य तशीच अघोर आहे नां?

**सरोजिनीः**—भवितव्यतेच्या झांकल्या मुठींत काय आहे हें कुणाला कसं कळणार?

**नरेंद्रः**—मानवीशक्तीला भवितव्यतेपुढं नमावंच लागतं! या माझ्या प्रीतीच्या किशोरगंगेला सजविण्यासाठीं सुखाशेच्यी फुलें वेंचून जीवाभावाच्या नव्या मोहनमाळेनं मी इची प्रत्यही पूजा बांधतों खरी,पण सरोज,भविष्यकाळ आपल्या प्रेमाचं हेंच स्वरूप चिरकाल ठेवील कशावरून? हृदयपटलावर रेखाटलेल्या सुखाशेच्या सर्वांगसुंदर चित्राला चिरकालीन सफलता लाभेल कां?

**सरोजिनीः**—काय हें अप्रासंगिक विचार!

**नरेंद्रः**—निदान तुझ्या या प्रेमळ सान्निध्यांत तरी ते अप्रासंगिक आहेत खास.पण सरोज,मानवी मनोवृत्तीची एक मजा आहे. ऐन दुःखाच्या त्याच प्रमाणें भर सुखाच्याही प्रसंगीं गतकाळावर ती आपली नजर वळविते. तेव्हां तुझ्या स्वर्गीय सहवास सुखाच्या साम्राज्यांत स्वैरपणें विहार करतांनाही अशा विचित्र विचारांची कालवाकालव ओंठाबाहेर उसळावी यांत नवल काय?

**सरोजिनीः**—पण या उदासीच्या संसर्गजन्य रोगाचा माझ्या मनावर काय परिणाम झाला याची कांहीं कल्पना? कवींना तर म्हणे साऱ्या जगाचं अंतःकरण कळत असतं!

**नरेंद्रः**—न कळत कां होईना माझा हा अपराध झाला खरा. आतां या अजाण अपराध्याला शिक्षा—

**सरोजिनीः**—पण हा कांहीं पहिलाच अपराध नव्हे, दुसराही नाजुक अपराध—

**नरेंद्रः**—तो कोणता बुवा?

**सरोजिनी**:—दीनदुबळ्यांची दिलदौलत हरण करून—( शृंगार भावानें सलज्ज पाहते. )

**नरेंद्र**:—आलं लक्ष्यांत. पण या अपराध्याला शिक्षा? नेत्रकटाक्षांनीं असं जर्जर करणार? कीं मंद मधुर हास्याच्या गुलाबी झुळकीनं हृदय-सागरांत वादळ उठवून मनाचं तारूं प्रेमाच्या तुफानांत बुडविणार?

**सरोजिनी**:—इश्श हें काय गडे? भलतंच बोलणं!

**श्रीयुत**:—[ प्रवेशून ] रोमान्स पोइट्री चार्म! ( त्या दोघांकडे पाहून ) हॅलो! इथं तर रोमान्सचा रंग, पोइट्रीचा स्वर्ग, चार्मची लयलूट आहे! प्रणयी जनांचं असं लताकुंजाआड दडलेलं प्रेम शोधून काढायला कवीच पाहिजे. ' जहां न पोहोंचे रवी वहां पोहोंचे कवी ' असं एका मुसलमान वेदशास्त्रसंपन्नानं म्हटलं आहे तें कांहीं खोटं नाहीं. प्रेम हें अशा उद्यानांतच भटकायचं हा आम्हां कवींचा ठाम सिद्धांत खोटा कसा ठरणार? कवीची लेखणी म्हणजे लडिवाळ प्रेमाचे लबाड लपंडाव बाहेर फोडणारी तलवार! कवीचं कलम म्हणजे प्रेमाच्या नाजुक गुंतागुंती उकलणारं वकिली कायद्याचं कलम! [ नरेंद्र एक फूल तोडून सरोजिनीच्या बुचड्यांत खोंवतो ] अहाहा! किती मनोहर काव्यमय प्रसंग हा! टिपून ठेवला पाहिजे. [डायरींत लिहितो.] बा प्रणयी वीरा! तुझा विजय असो! धन्य आहे तुझी! (निरखून पाहून) ओ लो! हा तर नरेंद्र! या भाग्यशाली प्रणय बहादुराचा हा मेडिकल रोमान्स दिसतो! आतां टाकतो यांच्यामध्यें एकदम उडी न् करतो रंगाचा बेरंग! पण हें रंगीबेरंगी फुलपांखरूं कुठलं? ' हें पाखरूं मजसि येइल काय कामा ' वः कवीश्वर रघुनाथपंडित! आपल्या या ओळीची सार्थकता आज झाली. ' हें पाखरूं० '—' ऐसें कवे! न वद. संशय कां रिकामा? '—[ नरेंद्राच्या पाटीवर थाप मारतो. ] कसं काय दोस्त!

**नरेंद्र**:—कोण? कविराज? ठीक आहे?

**श्रीयुत**:—माझं आहे तसंच आहे. पण तुझं ठीक चाललेलं दिसतंय. या कोण? नखशिखांत नाटकी नखरेलपणाचा नमुना! फॅशनचं प्रदर्शन!

**नरेंद्र**:—चुप आचरट कुठला! गेलासच आपल्या जातीवर! या मिस् सरोजिनी! माझी क्लास फेलो, प्रॅक्टीकल पार्टनर—

**श्रीयुत**:—काय म्हणतोस? प्रॅक्टीकल पार्टनर? भाग्यवान आहेस बुवा! बायकांनांही मेंदू असतो तर! हुषार आहे. हुषार आहे.

**नरेंद्रः**—हो हो. कांहीं शरम बाळग ! यंदा M. B. B. S. झाली आहे. बायका विद्वान् होऊन पुरुषांच्या पुढं चालल्या !

**श्रीयुतः**—काय बिघडलं त्यांत? बायकांच्या मागून धांवणं हा पुरुषांचा स्वभावधर्मच आहे. किती झालं तरी आमचा दर्जा त्यांच्या वरचाच ! काव्याच्या नादानं माझ्या शिक्षणाला हरताळ फांसला ! नाहीं तर मी सुद्धां एव्हांना डॉक्टर—बॅरिस्टर—निदान प्रोफेसर तर झालोंच असतों.

**नरेंद्रः**—प्रोफेसर ! तूं तर प्रोफेसर आहेसच काव्याचा ! तुझ्यासारखा कवि तुझा तूंच. महाराष्ट्राचा बायरन, कालिदास तूं !

**श्रीयुतः**—( आनंदानं ) अरे मी मॅट्रिक तरी आहे. कालिदास मॅट्रिक-सुद्धां नव्हता. पण तोंडापुरतं तर बोलत नाहींस ना ?

**नरेंद्रः**—तोंडापुरतं बोलायला तूं काय असा अप्सरा आहेस कीं तुझं तोंड वर्णनीय आहे. आतां या एका तोंडाचीं दोन तोंडं केलीं तर मात्र तुझें हें तोंड खास वर्णनीय होईल.

**श्रीयुतः**—पण नरेंद्र,खास या श्रीयुतासाठीं एक गोष्ट कर. माझी एवढी इंट्रोडक्शन करून दे ना यांच्यांशीं ? ( मिस्किलपणं हंसत ) अशा ओळखी झालेल्या बऱ्या.

**नरेंद्रः**—मिस् सरोजिनी, हेच ते श्रीयुतराव ! हे कवि आहेत. लेखक आहेत. यांचं आडनांव पोकळडोके. (श्रीयुतास.) या मिस् सरोजिनी. यंदाच M. B. B. S. झाल्या आहेत.

**श्रीयुतः**—( शेकहँड करून ) गुड इव्हिनिंग !

**नरेंद्रः**—आतां माझी इंट्रोडक्शन. श्रीयुत मी—

**सरोजिनीः**—ही राहूं दे थट्टा. हे काय बिझिनेस करितात ?

**नरेंद्रः**—कवितेचा बिझिनेस करतात. [ एकीकडे ] मठ्ठ डोक्यांतून लठ्ठ कविता कचऱ्याचा भलेलठ्ठ गठ्ठा काढायचा आणि तो सत्याग्रहाच्या हट्टानं संपादकाच्या गळ्यांत बांधायचा. असे हे एक गल्लीगणेश कवि आहेत !

**श्रीयुतः**(स्व.)—आतां द्यावी स्वतःची जाहिरात फडकावून. खासा मोका जुळून आला आहे. (प्र.) मी कवि, लेखक, टीकाकार, कादंबरीकार, नाटककार आहे. सुरस कविता, भारदस्त लेख, मार्मिक टीका, चटकदार कादं-बऱ्या, लोकप्रिय नाटकं, नाट्यनिरीक्षण, काव्यपरीक्षण—

नरेंद्रः—[ मध्येंच थांबवून ] अरे बाबा, पुरे, पुरे, तूं खंबीर लेखणी-बहादुर आहेस, वाद कां ? पण हे चऱ्हाट पुरे कर.

सरोजिनीः—( श्रीयुतास ) कोणत्या नांवानं कविता प्रसिद्ध करतां ?

श्रीयुतः—कवितेसाठीं खास नांव.

नरेंद्रः—कुणाचा सुत, तनय, पुत्र, कांत, नाथ, रमण,—

श्रीयुतः—डॅम इट्. माझं टोपण नांव श्रीयुत—

नरेंद्रः—' काव्यचोर '—

श्रीयुतः—छे ! छे ! श्रीयुत ' कैलासवासी '

सरोजिनीः—कैलासवासी ! अजब नांव आहे.

नरेंद्रः—कसं आहे डोकं ! ' दिसे टेंगणी मूर्ति ही बावळीशी '—

श्रीयुतः—पण ' असे शक्ति या दिव्य वर्ल्डीत खाशी '—

सरोजिनीः—शीघ्रकवि आहेत !

श्रीयुतः—मी असा लेचापेंचा कवि नाहीं. मी राष्ट्रशाहीर आहे. माझ्या कवितेंत महाराष्ट्र, शिवाजी, देशभक्ति असे अगडबंब शब्द येतात. शिवाय, तलवार, मराठमोळा, अशा जोमदार शब्दांचा दणदणाट, भारदस्त कल्पनांचा खणखणाट—

नरेंद्रः—( एकीकडे ) प्रतिभेचा ठणठणाट—

श्रीयुत—सर्व कांहीं असतं. राष्ट्रीय भावना नुसत्या हुडकूस घालतात.

नरेंद्रः—पण गड्या ! तूं प्रेमी नाहींस-

श्रीयुतः—व: कवि असून प्रेमी कसा नसेन ? प्रेम आणि काव्य हीं आवळीजावळी भावंडं आहेत. मनरमणीचा मुखचंद्र दिसला कीं कवीच्या हृदयसागरांतील प्रेमलहरींना भरमसाट भरती येऊन काव्यस्फूर्तीचा प्रचंड धबधबा कल्पनेच्या कड्यावरुन कागदावर कोसळूं लागतो—

नरेंद्रः—आणि त्या कोसळत्या धबधब्याखालीं अक्कल दबली जाऊन ते व्यवहारशून्य बनतात. श्रीयुत, तुझ्या हातांत श्री तर नाहींच पण ' ग ' ची बाधा मात्र भरपूर झाली आहे तुला. तुझ्यासारख्या कविब्रुवांचा असा आचरटपणा आणि पोकळ अभिमानाचा ताठा जातिवंत कवींच्या कीर्तीला गालबोट झाला आहे.

सरोजिनीः—[ स्वगत ] कवि वेडे असतात याचं प्रत्यक्ष प्रत्यंतर

आज पुरतेपणीं पटलं. नरेंद्रसुद्धां कवीच आहेत पण हे श्रीयुतराव म्हणजे घमेंडखोर कविब्रुवांचा कॉमन टाईपच दिसतो.

**नरेंद्रः**—बरं ए कवि—

**श्रीयुतः**—कवि म्हणूं नकोस. कैलासवासी म्हण.

**नरेंद्रः**—पण जिवंत आहेसनां डोळ्यापुढं ?

**श्रीयुतः**—वः तूं तर नाटकी कोट्या लढवायला लागलास.

**नरेंद्रः**—बरं तुझं हें नाटक राहूं दे. आपला हा प्रवेश प्रमाणाबाहेर वाढला. चला.

**श्रीयुतः**—ही पहा, अंधाराचा काळा बुरखा पांघरून रात्ररमणी इम्हां-डाच्या मैदानांत—

**नरेंद्रः**—मरूं दे तिकडं.

**श्रीयुतः**—छे, ही सुंदर कल्पना कवितेंतच कोंबली पाहिजे. (चोपडी काढतो. शामसुंदरनें ठेवलेलें पत्र खालीं पडते.) बरं येतों. नमस्कार! वंदेमातरम्! गुड डे!

**सरोजिनीः**—गुड डे ! कविराज रात्र पडली. दिवस संपला.

**श्रीयुतः**—अहो ! सन् नेव्हर सेट्स अपॉन ब्रिटिश एम्पाअर ! इंग्रजी राज्यावर सूर्य कधींच मावळत नाहीं ! गुड डे, गुड डे ! [जातो.]

**नरेंद्रः**—त्या अजागळाचा हा कागदाचा कपटा कसला पडला ?

[ उचलून घेतो. ]

**सरोजिनीः**—असेल एखादी कविता खरडलेली त्याच्यावर. दुसरं काय ?

[ नरेंद्र वाचतो. क्रोधानं बेफाम होतो. ]

**नरेंद्रः**—अरे हरामखोरा !—

**सरोजिनीः**—काय ? काय तें ?

**नरेंद्रः**—शामसुंदरच्या पाजीपणाचा प्रत्यक्ष पुरावा ! त्या अभागी विमलेला हा राक्षस—पण सरोज, तूंच वाच हें सारं. ( पत्र देतो. ) नंदा-पूरला उद्यां न जातां आजच मेलनं जातो. कारण डिले इज डेंजरस्. अरेरे,

## पद १२

**शशिकला विकल-बल या काला । कुटिल राहु खल घाला. ॥ ध्रु० ॥ कुमति कामुक सजला अबला विधवा बाला छल-नाला ॥ ॥ धरि सुधा-मुख विष-कलशाला, करि खल उन्मादें लीला ॥ २ ॥**

# प्रवेश सातवा.

[ विमला पाटावर तांदूळ निवडीत बसली आहे. ]

**विमलाः**—[ स्व. ] ईश्वरी इच्छेच्या लीलालहरीवर खेळणाऱ्या या जगांत या अभागी विमलेचा जन्म झाला, पण गेला मुक्या गुलामगिरींत! हीनदुबळ्यांना देमाय धरणी ठाय करणाऱ्या या दानवी दुनियेंत आशाळभूत मानवी प्राण्यानं आशातुर ओंठाला लावलेला सुखाचा प्याला रिता होतों न होतो तोंच दुःखाचा जहरी प्याला यदृच्छेनं त्याच्या ओंठाला भिडतो. सुखाचा सुधारस दुःखाच्या प्याल्यांतून प्यावा अशीच कां त्या न्यायनिष्ठुर परमेश्वराची योजना असेल! सुखदुःखाच्या सरहद्दी एकच आहेत काय? पण हाय! दुर्दैवाच्या तुटक्या कड्यावरून कडेलोट होऊन दैन्याच्या दरींत दडपून गेलेल्या या माझ्या जीवानं आतां सुखदुःखाचा विचार कशाला करावा? माझ्या सुखदुःखाचं स्वरूप एकच झालं नाहीं कां? सात्विक सुखाचा मार्ग कसोटीच्या कांटेरी कांतारांतूनच गेलेला दिसतो. पण हताश आयुष्याच्या ओसाडींत निराशेची निशा दाटल्यावर सुखाशेचा कोंवळा किरण वेड्या दुराशेला कोठून दिसणार? आईच्या आंतड्यानं कोण आपलेपणा दाखविणार? पित्याच्या प्रेमानं कोण माझ्यावर मायेची पांखर घालणार? आतां मला मरणालाच मित्र मानला पाहिजे.

पद १३

**काळसखा हा भला मला गमला ॥ ध्रु० ॥ चांद सुखाचा निखळे कैंचा! उसळे घन-तम अरिसम जमला ॥ १ ॥ विफल धिक् जिणें लाजिरवाणें! झुरता भाव न जनिं वनिं रमला ॥ २ ॥**

पण हो, कुणाच्या दिलाची दिलदारी माझ्या या भग्न हृदयांशीं मुक्या सौजन्याची साथ करीत आहे? नरेंद्र येणार असं वारूताईनीं सांगितल्यापासून जिवाला उगीचच हर्ष होऊन हळवा हुरूप चढला आहे. काय असेल तें असो! पण नरेंद्रांचं नांव निघतांच निष्कारण शामसुंदरांच्या कपाळाला

आंख्या कां चढतात बरं ? आणि माझ्याकडं पहातांना त्यांच्या दृष्टींत खुल्या दिलाचा मोकळेपणा दिसत नाहीं तो कां ? छे बाई, त्यांच्या हृदयाचा ठावच लागत नाहीं. शामसुंदर—

**शामसुंदरः**—(प्रवेशून) वहिनी, विमलाताई—

**विमलाः**—कोण ? [ चटकन उठून उभी राहते. )

**शामसुंदरः**—मी शामसुंदर. (स्व.) अशा एकांताची अनायासें सोन्याची संधी सांपडल्यावर माझं मनोगत इला कळविण्यासाठीं पत्राची योजना करण्याचं अतां काय प्रयोजन उरलं आहे ? आतां पाहूं, गळाला मासा सिध्या रितीनं लागतो कीं नाहीं ? [ प्रगट ] विमलाताई, आम्हाला एवढी कांहीं खडी ताजीम द्यायला नको.

**विमलाः**—ही खडी ताजीम नसून शिष्टाचाराची मर्यादा आहे.

**शाम०ः**—वडील माणसापुढं हा शिष्टाचार शोभतो, पण—

**विमलाः**—तुम्हीही माझे वडील दीर आहांत नां—?

**शामः**—पण सख्खा नाहीं नां ? मावसदीराची एवढी मिजास कशाला ?

**विमलाः**—पण भाउजी,

**शाम०ः**—भाउजी नको म्हणूं मला. मी कुठं नेहमींच तुला ' अहो वहिनी ' म्हणतो ?

**विमलाः**—मला, सासुरवासिणीला, त्यांतून बालविधवेला ? मला कोण देणार मान ? ज्यानं त्यानं तुसडपणाच्या तुटक वर्तनानं पायाखालीं तुडवावं, अपमानाच्या ठोकरींनीं पदोपदीं ठेंचावं, टोंचून बोलण्याचा इंगळ्या जिवाला डसवाव्यांत—हेंच माझ्या नशिबीं ! निंदा, जाच, विटंबना यांची धनीण म्हणजे बालविधवा सासुरवासीण !

**शाम०ः**—चालायचंच, जग हें असं आहे !

**विमलाः**—दीनदुबळ्या अनाथ वैधव्याला सौजन्याची सदय सहानुभूति हा समाज कुठं दाखवतो ? दिखाऊ दिलगिरी दाखविण्याइकी सुद्धां दिलदारी त्याच्या दगडी दिलांत दिसत नाहीं !

**शाम०ः**—नको, विमल, असे जिवाला जाळणारे निराशेचे निश्वास सोडूं नकोस ! तूं अनाथ आहेस म्हणूनच तुझी दया येऊन मी तुला सनाथ करूं इच्छितो. एकदां या सुंदरला आपला म्हण, म्हणजे जगांतली सारी सुखं तुझ्या पायांशीं लोळवितों. [ जवळ जातो. ]

# प्रवेश सातवा.

[ विमला पाटावर तांदूळ निवडीत बसली आहे. ]

**विमला:**—[ स्व. ] ईश्वरी इच्छेच्या लीलालहरीवर खेळणाऱ्या या जगांत या अभागी विमलेचा जन्म झाला, पण गेला मुक्या गुलामगिरींत ! दीनदुबळ्यांना देमाय धरणी टाय करणाऱ्या या दानवी दुनियेंत आशाळभूत मानवी प्राण्यानं आशातुर ओंठाला लावलेला सुखाचा प्याला रिता होतों न होतो तोंच दुःखाचा जहरी प्याला यदृच्छेनं त्याच्या ओंठाला भिडतो. सुखाचा सुधारस दुःखाच्या प्याल्यांतून प्यावा अशीच कां त्या न्यायनिष्ठुर परमेश्वराची योजना असेल ! सुखदुःखाच्या सरहद्दी एकच आहेत काय ? पण हाय ! दुर्दैवाच्या तुटक्या कड्यावरून कडेलोट होऊन दैन्याच्या दरींत दडपून गेलेल्या या माझ्या जीवानं आतां सुखदुःखाचा विचार कशाला करावा ? माझ्या सुखदुःखाचं स्वरूप एकच झालं नाहीं कां ? सात्विक सुखाचा मार्ग कसोटीच्या कांटेरी कांतारांतूनच गेलेला दिसतो. पण हताश आयुष्याच्या ओसाडींत निराशेची निशा दाटल्यावर सुखाशेचा कोंवळा किरण वेड्या दुराशेला कोठून दिसणार ? आईच्या आंतड्यानं कोण आपलेपणा दाखविणार ? पित्याच्या प्रेमानं कोण माझ्यावर मायेची पांखर घालणार ? आतां मला मरणालाच मित्र मानला पाहिजे.

## पद १३

**काळसखा हा भला मला गमला ॥ ध्रु० ॥ चांद सुखाचा**
**निखळे कैंचा ! उसळे घन-तम अरिसम जमला ॥ १ ॥**
**विफल धिक् जिणें लाजिरवाणें ! झुरता भाव न जनिं वनिं**
**रमला ॥ २ ॥**

पण हो, कुणाच्या दिलाची दिलदारी माझ्या या भग्न हृदयांशीं मुक्या सौजन्याची साथ करीत आहे ? नरेंद्र येणार असं वारूताईनीं सांगितल्यापासून जिवाला उगीचच हर्ष होऊन हळवा हुरूप चढला आहे. काय असेल तें असो ! पण नरेंद्रांचं नांव निघतांच निष्कारण शामसुंदरांच्या कपाळाला

ओंठ्या कां चढतात बरं ? आणि माझ्याकडं पहातांना त्यांच्या दृष्टींत खुल्या दिलाचा मोकळेपणा दिसत नाहीं तो कां ? छे बाई, त्यांच्या हृदयाचा ठावच लागत नाहीं. शामसुंदर—

**शामसुंदरः**—(प्रवेशून) वहिनी, विमलाताई—

**विमलाः**—कोण ? [ चटकन उठून उभी राहते. )

**शामसुंदरः**—मी शामसुंदर. (स्व.) अशा एकांताची अनायासें सोन्याची संधी सांपडल्यावर माझं मनोगत इला कळविण्यासाठीं पत्राची योजना करण्याचं अतां काय प्रयोजन उरलं आहे? आतां पाहूं, गळाला मासा सिध्या रितीनं लागतो कीं नाहीं ? [ प्रगट ] विमलाताई, आम्हाला एवढी कांहीं खडी ताजीम द्यायला नको.

**विमलाः**—ही खडी ताजीम नसून शिष्टाचाराची मर्यादा आहे.

**शाम०ः**—वडील माणसापुढं हा शिष्टाचार शोभतो, पण—

**विमलाः**—तुम्हीही माझे वडील दीर आहांत नां—?

**शामः**—पण सख्खा नाहीं नां ? मावसदीराची एवढी मिजास कशाला?

**विमलाः**—पण भाउजी,

**शाम०ः**—भाउजी नको म्हणूं मला. मी कुठं नेहमींच तुला 'अहो वहिनी' म्हणतो ?

**विमलाः**—मला, सासुरवासिणीला, त्यांतून बालविधवेला ? मला कोण देणार मान ? ज्यानं त्यानं तुसडपणाच्या तुटक वर्तनानं पायाखालीं तुडवावं, अपमानाच्या ठोकरींनीं पदोपदीं ठेंचावं, टोंचून बोलण्याचा इंगळ्या जिवाला डसवाव्यांत—हेंच माझ्या नशिबीं ! निंदा, जाच, विटंबना यांची धनीण म्हणजे बालविधवा सासुरवासीण !

**शाम०ः**—चालायचंच, जग हें असं आहे!

**विमलाः**—दीनदुबळ्या अनाथ वैधव्याला सौजन्याची सदय सहानुभूति हा समाज कुठं दाखवतो ? दिखाऊ दिलगिरी दाखविण्याइकी सुद्धां दिलदारी त्याच्या दगडी दिलांत दिसत नाहीं !

**शाम०ः**—नको, विमल, असे जिवाला जाळणारे निराशेचे निश्वास सोडूं नकोस! तूं अनाथ आहेस म्हणूनच तुझी दया येऊन मी तुला सनाथ करूं इच्छितो. एकदां या सुंदरला आपला म्हण, म्हणजे जगांतली सारी सुखं तुझ्या पायांशीं खेळवितों. [ जवळ जातो. ]

विमलाः—हां ! भाउजी दूर व्हा !

शाम०—जगाच्या संसारांत आणि संसाराच्या जगांत एकमेकांना जवळ होण्यासाठीं मी आलों असतांना दूर कसा होऊं ? (हात पुढें करून ) लाडके,

विमलाः—दूर व्हा, भाऊजी, हात माग घ्या ! सभ्यतेची मर्यादा सोडून परस्त्रीवर पापी हात टाकतां ?

शाम०ः—केवळ इच्छा–तृप्तीसाठीं.

विमलाः—शरम नाहीं वाटत हे पापी शब्द उच्चारायला ? सभ्यतेच्या वरकरणी वेषाखालीं माझ्या शीलाच्या सात्त्विकवृत्तीचा सत्यानास करूं पाहणारी अशी पापी सैतानीवृत्ति दडली असेल हें माझ्या स्वप्नींही नव्हतं ! ज्याला मी सदय वृत्तीचं नाजूक फूल समजत होते तो असा विषारी कठोर कंटक ठरेल असं वाटलं नव्हतं !

शाम०ः—नको, अशा भलत्याच शब्दांनीं माझी संभावना करूं नकोस. लवचिक लौकिकाला झुगारून समाजाला स्वार्थत्यागाचा कित्ता घालून देणारा मी एक कर्ता सुधारक आहे. माझं प्रेम नादानवृत्तीचं नसून निर्हेतुकपणानं नटलेलं आहे; तुझ्यासारख्या एका गरीब गाईचा या दैन्य-पंकांतून उद्धार करावा——

विमलाः—बस्स करा ! कर्तव्यशून्य पाशवी प्रेमानं, नीचवृत्तीच्या पापी विषयवासनेनं फुललेलं तुमचं दगलबाज दुष्ट हृदय माझ्या उद्धारासाठीं सजलं काय ? पण याद राखा, अशा राक्षसी, ढोंगी दयेच्या प्रेरणेनं पापाच्या पायरीवर पाय ठेवाल तर माझा उद्धार तर राहोच पण तुमचाही अधःपात रौरवाच्या तळाशींच होईल.

शाम०ः—विमल, माझ्या दिव्य प्रेमाची अशी पायमल्ली करतांना आपल्या पायाखालच्या पोळत्या परिस्थितीकडं, भीषण भविष्याकडं जरा दूर दृष्टि फेंक.

विमलाः—दिव्य प्रेम ! तुमचं हें दिव्य प्रेम नसून अघोर विषयवासना आहे ! ही देवांच्या सात्विक वृत्तींतील निरपेक्ष दया नसून दैत्यांच्या जुलमी शक्तींतील पापी कामुकवृत्ति आहे ! खरं प्रेम कर्तव्याच्या पूर्ण जाणिवेनं जागृत होत असतं. खरं प्रेम निःस्वार्थी परोपकारबुद्धीच्या पोटीं जन्म घेतं. खरं प्रेम उच्च ध्येयाच्या मंगलतेनं मोहरलेलं असतं. समजलांत ?

**शाम०:**—पण माझं प्रेम पापी, हृदय राक्षसी याला कांहीं आधार ? बेमर्याद भडकलेल्या जिभेची बेजबाबदार बडबड आत्मघात करते ठाऊक आहे ना ?

**विमला:**—तुमच्या पापाला पुरावा ? दुसरा कोणता ? तुमचे तुम्हीच. तुमची ही ओशाळी चोरटी नजर काय सांगते ? स्त्रीजातीला पुरुषांच्या पापीवृत्ती नजरेला नजर भिडतांच कळत असतात. भाउजी, आजवर शुद्ध प्रेमाच्या भोळ्या नजरेनंच मी तुमच्याकडं पाहिलं; या आगीच्या खाईत होरपळणाऱ्या माझ्या निराधार जिवाला तुमचाच काय तो आधार वाटत होता. पण दुर्दैवाच्या फेऱ्याबरोबर तुमची बुद्धीही फिरली आणि या अनाथ अबलेच्या पावित्र्याच्या प्राणावर असा भर दिवसा तुम्ही पापी हात उचललांत ! भाउजी, तुमच्यासारख्या समंजस सुशिक्षितांनींच जर पापाची पेरणी समाजांत सुरूं केली तर अगोदरच अधोगतीला चाललेल्या या नीतिभ्रष्ट समाजाची सुधारणा कोणी आणि कशी करायची ? पवित्र सौंदर्याच्या गुलाबांना गराडा घालणारे तुमच्यासारखे विषारी कांटे जर नीतीच्या मार्गावर आडवे आले, सौंदर्य केतकीच्या दर्पाला भाळणारे असे विषारी काळसर्प जर माणुसकीला मूटमाती देऊं लागले—

**शाम०:**—विमले, सौंदर्याचा दिमाख पुरे कर; तुझं सौंदर्य—त्याचाच मी आज बळी घेणार ! मनांत आणीन तर या सौंदर्याच्या सौभाग्याला संन्यासदीक्षा—मुक्ती देईन ! केशवपन करवून—पण नको—बोलून दाखवीत नाहीं ! विमले, मला आतां कठोर व्हावं लागेल !

**विमला:**—मग मलासुद्धां याहीपेक्षां अधिक कठोर व्हावं लागेल. तुमच्या फत्तर हृदयाला जर करुणेचा पाझर फुटत नाहीं, तुमच्या राक्षसी वृत्तींत जर पवित्र कोमलता येत नाहीं, तर मलाही तुमच्या हृदयांतल्या सैतानाशी जिवावर उदार होऊन झगडलंच पाहिजे. शीलाच्या सर्वेश्वराच्या संरक्षणास। कोमलवृत्तीच्या अनाथ स्त्रीहृदयानं वज्राची छकलं उडवलींच पाहिजेत.

**शाम०:**—मला ही वेदांती वटवट कांहींच कळत नाहीं. फक्त तुझं शील कसं हरण करायचं एवढंच कळतं !

**विमला:**—आणि तें कसं राखायचं एवढंच मलाही कळतं !

**शाम०:**—शुद्धीवर ये, वेडे विमले, शुद्धीवर ये; आणि तझ्यावर टव-

कारून पाहणाऱ्या आपल्या भेसूर परिस्थितीचं नीट निरीक्षण कर. तू सिंहाच्या गुहेंत आहेस, काळाच्या दाढेंत आहेस, वाघाच्या जबड्यांत आहेस. याद राख; तुझी, तुझ्या अब्रूची—जन्माची धूळधाण करून एका दीडदमडीच्या बाजारबसवीच्या पंक्तीला तुला बसवीन. माझं काय ! मी जातीचा पुरुष आहें. तुझ्यासारख्या बेवारशी भोळ्याभाबड्या बालविध-वांचा बोलबोल म्हणतां केसानं गळा कांपून पुनः उजळ माथ्यानं मी या अंधळ्या समाजांत हवा तसा बेदरकार वावरूं शकेन. पण तुझ्या अब्रूचं एकदां खोबरं झालं कीं, तुला आपलं काळं तोंड मृत्युच्या बुरख्याआडच कायमचं लपवावं लागेल. विमले, आमचा हा सारासार विचारशून्य समाज शुद्ध शीलाच्या स्त्रीजातीची वृथा विटंबनाच करील, पण माझ्यासारख्या निर्ढावलेल्या नादानाला मात्र त्याच्या साळसूद संभावितपणाच्या शहामती-बद्दल शाबासकीच देईल !

**विमला**:—माझं शील शुद्ध असतांही या पुरुषांच्या पक्षांध समाजानं माझ्या विमल चारित्र्याला जरी दुष्कीर्तीचा काळिमा फांसला आणि मांगा, तुला जरी डोक्यावर नाचवून तुझी पूजा बांधली तरी सर्वसाक्षी न्याय-निष्ठुर देवाच्या दरबारांत तुझ्या पापांची झाडाझडती खास होईल!

**शाम**:—पहातां येईल देव आणि त्याचा दरबार पुढच्या पुढें !

**विमला**:—सृष्टीच्या दृष्टीआड दडलेल्या देवाचा हवाला मी देत नाहीं. तुझ्या पापाचा घडा भरला कीं हा जनताजनार्दनच तुला प्रायश्चित्त देईल. गरीब गाईचा गळा पापपंकांत लोटून कांपणाऱ्या कंगाल कसाबा ! हा समाज अन्यायी, अंधळा असला तरी तुझ्यासारख्या समाज-कंटकांना शासन करण्याइतका तो खंबीर आहे. तुझ्यासारख्या पापाचें पर्वत रचणाऱ्या राक्षसांना जिवंत जाळायला तो समर्थ आहे.

**शाम**:—( स्वगत ) ही जिभेची कवाईत पाहिजे कशाला ? घाव आणि दोन तुकडे !

**भगवान**:—( प्रवेशून स्वगत ) अस्सं हाचं बेरड ! या बदमाषाचा समाचार घेतलाच पाहिजे. अरे चोरा ! घी देखा लेकिन बडगा नही देखा ! ( आड उभा राहतो. )

**शाम**:—विमले, बस्स कर ही भलतीच बडबड. जीभ आंवर.

**विमला**:—कां ? जिभेची जाळती आग जिव्हारीं झोंबली वाटतं ?

**शाम**:—हा दरिद्री हट्ट कुठंवर चालेल ?

**विमला**:—या पवित्र देहांत प्राण खेळताहेत तोंपर्यंत.

**शाम**:—प्राण कुठंवर खेळणार ?

**विमला**:—पावित्र्य कायम आहे तोंपर्यंत.

**शाम**:—याद राख. तूं अनाथ आहेस.

**विमला**:—अनाथांचा वाली स्वर्गाच्या सिंहासनावर आहे !

**शाम**:—बस्स. खबरदार, रुकाराचा एकच शब्द ! नाहींतर—

**विमला**:—नाहींतर काय ?

**शाम**:—बलात्कार—

**विमला**:—बलात्कार ! पापी सैताना ! ती ताकद तुझ्यांत नाहीं.

**शाम**:—हा पहा. असा बेदरकार—

**विमला**:—हां खबरदार, जळत्या ज्वालेला कवटाळून आत्मनाश करून घेऊं नकोस—

## पद १४

**धिक् मदांधा कामुका ! जाण वरिति कुटिल-मति अति**
**निरय-निरति अति घोर पतित किति पशु-कृति ॥ ध्रु० ॥**
**अधःपात शतधा कामांधा कृतांत विफलाचि कवळिसि**
**कां ? ॥ १ ॥**

( जाऊं लागते. )

**शाम**:—(आडवून) चाललीस कुठं ? दुखावलेली नागीण जिवंत सोडण्याइतका मी मूर्ख नाहीं समजलीस ? ठीक आहे. बलात्काराचंच शेवटचं शस्त्र आतां मला उपसलं पाहिजे. ( अंगावर धांवतो. )

**विमला**:—धांवा—सासुबाई, भगवान, या गाईला या वाघाच्या तावडींतून कुणीतरी सोडवा हो ! ( मोठ्यानें ओरडते. )

**शाम**:—बघतो कोणता मायेचा पूत माझ्या मार्गांत आडवा येतो तो—

**भगवान**:—मायेचा पूत कशाला? हा तुझा बाप आहे नां इथं तुझ्या छाताडावर नाचायला खडा ? ( त्याला दूर लोटून ) अरे, तुझ्यासारखी नीचांची अवलाद जर पापाचीं घरं अशी राजरोस भरायला लागली तर त्या दगडी देवाला कशाला पुजायचं ?

**शामः**—थेरड्या संभाळ, जबान बंद कर. ( पिस्तूल रोखून ) या वीत-भर पोलादी नळकांड्यांच्या अघोर शक्तीची कर्तबगारी तुला ठाऊक नाहीं ?

**भगवानः**—अरे चल चल–[ दोघांची झटापट होते. पिस्तूल हवेंत उडते. आवाज ऐकून मावशी येते. ]

**मावशीः**—( प्रवेशून ) काय रे शाम ! काय गडबड आहे ?

**शामः**—( पिस्तूल लपवून, ढोंगी गंभीरपणानें ) मावशी, दुनियाच उलटली ! सहा महिनें मी आज तुझ्या जवळ आहे. वहिनींना मी पाठच्या बहिणप्रमाणं मानली. पण आज यांनीं मला पापमार्गाला प्रवृत्त करून नरकांत लोटण्याचा घाट घातला. माझ्या उज्ज्वल ब्रह्मचर्यावर डांबर फांसण्याचा प्रसंग आणला ! हा थेरडा तिची तरफदारी करतो आहे. मावशी, मी चाललों, इतःपर या घरांत पाणी पिण्याचीही आपली इच्छा नाहीं. ( जाऊं लागतो. )

**भगवानः**—थांब, थेरडा, चाललास कुठं! चोराच्या उलट्या बोंबा मारून मसणांत ?

**मावशीः**—अगं बाजारबसवे, अशा काळ्या करणीनं कुळाला काळिमा लावितेस अं ? कुलीन घराण्याची अब्रू कि गं घालवलीस! ( मारते. )

**भगवानः**—हां खबरदार, बाईसाहेब, त्या माउलीच्या अंगाला पांच बोटं लावाल तर. चोर सोडून संन्याशाला सूळी देतां ? हा--हा -काळा रामोशी–

**शामः**—अरे हरामखोरा, आमच्या तुकड्यावर वाढून पुनः आमच्या-वरच गुरगुरतोस ?

**भगवानः**—हरामाची नाहीं भाकरी खाल्ली या भगवानानं. निढळाच्या घामाची खाल्ली.इमानाला जागून या घरांत चाकरी करतानां हे केंस काळ्याचे पांढरे झाले आहेत समजलांत ! खाल्ल्याघरचे वासे मोजणारा हराम मी नव्हे. तूं–तूं आहेस. आईबहिणींच्या पदराला हात घालणारा पापी चांडाळ तूं आहेस.

**शामः**—थेरड्या, भडकत चाललांस हं, चले जाव.

**भगवानः**—चुप, एक शब्द बोलशील तर प्राणालाच मुकशील बघ. या म्हाताऱ्या रक्ताची रग, थकलेल्या हाडाची हिंमत, पाहायची असेल तर

थांब, तुला जागच्या जागींच जमीनदोस्त करतो. (मुठी वळून अंगावर धांवतो. श्याम भिऊन मागं सरतो.)

**मावशीः**—भगवान, भगवान, काय मांडलंस तूं हें? चल जा. तुला आमच्या घरच्या उटाटेवीही नकोत आणि तुझी चाकरीही आम्हाला नको.

**भगवानः**—तुम्हांसारख्या सैतानांची चाकरी करण्यापेक्षां भुकेनं प्राण सोडलेले काय वाईट?

**शामः**—चले जाव–मर जाव.

**भगवानः**—तुझीं पापं साऱ्या जगाला ओरडून सांगेन अन् मगच मरेन. लक्षांत ठेव, बेरडा, हीं पापाचीं फळं चाखायला गोड असतात पण पचायला फार कठिण असतात! (जातो.)

**मावशीः**—(मारत) बोल अवदसे, तुला ही घरच्याघरीं सुखासुखी अवदसा कां आठवली? बोल. सुंदर, आण रे ते मुसळ नि दोरखंड. पहाते कशी हिची दांतखिळी उघडत नाहीं ती. थांब मीच आणते, (आणते.) हं घे ही काडणी अन् आवळ इची गठडी'!

**शाम०:**—तूंच कर काय तें सारं. या पापिणीच्या वाऱ्यालाही उभा रहायची मला भीति वाटतें.

**मावशीः**—आहेच ती तशी. (खांबाला बांधते, मुसळानें बडवते.)

**शाम०:**—(स्व. हंसून) कसं आहे माझ्या नटव्या न्यायाचं नाटक! आग तर चांगलीच भडकली, आतां चमडा जाने कुत्ता जाने!

**मावशीः**—हं–आतां बोल, (मारते.)

**विमलाः**—(हंबरडा फोडून) बोलूं? काय बोलूं? माझा जीव घेतलांत तरी माझं जीव तोडून सांगणं तुम्हांला खरं वाटणार नाहीं. देवाला डोळे आहेत, मी दोषी नाहीं, मी दोषी नाहीं.

**शाम०:**—(स्व.) अहाहा! सूडाच्या सैतानी समाधानाची नशा कांहीं और [illegible]-खास!

**मावशीः**—गुण उधळून वर आणखी तोंड करतेस? बेशरमपणानं बोलतेस?

**विमलाः**—सासूबाई, बोलूं नको तर काय करूं हो! तुमच्या या अनर्थकारक अन्यायी करणीनं निर्जीव फत्तरालासुद्धां वाचा फुटेल मग मी तर काय एक मनुष्य आहे. कुठवर गप्प बसूं? किती छळ सोसूं?

**मावशी:**—छळ-म्हणे छळ ! मुलुखाची शिंदळ तूं—( मारते )

**शाम०:**—( सोडवून ) मावशी, दे सोडून. असं गुरासारखं बडवून कां कुठं माणूस सुधारतं! मनुष्य आहे, चूक व्हायचीच. वहिनींनीं माझा अपराध केला. मी त्यांनां पूर्ण क्षमा केली आहे. बायकाची जात, त्यांतून तरणी ताठी, वाटलं झालं माझ्याविषयीं कांहीं तरी—

**मावशी:**—आज तुझा हात धरला नि उद्यां गांवांतल्या आणखी कुणाशी बदफैलीपणा केला तर लौकिक आपलाच जाईल नां ?

**शाम०:**—तेंही खरंच. म्हातारी मेल्याचं दुःख नाहीं पण काळ सोकावायचा !

**मावशी:**—शाम, तूं आहेस साधा भोळा, सरळ चालीचा; असल्या एसवांचे कावे तुला कळायचे नाहींत. मरूं दे हिला इथं अशीच. ( जाते. )

**शाम०:**—( विकटहास्य करून ) दुनिया झुकती है लेकिन झुकाने-वाला चाहिये ! खरं नां वहिनीसाहेब—[ हातरुमालावर क्लोरोफार्म घाल्तो. ]

**विमला:**—हांस हांस काळा ! चांडाळा, या झिंगलेल्या समाजाचे डोळे पूर्णपणें उघडेपर्यंत असाच हांस !

**शाम०:**—पण प्यारी विमल, माझा मनोरथ सफल होण्याला हा सुलभ राजरस्ता झाला ! आतां कोण माझ्या कचाट्यांतून तुला सोडविणार? अधर-खंडनानं ओंठ रक्तानं रंगवून सोडलेस तरी तेंच रक्त, प्रेतशृंगारांतही परा—काष्ठेचा आनंद मानणारा हा शाम अस्सं अधरामृत म्हणूनच घटघटा पिणार ! ( अंगावर धांवून जातो. )

**विमला:**—सासूबाई—( किंकाळी फोडते. ( दीनानाथ धांवत येतो. )

**दीनानाथ:**—नका—नका हो माझ्या ताईला मारूं उगीच ! ताईला सोडा. बांधूं नका, नका बांधूं. ताई—ताई—( जवळ जाऊं लागतो. )

**शाम०:**—( मागें खेंचून ) हां चुप—कार्ट्या मरजाव! (रुमालानं मुस्कट-दाबी करून बेशुद्ध पाडतो. )

**विमला:**—दीना—दीना—( ओरडते. ) धांवा—माझा बाळ वांचवा—

**शाम०:**—हां खबरदार, आरडा ओरडा करशील तर. अतां तरी या अधरामृताचं मनसोक्त मधुर—पान—( चुंबन घेऊं लागतो. )



नरेंद्रः—हां, खबरदार, सैतान !

[ पान ४७ ]

मनोरंजन प्रेस, मुंबई नं. ४.

**भगवानः**—( प्रवेशून ) हां, दूर हो नादान–( मागें ओढून सोटा उगारतो. )

**शाम०ः**—कोण ? भगवान–?( त्याच्यावर पिस्तुल रोंखतो. )

**नरेंद्रः**—( प्रवेशून ) हां खबरदार सैतान !

( शामसुंदरवर पिस्तूल रोंखतो. तो घाबरते–मावशी प्रवेशून आश्चर्यचकित होते. विमला बेशुद्ध पडते. अशा स्थितींत पडदा पडतो. )

## अंक पहिला समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........
ना. ........
ठाणे.

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ श्रीयुत लिहीत बसला आहे. ]

**श्रीयुतः**—( स्व. ) शाबास, श्रीयुत कविवर्य कैलासवासी ब्रेव्हो ! ( स्वतःची पाठ थोपटतो. ) काय यमक जुळलं आहे पण—अहाहा !

**कांताः**—[ प्रवेशून ] आज—तांदूळ नाहींत रात्रीला म्हटलं—

**श्रीयुतः**—काय ? तांदूळ नाहींत—( गुणगुणून तेंच लिहितो. )

**कांताः**—ऐकलं कां ? चहा—साखर—

**श्रीयुतः**—जरा थांब—एवढा प्रास जुळवितो.

**कांताः**—तेवढे जिन्नस आणून द्या. मग बसा ना लिहीत—

**श्रीयुतः**—एवढी ओळ पुरी करूं दे, मधें बोलूं नकोस. घोंटाळा होतो आहे. अनुप्रास—यमक—छंद—

**कांताः**—सोडा हा छंद—

**श्रीयुतः**—हा छंद सोडूं ? आणि छंद धरूं कुणाचा ? तुझा ? नॉन्सेन्स ! ( स्व. ) यमक जुळलं, पण मात्रा—

**कांताः**—अतां नाहीं मी मात्रा चालूं द्यायची कांहीं. बाई—बाई—बाई—शर्थ झाली या छंदिष्टपणापुढं ! अहो, मग लिहा म्हणते ना ? कुणी हात कां धरला आहे ?

**श्रीयुतः**—छे, छे, बुवा—हात धुवून पाठीं लागली आहे ~~लुब्ध~~ (स्व.) हा एवढा लेख अतां खरडावा झालं.

**कांताः**—ऐकलं कां ?

**श्रीयुतः**—काय ऐकलं कां ? कांहीं नाहीं ऐकलं. तोंडाची वाजंत्री पुरे कर; आणि बोलायचंच असेल तर लांब उभी राहून बोल. माझे कान भरपूर लांब आहेत; सर्व ऐकूं येईल. ( दूर लोटतो. )

**कांताः**—मग लिहा म्हणे–मीही मदत करीन लिहायला.

**श्रीयुतः**—तूं येथून जा म्हणजेच मोठी मदत केल्यासारखी होईल. खास अंकांत हा लेख झळकणार आहे. निदान पॉइंटस् तरी लिहून काढतो अन् मग–

**कांताः**—( हात धरून ) मग नाहीं न् आतां नाहीं. मी नाहीं लिहूं द्यायची. कविता–कविता–कविता ! कांहीं ताळतंत्र !

**श्रीयुतः**—कवितेचं यंत्र म्हणजे कीर्तीचा गुरुमंत्र ! याला कसला आला आहे ताळतंत्र !

**कांताः**—मी अस्सा हात धरणार. ( हात धरते. )

**श्रीयुतः**—हा जुलूम झाला बुवा ! हें पहा. तुझं सर्व म्हणणं तूं लिहून ठेव. [ कागद पेन्सिल तिच्यापुढं ठेवतो. ] फुरसती अंतीं पाहीन. बस्स ! आजपासून सर्व व्यवहार कागदोपत्रीं ! तोंडीं नाहीं. आणि तोही पद्यांत, गद्यांत नव्हे. तुझा प्रश्न कवितेंत, माझं उत्तरही कवितेंतच !

**कांताः**—चला, कांहीं तरीच. अशानं मी रागावेन हं.

**श्रीयुतः**—तेंसुद्धा लिहून दाखव; बोलून दाखवूं नकोस.

**कांताः**—असं काय करायचं गडे, माझ्याकडं पाहायचं तरी जरा.

**श्रीयुत**—तुझ्याकडं पाहूं ? मला वेळ नाहीं. शिवाय बायकोच्या तोंडाकडं पाहायचा प्रसंग ! नशीब !

**कांताः**—इश्श हें काय गडे ! पुरे झाली थट्टा. ( त्याच्या गळ्यांत हात टाकते. )

**श्रीयुतः**—[ खुर्चीवरून उठतो. ] काय केलं गडे ! वाय् जोव्ह ! एक्सलंट ! तरी म्हटलं आज ही गुलाबकळी कशी खुलली ! काय हा शृंगार ! काय हा नखरा ! रोमान्स–पोइट्री–चार्म ! डिअर, माझ्या प्राणा, आज माझी वृत्ती खुष आहे. कविता करणारच, बस्स लहर बोलली !

**कांताः**—कविता ? कुणावरून ? माझ्यावरून ?

**श्रीयुतः**—ऑफ कोर्स ! नांवातच काय नाविन्य आहे ! ' माझ्या पत्नीचा शृंगार पाहून ! ' हां पण, आज हा चैत्रगौरीचा समारंभ कां केलास ? होणार ! होणार ! होणार ! माझी वाईफ स्टायलिश होणार ! लागलीस, पंथाला लागलीस. रोमँटिक व्हायच्या पंथाला लागलीस. पण हा थाटमाट—

**कांताः**—मी मुद्दाम केला आहे. आज मला जायचं होतं अॅटहोमला.

लेडीज सोशल क्लबनें मिस् सरोजिनीचें अभिनंदन करून तिला ॲटहोम दिला.

**श्रीयुत**:—पण रोज ॲटहोम हाच शृंगार केला तर काय हरकत आहे ? पण मी म्हणतो,तशा प्रसंगीं आणि तुला आमंत्रण दिलं? अरेरे! च् च् च् !

**कांता**:—हो पण एवढे सुस्कारे सोडायला काय झालं ?

**श्रीयुत**:—अगं, तुला कांहीं कल्चर ! तिथं सारा तो शृंगारसुंदरींचा, काश्मेरी गुलाबांचा झकपक ताटवा फुलला असेल अन् तुझ्यासारखी भडक रंगाची घाणेरी तिथं कशाला ? [ मोठ्यानें हंसतो. ]

**कांता**:—अशी हंसून हेटाळणी करूं नका. मी त्या क्लबची मेंबर आहे, शिवाय--

**श्रीयुत**:—शिवाय,तूं माझ्या, एका नामांकित कवीच्या संसाराची लाइफ मेंबर आहेस. इतर कांहीं गुणांच्या शिफारसी नसल्या तरी माझी बायको, एवढी शिफारस तुला बस्स आहे. हं बैस अशी खुर्चीवर. लाजूं नकोस. एवढा विनय विसाव्या शतकांतल्या बायकांना शोभत नाहीं ! बरं पण, ही एक कविता पहा. ( वाचून दाखवितो. ) 'खट खंजरी-मन-मंजरी-शरपंजरी-मारी जिव्हारी, सुरी दुधारी-

**कांता**:—( हंसून ) ही कसली जळली मेली रीरीरी ! याला कांहीं अर्थ ?

**श्रीयुत**:—हंबक ! कवितेला अर्थ नसला तर काय अनर्थ होईल ? कवींत अर्थ नाहीं ! कवितेला अर्थ नाहीं, कवीजवळ अर्थ नाहीं !

**कांता**:—अर्थ म्हणजे पैसा ना ?

**श्रीयुत**:—हो, हो, पण अशी मल्लीनाथी करूं नकोस. मजा जाते आहे कवितेची. अर्थ कसा गंभीर पाहिजे. तरच तें खरं अर्थ—गांभीर्य !

**कांता**—पण कवितेचा आणि अर्थाचा अर्थाअर्थीं संबंधच नसतो ना ? कवितेला अर्थ असणं हें आधुनिक कवींच्या काव्यांचं लक्षणंच नव्हे !

**श्रीयुत**:—देअर यू आर ! मी म्हणतों तें हेंच आणि तुझं चुकतं तें इथंच ! ही दुसरी कविता पहा ! ' खट संकट-निकट-विकट-बिकट-चिकट- '-

**कांता**:—पुरे ही कॅमकटकट ! यापेक्षां टट्टाचीच बाराखडी लिहून काढली तर !

**श्रीयुतः**—सायलेन्स ! तू 'ढ' आहेस अगदीं. तुला कवितेंत काय कळतंय ? गणमात्रा जुळवितां येत नाहींत, आणि म्हणे कवि होणार ! कवी होण्याला जातीचंच पाणी पाहिजे. 'तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे' असं समर्थांनीं ज्ञानेश्वरीच्या दहाव्या स्कंधांत म्हटलं आहे तें कांहीं खोटं नाहीं. वाचनाचा व्यासंग जबर पाहिजे !

**कांताः**—दिसलाच आपणाला किती आहे तो. वाचनानंच विचारांची वाढ होते. जगाच्या अंतःकरणांत शिरून सृष्टीशीं तन्मय झाल्याशिवाय, आणि अंतर्मुख दृष्टीनं गूढवस्तुसंशोधन—

**श्रीयुतः**—अगं हो हो, पण थांब काय, बरळतेस हें ! तुला डेलिरियम झाला कीं काय ? कीं एखाद्या तत्त्ववेत्त्या कवीचं पिशाच्च संचारलं तुझ्या अंगांत ! तुझी नाडी पाहूं. ( तिचें डोकं धरतो. )

**कांताः**—माझं डोकें धरून असं किती वेळ बसणार ? नाडी डोक्यांत आहे वाटतं ?

**श्रीयुतः**—अलबत ! लेखणीबहादुराची नाडी डोक्यांत असते. गवयाची नाडी गळ्यांत असते. तलवारबहादुराची नाडी मनगटांत असते. बरं, पण चाललीस कुठं ? बैस अशी.

**कांताः**—छे छे, बसायला फुरसत नाहीं मला.

**श्रीयुतः**—एवढं काय काम खोळंबलंय ?

**कांताः**—कविता करायच्या आहेत !

**श्रीयुतः**—हो, पण जरा पांच मिनिटें इकडं पहा तर खरं.

**कांताः**—पहायलाही वेळ नाहीं. माझी लहर लागली आहे. ती उतरेल तेव्हां उतरेल.

**श्रीयुतः**—( स्वगत ) म्हणजे ! आमच्या संसाराचं चक्र आतां उलटं फिरणार कीं काय ? ( उघड ) अगं हो, पण जरा इकडं तर ये.

**कांताः**—काय ? मला बोलायला फुरसत नाहीं ! जें कांहीं तुम्हांला सांगायचं असेल तें लिहून ठेवा. फुरसती अंतीं पाहीन ! आजपासून सर्व व्यवहार कागदोपत्रीं ! तोंडीं नाहीं !

**श्रीयुतः**—वः छान ! गुरूची विद्या गुरूलाच फळली म्हणायची ! तूं जर सारख्या कविता करीत राहिलीस तर पुरुषांची सोय—

**कांताः**—तुम्ही स्वयंपाक करा, नाहीं तर खाणावळींतून ताटं मागवा !

**श्रीयुतः**—घ्या ऐका हें! आम्ही भाकरी भाजायच्या आणि यांनीं कविता करायच्या!

**कांताः**—मग तुमचंच सारखं टुमणं आहे ना कीं कविता कर—कविता कर म्हणून. तुम्ही सांगितलं नसतं तर भला कुठं या लष्कराच्या भाकरी भाजायची हौस आहे?

**श्रीयुतः**—(स्वगत) हें प्रकरण अंगलट आलं! (प्रकट) तसं नव्हे, कविता कर. पण हें माझ्या कवितेचं सँपल पुढं ठेव आणि मग कर. हें घे ही वाच.

**कांताः**—( वाचून ) हें काय? 'बायको मेल्यावर'—कुणाची?

**श्रीयुतः**—जगांतल्या वाटेल त्याची. सरसकट सर्वांना लागू पडेल ही कविता. कल्पना कर कीं माझीच बायको कैलासवासी झाली—

**कांताः**—पण मी आहें ना जिवंत समोर उभी!

**श्रीयुतः**—पण कल्पना कर म्हणतों ना? कल्पनाशक्तीशिवाय कवी कशी होणार? एवढं सुद्धां कळत नाहीं. धिःकार! धिःकार! अहाहा! वाच, वाच. बायकोच्या मरणाचा तो बहारीचा प्रसंग—नो नो आय मीन दुःखाचा प्रसंग! तिचं स्वभाववर्णन तरी किती हुबेहूब साधलं आहे! (वाचतो) 'अतिशय प्रिय परि, कटकट बहु करि, लटलट मी तरि, कांपत बहुपरि, तांदूळ नाहींत रात्रिला म्हटलं'—

**कांताः**—इश्श हें काय?

**श्रीयुतः**—हा तुझा प्रताप! तुझ्या त्या रडगाण्याचं ध्रुपद माझ्या या रडगाण्याला येऊन भिडलं! बरं चल.

**कांताः**—कुठं?

**श्रीयुतः**—चॅकचेवर फिरायला! त्याशिवाय शृंगाराचं चीज कसं होईल? शिवाय अशानं तुझ्या निमित्तानं तरी लोकांचे डोळे माझ्याकडं वळतील!

**कांताः**—इश्श, जिभेला तर हाडच नाहीं! फिरायला जाऊन रात्रीं जेवण? कीं थंडा फराळ?

**श्रीयुतः**—खुळे, मुंबईत इतके आश्रम असल्यावर जेवायची पंचाईत? केशवाश्रम, नारायणाश्रम, माधवाश्रम,—नुसती नामावळी जपली तरी संध्येच्या चोवीस नांवांचं पुण्य पदरीं पडायचं! स्पेशल पाट, स्पेशल थाट, आणि खिशालाही स्पेशल चाट! बरं हो आपली स्पेशल तर चौपाटीवर थडकूं दे. ( हात धरतो. )

**कांता**:—[ झणकाऱ्यानें ] चला, मी नाहीं येत. मला जायचं आहे एकीकडं! [ जाते.]

**श्रीयुत**:—काय हा झणकारा! एकीकडं जायचं आहे, असं काय? चला तर, आपणही एकीकडंच जावं. मिस् सरोजिनीकडं! [जातो.]

## प्रवेश दुसरा.

[ **स्थळ**:—रस्ता. नरेंद्र चिंताग्रस्त असा प्रवेश करतो. ]

**नरेंद्र**:—( स्वगत ) दया, प्रेम आणि कर्तव्य! दयेच्या पोटीं प्रेम असतं आणि निरपेक्ष प्रेम कर्तव्यजागृतीला जन्म देतं हेंच खरं! या नंदापूरला आल्यापासून इतर विचारांचं ठाणं उठून मनांत विमलेविषयींच्याच विचारांचं वादळ माजलं आहे. विमलेचीच करुणमूर्ति अहर्निश नजरेंत नाचते आहे हें कां? माझा जीव तिच्याकडं कां ओढावा? ही तिच्याच करुणस्थितीनं उत्पन्न केलेली दया कीं बाळपणींच्या प्रेमाचा पुनः उसळलेला उत्कट भाव? मानवतेच्या ममतेचं मंगल कर्तव्य तर परमेश्वरी प्रेरणेनं माझं हृदय तिच्याकडं खेंचून नेत नाहीं? माझ्या जिवाचं कोडं मलाच उकलत नाहीं. तिच्याकडं जीव धांवतो खरा. मग त्याचं कारण ते दयामूल प्रेम असो वा कर्तव्यमूलक जीव–जागृति असो!—

### पद १५

**जिंकितां हृदय दयांकिता मति धृति-मया खल-भया धरि न ॥ ध्रु० ॥ द्रवत मृदुल मन जवें महा धांवें; नवनवें श्रवत रव करुण प्रतिक्षण ॥ १ ॥**

**भगवान**:—( घाबरेपणानें प्रवेशून ) भाऊसाहेब, भाऊसाहेब,

**नरेंद्र**:—भगवान, असा भांबावलास कां? काय तें स्पष्ट सांग.

**भगवान**:—काय सांगूं? भाऊसाहेब, त्या चांडाळांनीं पुनः ताईसाहेबांना खांबाशीं दोरखंडानं आवळून टाकलंय म्हणे! यमयातना चालविल्या

आहेत हो तिच्या. कालपासून तिच्या पोटांत अन्नाचा कण नाहीं कीं पाण्याचा थेंब नाहीं! चला, तुम्हीही चला. हा मी चाललोंच. त्या माउलीची सुटका केल्याशिवाय हा भगवान पाणीही पिणार नाहीं.

**नरेंद्र:**—अरेरे, त्या राक्षसांना कांहीं माणुसकी?

**भगवान:**—अहो कसली माणुसकी? दगडाचेंही पाणी होईल त्या माउलीची कहाणी ऐकून. तुम्हीही पण अगदीं वेळेवरच देवावाणी धांवलांत, मला धीर आला, चला, विचार करूं नका.

**नरेंद्र:**—भगवान, तूं जातिवंत मराठा आहेस. तुझ्यासारखा इमानी. दिलदार, दयाळू तुझा तूंच. ( स्वगत ) अहाहा! पहा, या निरक्षर माणसाचं सौजन्य कुठं, आणि त्या साक्षरपशूची—शामसुंदरची नीच वृत्ति कुठं!

**भगवान:**—भाऊसाहेब, बामणमराठा हा भेदभाव या भगवानाजवळ नाहीं. देवाची भाकरी, देवाची चाकरी! पण चलाच. ही विचाराची वेळ नव्हे. [ जातो. ]

**नरेंद्र:**— चल, आलोंच पाठोपाठ. ( स्वगत ) साठ वर्षांचा म्हातारा, पण दयेनं विरघळून कसा तीरासारखा धांवत गेला! अरेरे, सत्याची चाड, कर्तव्याची जाणीव या अडाणी कुणबटांत दिसावी, आणि आम्हां सुशिक्षित तरुणांना या गोष्टींची ओळखही नसावी अं! केवढं आश्चर्य! [ जातो. ]

---

# प्रवेश तिसरा.

[ अंधारकोठडी—खांबाशीं जखडलेली विमला. ]

**विमला:**—जीवा, विमलेच्या अभागी जीवा! कोणत्या भरंवशावर, कोणत्या आशेवर तूं अद्याप जगत आहेस? या दुबळ्या देहाच्या मोडक्या पिंजऱ्यांतून माझे पंचप्राण कां बरं उडून जात नाहींत? या जगाच्या मायेचा मोह मिटेना, कीं परिचयाच्या पृथ्वीचा पाश तुटेना? पण, जीव तरी सुखासुखी देह कसा सोडील? सुखाच्या मरणाला जसं भाग्य लागतें, तसंच मरणाच्या सुखालाही भाग्यच लागतें. मरण मागितल्यानं मिळत

**शाम०**:—हरामखोर—बदफैली बदमाष—[ अंगावर धांवून जातो. झटपटींत त्याला खालीं पाडून भगवान छातीवर पाय देऊन उभा राहतो.]

**भगवान**:—बोल आतां, कोण बदमाष ?

**शाम०**:—मावशी ! (किंकाळी फोडतो.)

**मावशी**:—(गडबडीनें प्रवेशून) अगबाई ! सोड, सोड मेल्या, माझ्या शामाला, देवा ! देवा ! या अवदसेच्या पायांत काय हा हलकल्लोळ माजला ! भगवान, पुनः कां घरांत पाऊल टेवलंस ?

**भगवान**:—कोंडवाड्यांतल्या गाईला सोडवायचं होतं.

**मावशी**:—असं काय ? पण नरेंद्र, या बाजारबसवींशी असे दिवसा-ढवळ्या शृंगार करतोस ? तुला शरम कशी नाहीं ? तुझ्या नादानं बहक-लेली ही पोरटी—

**नरेंद्र**:—खबरदार, थेरडे, एक शब्द बोलशील तर; नागिणी, जिवाला जाळणारं हें जहर ओकतांना तुझी जीभ झडून कशी पडत नाहीं ? उलट्या काळजाचा हा कसाब, आणि राक्षसाच्या हृदयाची तूं महामाया ! जातीचे सैतान! चुकून मानवकोटींत जन्माला आलांत इतकंच. पहा, काय ही सुनेची दैना केलीस ? तुझ्यासारख्या कजाग सास्वांनां जिवंत जाळलं पाहिजे. समा-जांतून बहिष्कृत केलं पाहिजे.

**मावशी**:—अरे नऱ्या, कालचं पोर तूं ! माझा पाणउतारा करतोस ? मला हा वेदांत शिकवतोस ? मला कळतात बरं तुझे हे सारे रंग ढंग. मी कांहीं बोल्यानं दूध पीत नाहीं. माझा अपमान ? मी म्हणे महामाया—

**नरेंद्र**:—मग कजागणी, तुझ्यांत काय माणुसकी आहे म्हणून तूला मनुष्य म्हणायचं ? वयाच्या वडिलपणावर मोठेपणा मिळत नसतो. गोठ्यातल्या गुराला तरी जिवापाड जपत असशील पण हिला उभी जाळतेस अं !

**मावशी**:—उगीच नको थोर तोंडानं बोलूं. या कैदासिणीचे एकेक गुण तुला काय ठाऊक ? उगीच नाहीं खांबाशीं डांबली ? विचार, विचार तुझ्या या—

**नरेंद्र**:—बस्स, पुरे कर. सारं कृष्ण कारस्थान या बदमाषाचं आहे.

**शाम०**:—काय माझं ? नरेंद्र, स्वतःच्या पाजीपणावर पांघरूण घालण्यासाठीं दुसऱ्याला दोषी ठरवण्याचा हा मंभावितपणा पुरे कर.

**मावशी**:—ही–हीच चंगीभंगी छत्तीस रंगी चछोर पोरटी गुणाची आहे. तरी मला वाटलं होतंच कीं ही शिकलेली पोरटी असे गुण उधळणार; कुळाला काळिमा फांसणार; पांढरपायी मेली ! या बयेचे पहिलं पाऊल घरांत पडल्यापासून दुःखाची परंपरा सुरूं झाली आहे. माझा वसंत गेला, आकाश फाटलं–( डोळ्याला पदर लावते.)

**नरेंद्र**:—तुझा वसंत गेला–आकाश फाटलं अँ ? या बिचारीच्या पायगुणानंच तुझे अमर चिरंजीव दिवंगत झाले ! पण हिचं सौभाग्य मावळून हिच्या शिरावर आकाशींची कुऱ्हाड आदळली, याची कांहीं कल्पना ? उलट, बटकीसारखं राबवून घेऊन वरती तिच्या अंगाची अशी चामडी काढतां ? काय ही निष्ठुरता !

**मावशी**:—कोण करतंय इचा छळ ? माझ्यासारखी मायाळू सासू मिळायला सात जन्म पुण्य केलं पाहिजे.

**नरेंद्र**:—तेंही कांहीं खोटं नाहीं. तुझ्यासारखी सासू लाभली म्हणून तर सात जन्माचं पाप तिच्यापुढं उभं राहिलं आणि तुझा सांथीदार हा सैतान–

**मावशी**:—चुप् बोलूं नकोस भलतंच कांहीं तरी. माझा शाम किती सालस–किती गरीब–

**नरेंद्र**:—[ पत्र दाखवून ] हें पहा, तुझ्या शाम्याच्या सालसपणाचं सर्टिफिकेट !

**शाम०**:—हें काय ?

**नरेंद्र**:—हा प्रश्न आपल्या मनालाच विचार.

**शाम०**:—( स्व. ) अरेरे ! श्रीयुताच्या, त्या कवीपीराच्या अजागळपणानं सर्वस्वी सत्यानाश केला ! त्याच्या चोपडींत मी हें पत्र कशाला ठेवावं ?

**मावशी**:—अशी हिकमत करून माझ्या शामावर नसती तोहमत घेतोस होय ?

**नरेंद्र**:—पुरे कर ही मैल जिभलीची बडबड ! हा जळता निखारा पदरीं बांधून घेऊन दुसऱ्यावर आग पांखडतेस ? साठ वर्षे गमावलीस बयाची पण या कसायाचा काळा कावा तुला कळूं नये अँ !

**शाम०**:—मी आपला साधा भोळा ! माझा कसला बुवा कावा काळा !

**नरेंद्र:**—हरामखोरा ! परमेश्वराचे अखंड जागते न्यायी डोळे तुझ्य प्रत्येक नीच कृतीला साक्षी आहेत. एवढी कळसाला पोहोंचलेली नीचवृत्ती—

**शाम०:**—हां—जिभेची घुडदौड बंद कर. आण तें पत्र इकडे. आइरवाईज यु वुइल हॅव टु माइंड दी टेरिबल कॉंसिक्वेन्सिस ! या वाष्कळ बेफामपणाबद्दल भयंकर परिणाम भोगावे लागतील. याद राख; आण तें पत्र—[ घेऊं लागतो. ]

**नरेंद्र:**—[ त्याला दूर लोटून ] दुष्टपणाच्या विषारी अर्का ! मानव-कोटीला कलंकित करणाऱ्या तुझ्या या सैतानी वृत्तीपुढं कोणत्या सात्विक हृदयाची तेजस्विता दबली जाणार ? या तुझ्या दरवडेखोरी दहशतीनं, दडपशाहीच्या दरडावणीनं, कुणाचं धैर्य दडपलं जाणार ?

पद १९

**जगिं नाहिं तुला तुला खला ! ॥ ध्रु० ॥ खर पापकूपा ! सर्पा सदर्पा ! अधमा ! कैसा वमसी गरला ? ॥ १ ॥ मम शील-बल हें नमवील वेगें कुटिला काला तुझिया मतिला ॥ २ ॥**

[ पडदा. ]

---

# प्रवेश चवथा.

[ सरोजिनीची खोली. सरोजिनी पुस्तक वाचीत दमली आहे. ]

**सरोजिनी:**—[ स्व. ] जीवित ! मानवी जीवित ! जगाच्या जंगलां-तलं जाईचं फूल ! सुखाशेच्या सुगंधानं सुखकर होणारं, रमणीयतेच्या रस-रंगानं रसरसलेलं, प्रेमाच्या प्रकाशानं फुललेलं, नवलाईच्या नाजुकपणानं नटलेलं सुंदर फूल ! पण मोकाट वृत्तीनं अहंतेच्या आकाशपोकळींत गिरक्या घेणारीं, आणि आयुष्यांत मजा मारणारीं हीं स्वच्छंदी फुलपाखरं—हे मानव-प्राणी—या फुलाची एवढी कुठं क्षिती बाळगतात ! आमरण स्वार्थाच्या सेवेलाच सादर केलं जाणारं हें साजरं फूल उच्च ध्येयाच्या उत्कट एकनिष्ठ-तेनं जनताजनार्दनाच्याच पवित्र पूजेला वाहिलं तर ? उज्ज्वल ध्येयावर दृष्टी रोखून जगांत मंगल मार्ग आक्रमायचा; पण आयुष्याचं अंतिम ध्येयच

अनिश्चित असलं तर जीवितनौकेचं सुकाणू फिरवायचं तरी कोणत्या दिशेला ? जिवाला कर्तव्याची जाणीव झाली नाहीं तर जगांत जगायचं तरी कशाला ? बाबांची मी एकुलती एक लाडकी लेक ! एम्. बी. बी. एस्. झाले आहे. श्रीमंतीच्या सुखराशींत लोळत आहे. वैभवाचे वाढते विलास भोगीत आहे. पण जिवाला ही कांचणी कसली ? एवढी शिकले ती कशासाठीं ? कीर्तिसाठीं ? पण ही कीर्तिकुमारिका आजवर कुणाला जवरीनं वश झाली आहे ? कीर्ति म्हणजे मृगजळाची माया ! तिच्या मागून दुराशेनं न धावतां तिलाच आपल्या मागं खेचली पाहिजे. कीर्तिसाठीं माझी तळमळ नाहीं. मग काय पैशासाठीं ? वैभवाचा एवढा पसारा भोंवतीं असल्यावर पुनः संपत्तीची लालसा बाळगण्याइतकी मी खास लोभी नाहीं. या माझ्या शिक्षणाचा, श्रीमंतीचा सदुपयोग मी स्वहितापेक्षां समाजकार्याकडेच केला तर अधिक श्रेयस्कर नाहीं कां ? स्वोन्नतीचं शैल-शिखर गांठायला समाजसेवेचाच सन्मार्ग नको कां स्वीकारायला ? शिक्षणाच्या अभावीं माझ्या सहस्रावधि समाजभगिनी अज्ञान अंधःकारांत वावरत आहेत ! विमलेसारख्या हजारों हतभागी बालविधवा मुक्या गुलामगिरींत खितपत आहेत ! माझ्यासारख्या श्रीमंत आणि सुशिक्षित स्त्रियांनींच या अनाथ भगिनींची भवितव्यता उज्ज्वल करण्याचं पवित्र कार्य नको कां शिरावर घ्यायला ? सरोजिनीच्या विचारी हृदया, तुला हे उदात्त विचार पटतात नां ?

## पद २०

**प्रभुराजा तूंच समाजा ! । भावें भजतां तुज मोक्ष मला ॥ ध्रु०॥ जन-सेवा-पथ भला लाभला । शुभ हा स्वोन्नति-शैला । वेंचियले तन-मन-धन जन-हितिं । जन्म सफल तरि ——— । ॥ १ ॥**

पशुवृत्तीच्या पापी जीवनाला कंटाळून कितीतरी विधवा बाला, दीन अबला मृत्यूला कवटाळीत असतील ! पण क्रूर समाजाला त्याचं काय ?

**' अबला गेली-जगता मुकली-पर्वा त्याची कोण करी ? '**
**निसर्ग हंसले-चपला खेळे-सळसळ उसळति जल लहरी**

' काव्य विहारांतील ' ' कृष्णाकाठीं ' या करुण समाजदृश्यांतील

या ओळी, सारख्या माझ्या जिभेवर नाचताहेत. दीन विधवेच्या दिव्य आत्मयज्ञाचा आणि हंसणाऱ्या निसर्गाचा विरोध कवीनं किती करुणसुंदर, बोधप्रद दाखविला आहे. विमला! तिला मी अद्याप प्रत्यक्ष पाहिलीही नाहीं. पण नरेंद्रांनीं वेळोवेळीं दिलेली तिच्या दैन्याची पुसट कल्पनाच माझ्या काळजाला घरे पाडीत आहे. शामसुंदरसारख्या शिकलेल्यांनीं सैतानीवृत्तीनं त्या बिचारीच्या अब्रूवर घाला घालायचा घाट घालावा ना! ही तिच्यावरची अघोर आपत्ती निवारण्यासाठीं नरेंद्र नंदापूरला धांवून गेले आणि मी मात्र इथं शुष्क सहानुभूतीचे सुस्कारे सोडीत स्वस्थ बसले आहे. छेः, नरेंद्रांचं पुनः पत्र येईपर्यंत उतावळ्या उत्कंठेची हृदयाची हुरहुर नाहींशी होणार नाहीं. पण ही कांता कां बरं अजून आली नाहीं? [ एक नोकर व्हिजिट कार्ड घेऊन येतो. ] कोण? श्रीयुतराव? जा, त्यांना आंत पाठऊन दे. [ तो सलाम करून जातो. ] ही स्वारी आज अशी अवेळीं इकडं कां आली बरं? बरीच लाघवी दिसते.

**श्रीयुतः**—[ प्रवेशून ] गुड इव्हिनिंग सर!

**सरोजिनीः**—श्रीयुतराव, कसं काय?

**श्रीयुतः**—ऑलराईट सर! क्वाईट राईट सर! थँक यू सर!

**सरोजिनीः**—सर? श्रीयुतराव, तुम्ही माझ्याशीं, एका स्त्रीशी बोलतां अहां आणि सर म्हणतां?

**श्रीयुतः**—यस् सर--नो सर, जरा घसरलं खरं, पण नेव्हर माइंड सर!

**सरोजिनीः**—( स्व. ) काय बावळेपणा हा! ( प्र. ) बसा. बरं बगलेंत हें बाड कसलं? कवितेचं वाटतं?

**श्रीयुतः**—ऑफकोर्स! माझं वाङ्मय नेहमीं माझ्याबरोबर असायचं.

**सरोजिनीः**—अगदीं आयुष्याच्या अखेरीपर्यंत कां?

**श्रीयुतः**—या कैलासवासीचं वाङ्मय त्याच्याबरोबरच कैलासवासी होण्यांत खरी खुमारी आहे. ही माझी सहचारिणी माझ्या बरोबरच सती गेली तरच जगांत नांवलौकिकाला चढेल!

**सरोजिनीः**—पाहूं तुमचं कवित्व! ( वही घेऊं लागते. )

**श्रीयुतः**—हां-थांबा-मीच वाचून दाखवितो.

**सरोजिनीः**—बाकीं ही विचित्र चित्रगुप्ती लिपी खुद्द लिहिणाराला तरी कळेल कीं नाहीं याची शंकाच आहे. एखादी सुंदरशी कविता वाचा पाहूं.

**श्रीयुत**:—माझा मास्टरपीसच ऐकवितो तुम्हाला. ऐका—अटेन्शन—!

**' हा जीवित छकडा त्याला '—**

**सरोजिनी**:—छकडें जीवित ? म्हणजे ?

**श्रीयुत**:—छकडें जीवित नव्हे. जीवित—छकडा, जीवितरूपी छकडा—गाडी—

**सरोजिनी**:—हा समास और आहे-

**श्रीयुत**:—हा समास मानापमानांतल्या ' चपला भिंगरी ' टाईपचा आहे. पुढं ऐका—

**' हा जीवित छकडा त्याला '**
**प्रेमाचें वंगण घाला-'**
**' मग काव्यानंदीं डोला-'**

**सरोजिनी**:—हा नंदी कोण ? कुठला नंदीबैल या छकड्याला जोडायचा ?

**श्रीयुत**:—तुम्हाला ॲप्रीसिएशन नाहीं हो ! कल्पनाच तशी गूढ आहे म्हणा !

**सरोजिनी**:—तुम्हांला एक कविता ठाऊक आहे कां ? ' जो आपली आपण स्तुति करी तो एक पढत मूर्ख ! '

**श्रीयुत**:—तो जुना जमाना गेला ! आजकाल अकलेची दिवटी पाजळून स्वतःची टिमकी वाजवावी लागते; शिवाय मी 'कवियशःप्रार्थी' आहे !

**सरोजिनी**:—म्हणजे ? कवितांची पैशापासरी पैदास पैशाच्या प्राप्तीसाठीं, कीर्तीच्या कमाईसाठीं निर्माण करायची वाटतं ?

**श्रीयुत**:—जवळ जवळ असंच—

**सरोजिनी**:—तुमच्या वाईफला हीं प्रेमगीतं पसंत पडत असतील नाहीं ?

**श्रीयुत**:—छे—छे—छे—आमची वाईफ म्हणजे एक दुर्मिळ रत्न आहे !

**सरोजिनी**:—( स्व. ) खराखरींच, कांता म्हणजे एक दुर्मिळ रत्न आहे—

**श्रीयुत**:—त्या रत्नावर नवरत्न्या रत्नाचा प्रयोग करावा लागतो वरचेवर. तिच्या पुढं कवितेचें वाचन म्हणजे गाढवापुढं गीतेचा पाठ !

**सरोजिनीः**—ह्यावेळीं ती इथं आली तर? [ कांता येते. ( कांतेला ) व: तूं अगदीं वेळेवरच आलीस. तुला शंभर वरसं आयुष्य आहे ! ( दोघी कुजबुजतात. कांता पडद्या आड लपते. )

**श्रीयुतः**—मग भरलीच म्हणायची माझी शंभर वरसं ! ती आली तर माझी प्रतिभा पळ काढेल. अहो, ती इतकी अरसिक, जहांबाज, तोंडाळ आहे कीं, कांहीं विचारूंच नका, अजागळ—बावळी—

**कांताः**—( स्व. ) व: काय पण माझी तारीफ चालली आहे ! मा म्हणे अरसिक, जहांबाज, तोंडाळ—अजागळ—वेंचकच विशेषणं आहेत ही !

**सरोजिनीः**—बरं तुम्ही जा आतां, मी बाहेर निघाले आहे.

**श्रीयुतः**—काय म्हणतां जाऊं ? कसा जाऊं ? कुठं जाऊं ? माझं तुमच्याकडं काम होतं.

**सरोजिनीः**—हेंच कविता वाचनाचं नां ?

**श्रीयुतः**—नाहीं, दुसरं एक नाजुक काम—

**सरोजिनीः**—नाजुक काम ? अगबाई तें कोणतं ?

**श्रीयुतः**—त्यांत अगबाई करण्यासारखं कांहींच नाहीं. तुम्ही डॉक्टर आहांत, मला एक असाध्य रोग जडला आहे—

**सरोजिनीः**—तो कोणता ?

**श्रीयुतः**—हृद्रोग !

**सरोजिनीः**—हार्टडिसीज ?

**श्रीयुतः**—होय प्रेमाचा हार्टडिसीज—रोमान्सचा हृद्रोग !

**सरोजिनीः**—( हंसून ) श्रीयुतराव, असल्या रोगाचा मी मुळींच अभ्यास केलेला नाहीं.

**श्रीयुतः**—या वेळीं माझ्या प्रेमाला महापूर आला आहे. तम्हाला पाहतांच प्रथम भेटीलाच माझ्या मनांत प्रेम उत्पन्न झालं.

**सरोजिनीः**—स्टॉप् धिस् नॉन्सेस् !

**श्रीयुतः**—नका, माझ्या प्रेमाचा असा धिःकार करूं नका. तुम्ही पब्लीक वुमन् आहांत !

**सरोजिनीः**—श्रीयुतराव, तुम्ही शुद्धीवर आहांत कां ?

**श्रीयुतः**—यांत काय चुकलं बुवा ! सार्वजनिक कामासाठीं झटणारी स्त्री ती पब्लीक वुमन् ! आपण जसं पब्लीक मॅन म्हणतो तसंच पब्लीक

तुमन म्हणायला काय हरकत आहे ? कांहीं अर्थाचा अनर्थ झालाच असेल तर माफ करा ! चूक भूल द्यावी घ्यावी ! मला क्षमा करा. [ पाय धरतो. ]

सरोजिनीः—बस्स, पुरे करा हा आचरटपणा ! गेट् दी गॉन अॅट वन्स् ! चला जा. [ कांता हंसते ]

श्रीयुतः—( स्वगत ) हिनं नाटकं पाहिलेली दिसत नाहींत. कादंबऱ्यांचंही वाचन यथातथाच दिसतं. म्हणूनच माझं प्रेम हिला कळत नाहीं. [ प्रगट ] मिस् सरोजिनीबाई, मी एक निस्सीम सौंदर्योपासक आहें ! सौंदर्य पाहून प्रेमाला उकळी फुटते आणि प्रेमाच्या पोटीं काव्य खडबडतं ! अशी ही रोमान्स, पोइट्री, चार्म, यांची परंपरा आहे. तुम्हांला पाहतांच प्रेम उत्पन्न झालं आणि एक विनंति करायचं धाडस करावसं वाटलं. माझी एक विनंति आहे.

सरोजिनीः—ती कोणती ?

श्रीयुतः—माझी वाइफ रोमँटिक नाहीं; स्टायलीश नाहीं.

सरोजिनीः—मग त्याला मी काय करूं ?

श्रीयुतः—तिला तुम्ही सुधारणेचा श्रीगणेशा सांगा. फॅशनचा ओनामा शिकवा. मी तिला काव्याचे डोसीज रोज देतोच आहे म्हणा ! एवढं कराच. नाहीं तर माझ्या संसार-नाटकाची ट्रॅजेडी होणार आहे हो !

सरोजिनीः–(विचार करून)(स्व.)अशीच खोड मोडावी.(प्र.) ठीक आहे. परवां चर्नीरोड गार्डनमध्यें भेटा.हें काम तिच्या एका मैत्रिणीवरच मी सोंपवितें.

श्रीयुतः—पण ती कोण ? कुठली ?

सरोजिनीः—ती एक कवियित्रीच आहे.

श्रीयुतः—काय ? कवियित्री . ओ नथिंग कुड् बी बेटर ! कॅपिटल् ! तिचं नांव ?

सरोजिनीः—'शैलबाला' ! हा पहा तिचा फोटो !

श्रीयुतः—[ फोटो घेऊन ] फारच सुंदर ! असू दे माझ्याजवळ. नंतर रिटर्न करीन. बरं जातो मी. पण—

सरोजिनीः—पण काय ?

श्रीयुतः—ही अपॉइटमेंट चुकवून माझी डिस् अपॉइटमेंट करूं नका. मघाच्या प्रकाराबद्दल मी पुनः एकदां सपशेल माफी मागतो; पण ती एंगेजमेंट चुकवूं नका. [ पाय धरतो, कांता एकदम पुढें येते.]

**कांता**:—छे छे, अशा एंगेजमेंटस् कधीं चुकवायच्या असतात तीं काय ?

**श्रीयुत**:—[ तिला पाहून घाबरतो, चटकन उठतो ] ( स्वगत ) अरे बाप रे ! इचीही एंगेजमेंट इथंच होती कीं काय ? आतां यःपलायते स जीवति ! [ जातो. दोघी हंसतात.]

**सरोजिनी**:—कांते, वः बहार केलीस तूं !

**कांता**:—एकदां यांची ही रोमान्सची धुंदी खाडकन् उतरलीच पाहिजे.

**सरोजिनी**:—तुझा फोटो नेलाच आहे त्यांनीं. अशी युक्ति योजिली आहे. ( कानांत कुजबुजते. ) अग, अशी विचित्र भावनामय वृत्ति, सवंग लोकप्रियतेची लालसा हाच काय तो आजकालच्या सर्वसाधारण कवींचा ट्रेडमार्क दिसतो !

## पद २१

**या नच कवीब्रुवांना गणना । भावना उपहास-गुणा ॥ ध्रु० ॥**
**हांव मनाला धन मानाची । 'कवि'-पद-लांछन माना ॥ १ ॥**
**वृथा अभिमानें मिरविति लोकीं । व्यवहारहि आकळेना ॥ २ ॥]**

बरं, व्याख्यानाला चलायचं नां ? टाईम झालीच.चल तर.[जातात. पडदा.

---

# प्रवेश पांचवा.

[ **स्थळ**:—रस्ता. श्रीयुत घाईघाईनें प्रवेश करतो.]

**श्रीयुत**:—पळतां पळतां पुरे वाट झाली. काय मासलेवाईक मोठा मजा उडाला हॉ ! तिनं जर कां आमचीं मुक्ताफळं सारीं पडद्याआड लपून ऐकलीं असतील तर मात्र मग फजितीला पारावारच उरला नाहीं म्हणायचा. तरी बरं, सहीसलामत जिवंत सुटलों. त्या वेळीं तर लाजेनं इतका थिजून गेलों कीं बर्फाचा पुतळाच बनलों. पुरं मरण ओढवलं. मेलोंच होतों म्हणा, जीव तेवढा जायचा बाकी होता. देव करतो तें सारं बऱ्या-साठींच या न्यायानं फजीति उडाली खरी, पण हा सुंदर फोटो त

मिळाला. बाकी त्या वेळीं माझाही चेहरा फोटो काढून घेण्यासारखाच झाला होता. ( फोटोकडे पाहून ) अहाहा ! हे फोटोंतील फॅशनच्या पुतळे ! हे जगांतील मोहक सौंदर्या ! तुला पहातांच माझं प्रेम कंठाशीं येऊन भिडलं ! जीव जळायला लागला ! तुझ्या पायीं जान कुर्बान ! तुझ्यावरून ठराविक ठशांच्या कल्पनांनीं खचलेले दोनचार तरी कवितेचे तुकडे खास ओंवाळून टाकणार ! हे सुंदरी, तुझा विरह आतां असह्य झाला आहे. तुझं दर्शन लौकर नाहीं झालं तर हा तुझ्या प्रेमाचा दासानुदास झुरून झुरून मेल्या-शिवाय मरणार बघ ! दे, एकच गोडसं चोरून चुंबन दे. अरेच्या ! या फोटोंतल्या चेहऱ्याचं आणि आमच्या तिच्या चेहऱ्याचं बरंच साम्यसम जुळतंय कीं. पण छट् निवळ नजरचूक ही ! पण अशाच नजरचुकीनं जर नेहमींच प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणीं स्वतःच्या बायकोचीच प्रतिमा मला दिसूं लागली तर—तर काय ? तो अगांतुक आपलेपणा आज ना उद्यां अंगलट येणार ! मग मात्र खरा रोमान्स ! [ जातो.]

---

# प्रवेश सहावा.

[ दीनानाथ आजारी असून झोंपला आहे, झोंपेंत ‘ ताई ताई ’ अशा हांका मारतो. मावशी विमलेच्या हाताला डागण्या देत प्रवेश करते. ]

**मावशीः**—[ विमलेला जमिनीवर जोरानें ढकलून ] या—याच हातांनीं त्या नरेंद्राच्या पायाला मिठ्या मारून त्याला कवटाळीत होतीस नाहीं ? अग कवटाळिणी, थांब तुझ्या या हाताचे कोळसेच करते. डोळ्याच्या खांचाच करते !

**विमलाः**—[ किंकाळी फोडून ] सासूबाई,—

**मावशीः**—हां खबरदार ओरडशील तर. घशांत लोखंडाचा तापला रस ओतीन; कानानाकांत खिळे ठोकीन; चांगली जन्माची आठवण राहिली पाहिजे.

**विमला**:—नका, अशा यमयातना करूं नका. नरडीला नख देऊन माझा एकदम प्राण घ्या.

**मावशी**:—तुला अशीच छळून मारणार बघ. [मारते, ती रडते. दीनानाथ जागा होऊन मावशीजवळ येतो.]

**दीनानाथ**:—नका, नका, मावशी, तुम्ही माझ्या ताईला मारूं नका. तिला रडवूं नका. तिच्याबद्दल मला मारा. मी तुमच्या पायां पडतों. माझ्या ताईला मारूं नका, नका मारूं. [रडतो.]

**मावशी**:—[दूर लाथाडून] चल, दूर हो पोरट्या! मोठा ताईच्या प्रेमाचा पान्हा फुटलाय कार्ट्याला, म्हण आजारी आहे. काय धाड भरली आहे!

**शामसुंदर**:—[प्रवेशून] मावशी, अगं बाहेर ओटीवर ते भुलेश्वरशास्त्री येऊन बसले आहेत. उद्यांच्या उद्यां तें मंगलकार्य उरकलंच पाहिजे. नाहीं तर उभा गांव बहिष्कार घालील बरं!

**मावशी**:—[विमलेला जोराची लाथ मारून] या—या अवदसेच्या पायांत हा गांव सोडून जायची पाळी न येवो म्हणजे मिळविली. काळतोंडी, पांढरपायी मेली! [लाथ मारून जाते.]

**शाम०**:—(स्वगत) अहाहा! या मानी पोरटीला अशी दुःखाच्या खाईत होरपळतांना पाहून मला आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत. मूर्ख पोरटे, हा सूड, सूड बरं! पण हा कसला सूड! हृदयांत खरखलेल्या भयंकर सूडाच्या भडाग्नीची ही केवळ आंच आहे! जाळणाऱ्या ज्वालेचे प्रखर लोळ तर पुढेंच प्रगट होणार आहेत. या कार्ट्याचा कांटा माझ्या मार्गांतून मृत्यूच्या मुखांत फेंकला पाहिजे, तरच हिचा योग्य सूड घेतल्यासारखा होईल. औषधांतून विषाचा एकच थेंब आणि त्याची या आजारांतून कायमची मुक्तता झालीच समजा! [जातो.]

**दीनानाथ**:—ताई, ताई, ऊठ ना गं. (ती उठते.)

**विमला**:—बाळ दीना, पण तूं असा जमिनीवर बसूं नकोस. तुझ्या पोटांत दोन दिवसांत अन्न नाहीं. तापही अंगांत जशाच्या तसाच आहे. चल बाळ, तुला बिछान्यावर निजविते. (उठण्याचा प्रयत्न करते.)

**दीनानाथ**:—ताई, तुझ्यानं उठवत नाहीं. तूं बैस. पण काय गं ताई,

मिळाला. बाकी त्या वेळीं माझाही चेहरा फोटो काढून घेण्यासारखाच झाला होता. ( फोटोकडे पाहून ) अहाहा ! हे फोटोंतील फॅशनच्या पुतळे ! हे जगांतील मोहक सौंदर्या ! तुला पहातांच माझं प्रेम कंठाशीं येऊन भिडलं ! जीव जळायला लागला ! तुझ्या पायीं जान कुर्बान ! तुझ्यावरून ठराविक ठशांच्या कल्पनांनीं खचलेले दोनचार तरी कवितेचे तुकडे खास ओंवाळून टाकणार ! हे सुंदरी, तुझा विरह आतां असह्य झाला आहे. तुझं दर्शन लौकर नाहीं झालं तर हा तुझ्या प्रेमाचा दासानुदास झुरून झुरून मेल्याशिवाय मरणार बघ ! दे, एकच गोडसं चोरून चुंबन दे. अरेच्या ! या फोटोंतल्या चेहऱ्याचं आणि आमच्या तिच्या चेहऱ्याचं बरंच साम्यसम जुळतंय कीं. पण छट् निवळ नजरचूक ही ! पण अशाच नजरचुकीनं जर नेहमींच प्रत्येक स्त्रीच्या ठिकाणीं स्वतःच्या बायकोचीच प्रतिमा मला दिसूं लागली तर–तर काय ? तो अगांतुक आपलेपणा आज ना उद्यां अंगलट येणार ! मग मात्र खरा रोमान्स ! [ जातो.]

---

# प्रवेश सहावा.

[ दीनानाथ आजारी असून झोंपला आहे, झोंपेंत ' ताई ताई ' अशा हांका मारतो. मावशी विमलेच्या हाताला डागण्या देत प्रवेश करते. ]

**मावशी**:—[ विमलेला जमिनीवर जोरानें ढकलून ] या–याच हातांनीं त्या नरंद्राच्या पायाला मिठ्या मारून त्याला कवटाळीत होतीस नाहीं ? अग कवटाळिणी, थांब तुझ्या या हाताचे कोळसेच करते. डोळ्याच्या खांचाच करते !

**विमला**:—[ किंकाळी फोडून ] सासूबाई,—

**मावशी**:—हां खबरदार ओरडशील तर. घशांत लोखंडाचा तापला रस ओतीन; कानानाकांत खिळे ठोकीन; चांगली जन्माची आठवण राहिली पाहिजे.

**विमलाः**—नका, अशा यमयातना करूं नका. नरडीला नख देऊन माझा एकदम प्राण घ्या.

**मावशीः**—तुला अशीच छळून मारणार बघ. [मारते, ती रडते. दीनानाथ जागा होऊन मावशीजवळ येतो.]

**दीनानाथः**—नका, नका, मावशी, तुम्ही माझ्या ताईला मारूं नका. तिला रडवूं नका. तिच्याबद्दल मला मारा. मी तुमच्या पायां पडतों. माझ्या ताईला मारूं नका, नका मारूं. [रडतो.]

**मावशीः**—[दूर लाथाडून] चल, दूर हो पोरट्या ! मोठा ताईच्या प्रेमाचा पान्हा फुटलाय कार्ट्याला, म्हणे आजारी आहे. काय धाड भरली आहे ?

**शामसुंदरः**—[प्रवेशून] मावशी, अगं बाहेर ओटीवर ते भुलेश्वरशास्त्री येऊन बसले आहेत. उद्यांच्या उद्यां तें मंगलकार्य उरकलेंच पाहिजे. नाहीं तर उभा गांव बहिष्कार घालील बरं !

**मावशीः**—[विमलेला जोराची लाथ मारून] या—या अवदसेच्या पायांत हा गांव सोडून जायची पाळी न येवो म्हणजे मिळविली. काळतोंडी, पांढरपायी मेली ! [लाथ मारून जाते.]

**शाम०ः**—(स्वगत) अहाहा ! या मानी पोरटीला अशी दुःखाच्या खाईत होरपळतांना पाहून मला आनंदाच्या उकळ्या फुटत आहेत. मूर्ख पोरटे, हा सूड, सूड बरं ! पण हा कसला सूड ! हृदयांत खवखवलेल्या भयंकर सूडाच्या भडाग्नीची ही केवळ आंच आहे ! जाळणाऱ्या ज्वालेचे प्रखर लोळ तर पुढेंच प्रगट होणार आहेत. या कार्ट्याचा कांटा माझ्या मार्गांतून मृत्यूच्या मुखांत फेंकला पाहिजे, तरच हिचा योग्य सूड घेतल्यासारखा होईल. औषधांतून विषाचा एकच थेंब आणि त्याची या आजारांतून कायमची मुक्तता झालीच समजा ! [जातो.]

**दीनानाथः**—ताई, ताई, ऊठ ना गं. (ती उठते.)

**विमलाः**—बाळ दीना, पण तूं असा जमिनीवर बसूं नकोस. तुझ्या पोटांत दोन दिवसांत अन्न नाहीं. तापही अंगांत जशाच्या तसाच आहे. चल बाळ, तुला बिछान्यावर निजविते. (उचलण्याचा प्रयत्न करते.)

**दीनानाथः**—ताई, तुझ्यानं उठवत नाहीं. तूं बैस. पण काय गं ताई,

तूं रडतेस कां? देव सगळ्यांचं रक्षण करतो असं तूंच म्हणतेस ना? मग तो आमच्यावरच दया कां करीत नाहीं?

**विमलाः**—बाळ, दुर्दैवाची लिखितं लिहितांना ब्रह्मदेवाची लेखणी तलवारीइतकीच क्रूर झाली होती. भालपटावरचं भोक्तृत्व भोगणंच भाग आहे. पण बाळ, तूं नीज स्वस्थ, जा.

**दीनानाथः**—ताई, तुला सोडून मला दूर जाववतच नाहीं ग. ताई, मला कससंच होतंय ग. या आजारांतून मी बरा होईन असं मला नाहीं वाटत. आई—आई—(खोकतो) ताई, बरगडींत कळ आली.

**विमलाः**—(स्वगत) देवा! देवा! माझ्या दिनाची शुश्रूषा तरी कशी करूं? ना औषध ना पाणी! याच्या या आजाराचंही लक्षण ठीक दिसत नाहीं. हा कांहीं साधा ताप खोकला नव्हे; देवा, तूंच तारणार आणि तूंच मारणार! आई, तूं जर आज असतीस तर माझ्या दीनाच्या दुर्दैवाला असं दारुण दैन्य कां आलं असतं? दयाघन देवा! यावेळीं आपल्या ब्रीदाला कां जागत नाहींस?

## पद २२

**विफल कोंचि बिरुदावलि। बोल सख्या घनमाली!। दीन लेंकरां माउली। सांवली तुझी गमली ॥ ध्रु० ॥ धांवुनि संकटकालीं। माया-पांखर घाली! दैव छळित अवकाळीं। तूंच रे प्रभो! वाली ॥ १ ॥**

**दीनानाथः**—(खोल स्वरांत) ताई, ताई, (विव्हळतो.)

**विमलाः**—थांब बाळ, रडूं नकोस. आई, आई—

**वारुताईः**—(प्रवेशून) विमल, विमल.

**विमलाः**—कोण? वारूताई! मला वाटलं ही प्रेमळ हांक माझ्या आईनंच मला मारली.

**वारुताईः**—बरं, दिनाचा ताप कसा काय आहे? हीं फळं घे त्याच्यासाठीं. पण, अगबाई! हा असा जमिनीवर कां? बाळ, दीना, अंथरुणावर नीज. चल. (अंथरुणावर निजविते.) हें डाळिंब खा. अगबाई! विस्तवासारखं अंग तापलंय याचं!.

**दीनानाथः**—(रडत) वारूताई, मी बरा होईन कां हो?

**वारुताई**:—उद्यां चांगला बरा होशील बरं, बाळ, आपला नरेंद्रभाऊ कीनई डॉक्टर आहे. तो तुला चांगलं औषध देईल.

**दीना**:—आमचे शामसुंदरकाकाही मला आज औषध देणार आहेत.

**वारुताई**:—त्यांचं औषध नरेंद्रभाऊला दाखवूनच घे बरं ! तो मांग विषसुद्धां द्यायला कमी करणार नाहीं. विमल, हीं फळं ठेव. अगबाई, पण विमल, हें काय ? तुझ्या दोन्ही हातावर हे फोड कसले उठले आहेत ?

**विमला**:—चहाचं आधण सांडलं मघाशीं.

**वारुताई**:—नाहीं, नाहीं, तूं सांग वाटेल तें, पण या तर बाई मुद्दाम दिलेल्या डागण्याच दिसताहेत.

**विमला**:—देवच दयेचा डोळा मिटून बसला आहे !

**वारुताई**:—छे, छे, तो डोळे मिटून बसला नाहीं; उघड्या डोळ्यांनीं तुझं सत्व पहात आहे बरं! विमल, तुझी ही केंविलवाणी कंगाल कष्टावस्था पाहून काळाचंही कठोर काळीज करपून जाईल. ( पोटाशीं कुर्वाळते. ) विमल, पण अशा उघड्या जमिनीवर काय पडलीस ? तुलाही थोडी कसर आलेली दिसते. ऊठ, तुला नीट आंथरूण घालून निजविते हं. [ तिला उठवते. ]

**मावशी**:—( प्रवेशून ) उठवा-उठवा. तुम्ही तरी कांहीं शहाणपण शिकवा तिला. वारुताई, तुम्हीच पहा, ही सकाळची वेळ अशी जेटा मारून बसायची काय ? घरचा कामधंदा–[ तिला जोरानें हिसडा देऊन उठविते. ]

**वारुताई**:—पडूं दे हो तिला. तिच्या अंगांत किंचित कसर आहे आज.

**मावशी**:—अहो, तिला काय झाली आहे धाड आजारी पडायला न् मरायला ? थोतांड सारं ! आतांच्या पोरींना कामंच करायला नकोत. या शिकलेल्या साळकायांना गौरीसारखं नटूनथटून गांवभर हिंडायला पाहिजे. दुसरं काय ? आमच्या सासूनं असं नाहीं कधीं आम्हांला बसूं दिलं. आम्ही अशा रिकामटेकड्या चकाट्या पिटीत बसतच नव्हतो म्हणा. ( विमलेला ) हं. ऊठ. कां ? रडायला काय झालं ? अहा ग नाजुक भवानी! ( हिसडा देते. )

**वारुताई**:—पडूं दे हो तिला स्वस्थ घटकाभर.

मावशी:—तिनं निजून तिची कामं कोण करील ? तुम्ही करतां कां ?

चारुताई:—हो-हो-मी करतें. सांगा, काय करूं ?

मावशी:—घ्या तें मुसळ. सडा तांदूळ. थोर तोंडानं नसता निर्वाळा कशाला घेतां ? चला. पुष्कळ पाहिल्या आहेत असल्या आकरताळ्या ढालगज भवान्या ! ( तिच्या दंडाला धरून ) चला. जा म्हणतेना ? व्हा चालत्या ( विमलेस. ) हं. ऊठ. बैस कांडायला. कांहीं ज्यास्त नाहींत तांदूळ. अवघे मेले चार पायली ! ( विमला कांडायला बसते. )

चारुताई:—( स्वगत ) असल्या सास्वांना जिवंतपणीं मूठमाती देणारं कुणीच कसं भेटत नाहीं ? ( जाऊं लागते. परतून ) छे. इथून मेला पायच हालत नाहीं. ही महामाया गेल्यावर थोडावेळ हातभार लाविला पाहिजे हिला. ( आड उभी राहते. )

मावशी:—( विमलेस. ) नरेंद्राचा हात धरून जातेस नाहीं ? थांब. उद्यां-उद्यांच तुझ्या या रूपाचा नक्षा उतरते बघ. डोकीवर पदर आणते बघ. गोरी गोमटी न् कपाळकरंटी ! कांड-भराभर कांड. ( जाते. )

विमला:—रामराया ! नको-नको रे, अतां ज्यास्त अंत पाहूं नकोस! ( कांडूं लागते )

**“ धांव रे रामराया ! किती अंत पाहसी ।**
**प्राणांत मांडिलासे ! नये करुणा कैसी ? ॥**

चारुताई:—( शामसुंदर प्रवेश करतो. त्याला पाहून स्व. ) अगबाई ! हा मांग इकडंच आला ! कांहीं तरी डाव दिसतो याचा.

शाम०:—( स्व. ) सूडबुद्धीची ही नवी कल्पना सुचली मात्र ! मग अंमलांत आणायला कितीसा अवकाश ? ठेवुंयाच तर या पांच हजारांच्या नोटा हिच्या या पोथींत ! कीं पुन: मुद्देमालासकट चोर पकडायला सोपं ! ( नोटा पुस्तकांत ठेवतो. ) ( इकडे तिकडे पाहून ) कुणी पाहिलं तर नाहीं ? छट् ! हें माझं धडाडीचं धाडस पाहून छाती दडपल्यामुळं प्रत्यक्ष परमेश्वरानंही आपले डोळे यावेळीं मिटून घेतले असतील ! ( जातो. )

चारुताई:—(स्व.) आपणही आतां जाऊन नरेंद्रभाऊलाच इकडं पाठवून द्यावा. ( जाते. )

विमला:—छे, नाहींच, या हातांनीं नाहींच कांडवत. ( उठते. ) हो, पण मघाशीं सासूबाई काय बोलल्या बरं ? उद्यां-उद्यां काय ? ही सकेशा

विमल उद्यां भगवं वस्त्र धारण करणारी बालसंन्यासिनी बनणार ? त्या भयंकर प्रसंगाची कल्पनाही करवत नाहीं. ती उद्यांची उगवत उघड्या डोळ्यांनीं पाहण्यापेक्षां आजच या पापी जगाचा शेवटचा निरोप घेतलेला काय वाईट ? पण हें आत्महत्येचं पाप ! छे निराशेनं जिवाचा कोंडमारा चोहोंकडून झाला कीं जगाचा पाश झुगारलाच पाहिजे. समाजा ! निष्ठुर समाजा ! मी तुलाच सवाल करितें कीं यांत पाप कसलं ? हिंदु समाजांतील हतभागी बिचाऱ्या बालविधवांना शाश्वतच्या सुखासाठीं मरणाखेरीज कोणता मार्ग तूं मोकळा ठेविला आहेस ? चल तर—विमलेच्या अभागी जीवा, स्वतःच्या शील—संरक्षणासाठीं, या जहरी जगाच्या जाचक जंजाळांतून कायमचा मुक्त होण्यासाठीं, हृदयाच्या होळीचा हलकल्लोळ थांबविण्यासाठीं हा भोंवतालचा भवपाश दूर सारून कुणाच्याही पायाला मिठी न मारतां आतां मरणालाच मगरमिठी मारून मोकळा हो कसा ! संपला; या घराचा आणि माझा आजपासून ऋणानुबंध संपला ! या घराला हा शेवटचाच नमस्कार ! आणि रूढीला कवटाळून, त्या क्रूर कैदासिणीला माझ्या-सारख्या भाग्यहीन बालविधवांचे बळी बेदरकार अखंड आनंदानं देणाऱ्या दयाशून्य दानवी समाजा ! तुलाही माझा—तुझ्याच पायीं प्राणाला मुकणाऱ्या या विमलेचा हा शेवटचाच नमस्कार !

## पद २३

**हा प्रळय पातला ! । समाजा ! प्रणाम माझा घे शेवटला ॥ ध्रु० ॥ पायदळीं कळी ही तुडवोनी । तूंच आज मिळविसि मातीला ॥ १ ॥ लाजविते तव कृति कळिकाळा । पात्र होशि या धिःकाराला ॥ २ ॥**

( जाऊं लागते पण पुनः परतून ) काळाच्या कड्यावरून प्राणांचा कडेलोट करून घेण्यासाठीं मी चाललें खरी पण मी गेल्यावर माझ्या दीनाची काळजी कोण घेईल ? तो आजारी आणि अशा स्थितींत त्याला टाकून जाऊं ? मी गेलें तर माझ्यामागं त्याला पोटाशीं धरून कौतुकानं कुर्वाळणारं कुणी तरी मायेचं माणूस या मतलबी दुनियेंत त्याला आहे काय ? कशी जाऊं मी ? पण जाऊं नको तर काय करूं ? छे, जावंच. हा झोंपला आहे तोंवरच जावं. पण जागा झाल्यावर मी नाहींशी पाहून

'ताई—ताई' असा आक्रोश करून तो आकांत करील ! माझा प्राण, माझा कलिजा, माझा दीनानाथ—आजारानं अगोदरच मलूल झालेला हा गोड गोंडस गुणी गुलाब, या रखरखलेल्या खाईत होरपळत ठेवून मी कशी जाऊं ? ( त्याच्या जवळ जाते. ) अहाहा ! माझा दीनानाथ किती सुकुमार, किती सुंदर ! कल्पलतेवरची खुलती कळीच ! ( चुंबन घेऊन ) बाळ—दिना, दे, या तुझ्या ताईला आज हें अखेरचंच गोड चुंबन दे— ( गहिंवरते. ) या पुढं आपली भेट देवाघरींच होणार ! देवा, माझ्या दीनाला मी तुझ्याच हवालीं करून जातें. याचं रक्षण तूंच कर ! बाळ, या जगांत शतायुषी व्हा, लौकर मोठे व्हा, आणि साऱ्या जगाला या आपल्या भाग्यहीन भगिनीच्या कमनशिबाची कर्मकहाणी कंठरवानं ओरडून सांगा ! माझ्या ललाटींच्या रेषा पुसटण्यासाठीं काळाचा हात थांबून आला आहे ! बाळ, पण तुझ्या या चिमण्या ओंठावर चिमणी हास्यरेषा उमटूं दे ! हांस, बाळ, हांस ! शेवटची 'ताई' अशी प्रेमळ हांक या कानांनीं ऐकूं दे. बोल, राजसा, बोल—

## पद २४

**बोल हंसरे बोल प्यारे बुलबुला ! विषाद कां रे ? ॥ धृ० ॥ भावना भंगोनि जातां जीव मेला या जगा । मोहमाया-पाश सारे तोडिले वृथा पसारे ॥ १ ॥ दैव धरि दुस्मानदावा आज होत अखेर ही । । चालले टाकोनि तुजला राजसा ! निरोप दे रे ! ॥ २ ॥**

बाळ, जाते—जाते—घ्या, आणखी एक चुंबन घ्या, ( चुंबन घेते, तो जागा होतो. ) अगबाई, हा जागा झाला. आतां ? ( दूर होते. )

**दीनानाथः**—ताई—ताई—( मिठी मारतो. )

**विमलाः**—( रडत ) बाळ, जातें मी—

**दीनानाथः**—ताई, जातेस ? मला सोडून कुठं जातेस ?

**विमलाः**—बाळ, देवाच्या घरीं—

**दीनानाथः**—नको—नको—ताई, जाऊं नकोस ? तुला मी आवडतों ना ? मग असं गं काय करतेस ? जातेसच तर मला तरी घेऊन चल ( रडतो. )

## पद. २५

**अजवरी कां भली मज दाविलि लटकी माया ? । एकला कां मला वद सोडुनि धजसी जाया ? ॥ ध्रु० ॥ लवहि न काय दया तव हृदया ताई गे ! । जागें असहाय ! हाय ! हाय जिवा ही लागे ! । देवाघरीं जासि तरी ने आई असे त्या ठाया ॥ १ ॥**

**विमला:**—(स्व.) हृदया ! पत्तराची कठिणता धारण कर–निष्ठुर हो.

**दीनानाथ:**—ताई, तूं रागावलीस होय ? बोल ना जरा माझ्याशीं—

**विमला:**—बाळ, काय बोलूं ? तुझ्या बंधुप्रेमानं आणि या करुण प्रसंगानं तुझ्या या ताईला मुकं बनविलं आहे. बाळ, जातें मी. मला एक चुंबन दे. ( चुंबन घेते. )

**दीनानाथ:**—ताई–ताई–आणखी एक घे, पण जाऊं नकोस ग. नको जाऊं ! (विमला चुंबन घेते. आंतून शामसुंदर 'दिनानाथ–ए दिन्या–दिन्या' अशा हांका मारीत येतो. )

**विमला:**—(स्व.) अगबाई, तो चांडाळ आलाच. स्वर्गाची पाहिरी चढतांना त्या महापातक्याचं अमंगळ मुखावलोकनसुद्धां नको. ( पुनः हांका ऐकूं येतात. ) सोड–सोड–विमल, तोड हा मायापाश आणि लाग आपल्या मार्गाला ! बाळ, जाते. देव तुझं कल्याण करो ! (एकदम त्याची मिठी तोडून निघून जाते. दीनानाथ 'ताई–ताई' म्हणत रडत तिच्या पाठीं लागून जातो. शामसुंदर प्रवेशून त्याला परत खेचून आणतो. )

**शाम:**—कायरे कार्ट्या ! तुझ्या नांवानं मी इतका शंख करतां आहें आणि तूं ओ सुद्धां देत नाहींस ?

**दीना**—पण माझी ताई, ताई कुठं गेली हो ? [ रडतो. ]

**शाम:**—ती गेली मरायला. तुला काय करायचं आहे तिच्याशीं ? अगोदर हें औषध घे.

**दीना:**—मला औषध नको, कांहीं नको; मला माझी ताई पाहिजे.

**शाम:**—अगोदर मुकाट्यानं औषध घे, नाहींतर उताणा पाडून घशांत ओतीन—

**दीना:**—कां ? तें कां ? पण पाहूं, या औषधचा रंग निराळा

घिसतो. हें औषध नव्हे, हें दुसरंच कांहींतरी मला तुम्ही बळजबरीनं पाजतां आहांत; मी हें औषध मुळींच घेणार नाहीं.

**शाम०**—तुला घेतलंच पाहिजे. ( स्व. ) माझ्या हातून हें कारटं आज खास मरणार म्हणूनच याची चलाख बुद्धी या वेळीं चमकते आहे. सुंदर फुलंसुद्धां गळून मातींत मिळतांना अधिक खुलत असतात ! ( प्र. ) काय म्हटलंस ? हें औषध नव्हे ?

**दीना**—नव्हे, खात्रीनें-नव्हे.

**शाम०**—मग काय ? विष आहे ? विष असलं तरी तुला प्यालंच पाहिजे.

**दीनाः**—मी नाहीं पिणार.

**शाम०**—नाहीं कसं ! प्यालंच पाहिजे. ( बळजबरीनें पाजूं लागतो. तो ओरडतो ) हां-खबरदार,ओरडशील तर (त्याचा गळा दाबतो. तो 'ताई' अशी किंकाळी फोडतो. )

**नरेंद्रः**—( एकदम प्रवेशून) हां होल्ड ऑन, यू डेंजरस डेव्हिल ! होल्ड ऑन ! सैताना ! थांब. ( शामसुंदरला बाजूला सारून त्याच्या हातचा पेला फेंकून देतो. )

**दीनाः**—( नरेंद्राच्या कमरेला मिठी मारून ) नरेंद्र, हे मला विष पाजवीत आहेत हो !

**नरेंद्रः**—घाबरूं नकोस बाळ, माझ्या घरीं चल— ( पडदा. )

## प्रवेश सातवा

[ बंगल्या समोरील बागेंत सरोजिनी आणि कांता प्रवेश करतात. ]

**सरोजिनीः**—कांते, इथंच बोलत बसूंया. दिवाणखान्यांत मला मुळीं करमेनासंच झालं आहे.

**कांताः**—पण आज तूं अशी उदास कां ? अस्सं—अस्सं—आतां आलं सारं ध्यानांत बरं ! ही सरोजिनी प्रेमी सुधाकराच्या करालिंगनावांचून विरहानं व्याकुळ झाली आहे ! दुसरं काय ?

**सरोजिनीः**—पुरे कर ग तुझं कवित्व.

**कांता**:—असंच ना ? हो–हो असंच. हे पहा, क्षणांत हर्षातिरेकानें हंसून हे गालाचे गुलाबच माझ्या म्हणण्याच्या सत्यतेची साक्ष पटवींत आहेत. उसळले, तें पहा, दाबल्या ओठांत दडवून ठेवलेले हास्यचंद्रिकेचे कोंवळे किरण एकदम बाहेर उसळले ! हंसलीस ! ती पहा–हंसलीस !

**सरोजिनी**:—इश्श, हें गं काय ! थट्टेला मेला कांहीं तरीं काळवेळ ? मघांपासून तें तेवढं तुझं ' बालविधवेचें गाणं ' म्हण म्हणतें आहें तर तें कांहीं तुझ्यानं होत नाहीं. कांते, म्हण ना तें गाणं. फारच सुंदर रचलं आहेस.

**कांता**:—मग तूंच म्हणनां ? तें गाणं तुझ्या या गोड गळ्यांतून उतरलं तरच त्याची खुलावट खुलेल ! हं हें घे म्हण--[ कवितेचा कागद देते. ]

**सरोजिनी**—(म्हणते)" भाव नादले
हृदय-ब्रह्मांडिं भरुनि घुमत राहिले ॥ ध्रु० ॥
उमलली कळी
हंसली जीवाची क्षण तोंच करपली !
पुष्पवति चढे
वनवेली-परि तरुवरि वीज कडकडे !
डाव रंगला
कुणि गं हुसकला हा अरधाच राहिला !
हार गुंफला
आशेनें कुणि बाई ! पायिं तुडविला !
विभवि वढतसे
पुनवेचा चंद्र–काळराहु गिळितसे !
वेळ विसरली
अवसेची रात्र दीर्घ भंवति पसरली !
वृत्ति थरकली
जाणवतां जहरी जग—मनिंच चरकली !
सहज उसळले
शब्द तेच हृदयांतिल येथ ओविले !
ओवि जाहली
विरली परि अश्रूंच्या तापल्या जळीं !

**हृदय भंगलें**
**रुतली कंठांत तान-गान हरपलें !**
**गीत गावया**
**करुणेची साथ कुठें—कवण करि दया ?**

पण कांते, रूढीच्या नादानं नादान बनलेल्या या समाजाला हें गाणं ऐकूं तरी जाईल कां ? कालचंच व्याख्यान—' हिंदुसमाजांतील बालविधवांची दुर्दशा '—किती परिणामकारक झालं ! पण अशा नाटक—कविता—कादंबऱ्यांनीं आणि व्याख्यानबाजीनं कां कुठं समाज सुधारणा होत असते ?

**कांता:**—कां बरं ? प्रत्यक्ष सुधारणा जरी झाली नाहीं तरी या गोष्टीमुळं समाजांत विचार जागृती तर उत्पन्न होते नां ?

**सरोजिनी:**—नुसल्या विचारांनीं इष्ट कार्य तडीस जात नसतं. त्या दिशेनं प्रत्यक्ष प्रयत्नच सुरू केला पाहिजे. पण हा निष्ठुर समाज—

**कांता:**—समाजाला सर्वस्वी दोष देण्यांत काय अर्थ आहे ? अनाथ अबलांची स्थिती सुधारण्यास उत्तम उपाय म्हणजे त्यांना स्वावलंबी बनविलं पाहिजे—

**सरोजिनी:**—पण मुलीं स्त्री शिक्षणासंबंधींचं मतभेद माजविणाऱ्या या समाजांत एवढी उदात्त ध्येयाची उदार न्यायबुद्धि आहे कुठं ?

**कांता:**—आहे, पूर्ण आहे. पण त्या उदार न्यायबुद्धीला मागं खेचणारी एक प्रबळ शक्ति आहे.

**सरोजिनी:**—ती कोणती ?

**कांता:**—रूढी ! रूढीच्या राक्षसी पूजेलाच सर्वस्व सादर करणाऱ्या या समाजानं बालविधवांच्या बाबतींत अशी मूक वृत्तीची उदासीनता धारण केली असल्यास नवल काय ?

**सरोजिनी:**—सुधारणेचा पोकळ डौल मिरवणारा हा पोषाखी समाज, स्त्रीजातीला पहिला मान देणाऱ्या पाश्चात्य संस्कृतीनं फुलूं पहाणारा हा समाज, याला आपल्यांत चाललेली ही स्त्रीजातीची विटंबना दिसतच नाहीं काय ? रूढी—रूढी—!

**कांता:**—याच रूढीच्या पावलाखालीं किती तरी दिव्य कोमलता मातीला मिळत आहेत ! त्या रूढीच्या प्रभावानंच समाजाची प्रगति पांगळी पडली आहे !

**सरोजिनी:**—तें असो. पण कांते, काल्चं व्याख्यान ऐकून विमलेचीच करुणमूर्ति माझ्या डोळ्यापुढं सारखी उभी राहिली आहे. [ नोकर टपाल घेऊन येतो. ] ( एक पत्र फोडून वाचल्य नंतर. ) अरेरे, काय त्या बिचारीचं दुर्दैव !

**कांता:**—कुणाचं ? नरेंद्रांचं पत्र वाटतं ? विमलवाहिनींच्या छळा-संबधीं लिहिलंच असेल. तरी बरं, माझा दादा तिथं आहे म्हणूनच तिच्या छळाला कांहीं तरी थोडा आळा पडला आहे.

**सरोजिनी:**—तुझा दादा ? कोण शामसुंदर नां ?

**कांता:**—हो त्याचा स्वभाव किती प्रेमळ !

**सरोजिनी:**—तसंच हृदयसुद्धां किती काळं !

**कांता:**—काय म्हणालीस ? दादाचं हृदय काळं ? तें कसं ?

**सरोजिनी:**—( पत्र देऊन ) पहा कसं तें—हें पत्र वाच.

**कांता:**—( पत्र वाचून सुस्कार टाकते. ) सरोज--

**सरोजिनी:**—कांते, तूं कां उगीच वाईट वाटून घेतेस ? ( स्व. ) पहा, कांता आणि शामसुंदर ! सख्खीं बहिणभावंडं ! पण दोघांचे स्वभावधर्म किती भिन्न !

**एक नोकर:**—( प्रवेशून ) चहा तयार आहे. इकडं आणूं कीं तिकडंच—

**सरोजिनी:**—चल तिकडंच येतों आम्ही. कांते, आतां चहा घेऊन जा म्हणजे झालं.

**कांता:**—बरं तर, चल. ( जातात. ) ( पडदा )

---

# प्रवेश आठवा.

[ शामसुंदर प्रवेश करतो. ]

**शामसुंदर:**—दैवानंच दगा दिल्यामुळं तें कारटं काळाच्या जबड्यांतून जिवंत सुटलं. त्याचा काळ आला होता पण वेळ आली नव्हती हेंच खरं नरेंद्र ! तो नादान तर माझी प्रत्येक प्रयत्नांत पिछेहाट करून माझा डाव

हातोहात हाणून पाडीत आहे. माझ्या प्रयत्नांचा पायाच्च प्रत्येक वेळीं अर्धांकच्या राहिला. त्यामुळं माझ्या कर्तबगारीला तोंड फुटण्याऐवजीं मीच्च तोंडघशीं पडून माझंच मात्र तोंड फुटत चाललं आहे. ठीक आहे. अजूनी काय झालं आहे ? या शामसुंदरच्या जित्या रक्तांतला जोम जिरला नाहीं कीं त्याच्या नाड्या पार आंखडून गेल्या नाहींत ! जोंपर्यंत या मेंदूची मर्दुमकी जिवंत आहे, जोंपर्यंत या शामसुंदरच्या शरीरांत रक्ताचा शेवटला थेंब शिल्लक आहे ,तोंपर्यंत सूड–सूड तर घेणारच ! बुद्धिबळाचा नवा डाव तर मांडलाच आहे ! चोरीच्या कुभांडावरून त्या विमलेच्या अंगाची चामडी लोळलेली पहाण्याचंही समाधान कांहीं थोडथोडकं नाहीं. पहातो आतां, नरेंद्र मला शह देतो कीं मीच त्याच्यावर मात करतो तें. प्रयत्नाची पराकाष्ठा करीन पण या विमलेच्या दुर्दैवाचं नाटक जगाला चांगलंच करून दाखवीन ! ( जातो. )

---

# प्रवेश नववा.

[ वारूताईचें घर. इझिचेअरवर नरेंद्र ताजा टाईम्स
वाचीत पडला आहे, जवळ भगवान
उभा आहे ]

**नरेंद्रः**—मग काय ? भगवान, ताईबरोबर उद्यां चलणार ना आमच्या मुंबईला ? मुंबईची दिवाळी तर पहा.

**भगवानः**—भाऊसाहेब, माझ्या जाण्यायेण्याचं राहूं दे. पण ताईसाहेबांना तुम्ही बरोबर घेऊन जा हो ! त्या दुष्टांच्या दावणींतून त्या गाईचा गळा सोडविण्याचं पुण्य पदरीं घ्याच्च.

**नरेंद्रः**—भगवान, तुझं म्हणणं ठीक आहे; पण असं पहा, तूं माझ्यापेक्षां या जगांत किती तरी पावसाळे अधिक काढले आहेस. या जगाचा कडवट अनुभव तुला ज्यास्त आहे.

**भगवानः**—बरं मग ?

**नरेंद्रः**—जगाच्या दृष्टीनंही या गोष्टीचा विचार नको कां करायला ?

**भगवानः**—काय कारण? यांत जगाचा काय संबंध ?

नरेंद्रः—भगवान, नीट विचार कर. विमला एक बालविधवा आहे, मी एक अविवाहित तरुण आहे. उद्यांच जर मी तिला माझ्याबरोबर मुंबईला नेली, तर माझा हेतु निष्पाप असतांही जग निष्कारण माझ्या करणीचा विपर्यास करील! जगाच्या उथळ दृष्टीला हें चित्र निराळ्याच स्वरूपांत दिसेल!

भगवानः—आलं आपलं म्हणणं लक्षांत? पण भाऊसाहेब, आपल्या कच्चा दिलाची मला कींवच येते. अहो! प्रेताच्या टाळूवरचं लोणी चाखणारं हे स्वार्थी जग, बुराईचा बडेजाव बढवून भल्यालाही बोल लावणारं हे टवाळ जग, याची कां तुम्ही इतकी कदर बाळगतां? जग म्हणजे दुतोंडी सावज! आज तुमच्या या करणीबद्दल तुमची निंदा करील तर उद्यां याबद्दलच तुमच्या उपकारबुद्धीची थोरवी गाऊन तुम्हांला डोईवर घेऊन नाचेल! कुणी सांगावं?

नरेंद्रः—तसं नव्हे रे, जगाच्या निंदास्तुतीची मी विशेष पर्वा बाळगतो अशांतला प्रश्न नाहीं. उलट जगाकडं बेपर्वाईच्या वृत्तीनं पहात या वेड्या जगाच्या बाजारांत बेदरकार भटकणाऱ्या भणंगापैकींच मी एक स्वतंत्र आचाराविचाराचा मनुष्य आहे. निष्पाप हृदयावर खोट्या पापकल्पनांचा जरी परिणाम होत नसला तरी पण जगाच्या दृष्टीवरले पापाचे पडदे दूर सारणं थोर थोर महात्म्यांनाही दुरापास्त होऊन त्यानांही लोकनिंदेला नाहक बळी कसं पडावं लागतं हें मी जाणतो. लोकापवादाची आंच किती तीव्र तापदायक असते याची मला पूर्ण कल्पना आहे. आज मी जवळ जवळ दोन तपं या जगाचा प्रकाश पहात आहे! जगाची आणि माझी तोंड ओळख पुरती झाल्यानं प्रस्तुत परिस्थितीला तोंड देऊन दयामूल प्रेम आणि लौकिक यांची तोंड मिळवणी कशी करावी हेंच मला सुचत नाहीं. कारण, यांत माझ्या शुद्ध शीलावर नाहक गदा येण्याचा बराच संभव आहे. भगवान, जरा दूरवर विचार कर. एखाद्याच्या सत्कृत्याकडे सकौतुक उदार दृष्टीनें पाहण्याइतकी समंजसबुद्धी, शुद्धता, या विषारी जगाच्या नजरेंत आहे असें तुला वाटतें कां?

भगवान—जग ह्मणजे भल्याबुऱ्यांची भेसळ!

नरेंद्र—तेंही खरंच या दुनियेच्या बागशाहींत जसे सज्जन हृदयांचे गुलाब जागजागीं फुललेले आहेत तसेंच नीच हृदयांचें विषारी कांटेही इत-

स्तत: पसरलेले आहेत. पण पाजी स्वार्थांधांची नीचता सज्जनांचाही दृष्टि-कोन बदलूं शकते. कारण जगाच्या डोळ्याला ज्या रंगाचा चष्मा असेल त्याच रंगाची वस्तु त्याला दिसणार! हा निसर्गनियम आहे. हा मानवी स्वभावधर्म आहे. कां खरं ना?

**भगवान**—अस्सं.आलं लक्षांत.तो बदमाप शामसुंदर आपला बदलौकिक करील हीच ना भीति?

**नरेंद्र:**—छे, छे, त्या धुंगुरख्याला कोण डरतो म्हणा! शिवाय मी कोण आणि कसा या गोष्टीची ओळख माझ्या मित्रांना आणि जे जे मला या जगांत ओळखतात त्यांना पूर्ण आहे.

**भगवान.**—मग झालं तर. अनोळखी जग कांहीं कां म्हणेना!

**नरेंद्र:**—बस्स. ठरला विचार. विमलेचा या नरकांतून उद्धार करायचाच. माझं अंतःकण शुद्ध, माझी दया निर्लोभ, माझं प्रेम निरपेक्ष आहे असं जिथं माझं विवेकी मनच मला ग्वाही देत आहे तिथं या लोकापवादाची नसती चाड मी कां बाळगावी? ठरला, तिला नेण्याचा नक्की विचार ठरला. पण एकदां ताईला—

**वारुताई:**—(प्रवेशून) आणखी काय विचारायचं उरलं आहे? भाउ, आजच्या आज तिला नेली पाहिजे. नाहींतर उद्यां—

**नरेंद्र:**—उद्यां तिचं काय होणार? सांग–सांग ताई, उद्यांचा सूर्य तिला आणखी कोणता दुर्दैवी दिवस दाखविणार?

**वारुताई:**—तिच्या आयुष्यांतील अत्यंत दुःखाचा!

**नरेंद्र:**—म्हणजे? याचा अर्थ?

**वारुताई:**—भयंकर अनर्थ हाच याचा अर्थ! उद्यां ती संन्यासिनी जोगीण बनणार! (गहिंवरते.)

**नरेंद्र:**—(दुःखानें) ताई–ताई, हें तूं सांगतेस तरी काय? अरेरे, उद्यां विमलेचा केशवपनविधि उरकून तिला संन्यास दीक्षा देण्यांत येणार! धर्मभोळ्या समाजाच्या अन्यायी क्रूरतेला अभागी विमल उद्यां बळी पडणार पण ताई, खरं का हें?

**वारु०:**—खरं आणि खोटं! विषाची परिक्षा घेण्याची ही वेळ नव्हे. (जाऊं लागते.)

**नरेंद्र:**—पण ताई जरा थांब. विमलेला हें कळलं कां?

वारु०:—कळलं असलं तरी ती काय करणार? पण जाऊंदेच मला. हें अमंगळ लांब तोंडानं सविस्तर सांगायला मला वेळ नाहीं. अगोदर विमलेला घरीं घेऊन येते. मग पुढचं पुढं. ( जाते. )

नरेंद्रः—भगवान, तूंही जा आणि तो शामसुंदर—

भगवानः—(खिडकींतून रस्त्याकडे पहात) तो पहा, कोणत्या तरी आसुरी विचारांच्या अंमलानं बेहोष होऊन रस्त्यानं चालला आहे. (नरेंद्र पहातो.)

नरेंद्रः—मग जा— लौकर जा. आणि त्या वेरडाच्या पाळतीवर रहा. [ भगवान जातो. ] तो पिसाळलेला लांडगा आणि ती खवळलेली नागीण विमलेचा सूड घेण्याच्या बुद्धीनें केव्हां काय करतील याचा नेम नाहीं.[जातो.]

( पुढचा प्रवेश रस्त्याच्या कव्हर सीनवर )

नरेंद्रः—( स्वगत ) मानवी हृदयांतील हे स्मृतीचे धागे काळाच्या चक्रगतीबरोबरच जर अजीबात तुटून जाणारे असते तर किती बहार झाली असती! विमलेच्या आयुष्यांतील अकल्पित स्थित्यंतराचीं हीं भडक स्मृतिचित्रं, लागलीं—जिवंत पिशाचाप्रमाणं डोळ्यासमोर पुनः नाचूं लागलीं! अहाहा! विमलेच्या अल्लड बाल्यावस्थेचं हें मोहक चित्र! आईबापांच्या प्रेमळ पांखरीखालीं स्वैरवृत्तीनं खेळणारी ही हंसरी विमल! भातुकलीचा चिमणा संसार थाटून माझ्यावर निर्व्याज प्रेमाची बरसात करणारी प्रेमळ विमल! पण हें काय? हें तिच्या विश्रब्ध सौंदर्याचं, मुसमुसणाऱ्या तारुण्याच्या प्रदेशांत पहिलं पाऊल पडतांना लग्नापूर्वीच्या सुखाशेच्या कल्पनांनीं आनंदलेल्या बेहोष हृदयाचं हें दुसरं चित्र! आणि लग्नानंतर एकाच महिन्यांत—पण नाहीं, हीं भूतकाळचीं भेसूर चित्रं माझ्यानं नाहीं—नाहींच पाहवत! पण वर्तमानकाळचं हें चित्र तरी किती भयंकर! दुःखाची दीनमूर्ति! क्लेशांची कारुण्यगंगा! रडत्या हृदयाची, कढत्या काळजाची, आपत्तीच्या आगीनं करपलेली कोंवळी कळी! कालची ती सदानंदी हंसरी विमल कुठं! आणि आजची ही सदा रोती सूरत पोरकी विमल कुठं! काल आणि आज! पण उद्यां—उद्यां तरी काय? तिचं तें अकालमुंडित मस्तक! संन्याशाप्रमाणं भगवं वस्त्र! विद्रूप चेहरा! नको—नको, त्या चित्तस्पर्शी चित्राची कल्पनाच नको! कायमचे डोळे मिटण्याचा प्रसंग आला तरी बेहत्तर! पण तिचं तें उद्यांचं चित्र या नरेंद्राला उघड्या डोळ्यांनीं मुळींच पहावणार नाहीं.

## २६ पद.

**बलीदान घे लोकीं रूढि-चंडिका। जनता मुकी अंध कां ? ॥ ध्रु० ॥ विषसार जनाचार सुविवेक-मति ही साहिना, लव मानिना लौकिका ॥ १ ॥**

[ नरेंद्र जाऊं लागतो. पडद्यांत, ' चल, हो दूर. दूर हो. रस्ता सोड ' ]

**नरेंद्रः**—( थांबून ) हा कोण ? ( पाहून ) अस्सं ! भुलेश्वरशास्त्री ! विमलेला दरडावीत इकडंच येत आहे. आड राहून जरा याची गंमत तर पहावी.

**भुलेश्वरः**—( सोंवळ्यानें प्रवेश करतो.) चल हो दूर. कपाळफुटकी ! [ विमला प्रवेश करते.] असलं हें अपशकुनी काळं तोंड सकाळींच दाखवलंस अं ! आतां काय ? दिवसभर शिमगा ! पैची तरी प्राप्ति होईल कां आज ? प्राप्तीचा दिवस आजचा ! ( स्वगत ) इचं हें असं झालं आहे तरी सौंदर्यानं कांहीं आपली नाजुक शोभा सोडली नाहीं. तारुण्याची कळीही कशी पण नुकतीच खुलत चालली आहे !

**विमलाः**—भुलेश्वर, तुम्हीं याच बाजूनं येणार याचं मला अगोदर स्वप्न पडलं नव्हतं.

**भुलेश्वरः**—अग, तें खरं. पण मी समोरून येतो आहे असं पाहून तोंड तरी फिरवायचंस. एखाद्या आडगल्लींत शिरायचं, नाहींतर रस्त्यावरच्या उकीरड्याकडं उगीचंच खाली मुंडी घालून पहात रहायचं. कां असं काळं तोंड दाखवायचं ? पण चांडाळणी, मी म्हणतों, तूं अशी राजरस्त्यावरून फिरतेस कशाला ? सोंवळ्या ओवळ्यांनीं माणसं हिंडतात. अपशकून होतो. तुझं तोंड पाहिल्यावर खात्रीनं फत्ते होणारं कामसुद्धां व्हायचं नाहीं कोणाचं !

**विमलाः**—( जवळ जाऊन ) मी नदीवर अंग धुवायला निघाले होतें.

**भुलेश्वरः**—हां, पण दुरून बोल. दूर उभी रहा. सावली पडते आहे अंगावर ! अरेरे पडलीच. आतां पुनः सचैलस्नान केलं पाहिजे. म्हणे नदीवर अंग धुवायला निघाले होतें; कायमचीच घे नां जलसमाधि ! म्हणजे गांवचं एक जिवंत अभद्र तरी टळेल !

**नरेंद्रः**—( स्वगत ) अरेरे, बालविधवांची काय ही विटंबना !

**भुलेश्वरः**—आणि तुला जायचंच होतं नदीवर तर तशी बाहेरच्या म्हारवड्यांतून मसणवटींतून कां नाहीं जात घाटावर ? या हमरस्त्यावरून अशी तूं फिरतेस, अपशकून होतो दुसऱ्याला. (स्वगत) सौंदर्य कसं पण लाखांत चमकेल लाखांत !

**नरेंद्रः**—(भुलेश्वराकडे न्याहाळून पहात) अरे ढोंग्या ! एकीकडे तोंडानं धर्माचा नटवा वेदांत बडबडतांना या पवित्र सौंदर्यावर आपले विषारी पापी डोळे रोंखतोस काय ?

**विमलाः**—(गाहिंवरून) अपशकून होतो ! भुलेश्वर, माझं तोंड पाहिलं कीं लोकांना अपशकून होतो अं ! पण माझ्यांत असं काय अपवित्र आहे कीं माझं दर्शन जगाला अपशकुनी वाटावं ? माझी सांवलीसुद्धां अस्पर्श्य व्हावी ? सांगा, मी विधवा झालें, यांत माझा कांहीं अपराध आहे काय ? हा दोष माझा कीं माझ्या दुर्दैवाचा ?

**भुलेश्वरः**—तुझा, सर्वस्वी तुझा ! अगोदर विधवा ! त्यांतून सकेशा ! अब्रह्मण्यम् ! अब्रह्मण्यम् ! अगं, तूं हे केंस पोलादी फणीनं साफ विंचरले नाहींस तर तो तुझा बिचारा नवरा स्वर्गाला न पोहोंचतां त्रिशंकूप्रमाणं मध्येंच गटंगळ्या खात असेल ना दुःखसागरांत ? हे केंस ठेवून नवऱ्याचा केंसानं गळा कांपतेस ? कांहीं शरम ?

**विमलाः**—भुलेश्वर, शास्त्र काय सांगतं, धर्म काय शिकवितो मला सांगा, नीट समजाऊन सांगा, म्हणजे त्याप्रमाणें—[जवळ जाते.]

**भुलेश्वरः**—अगं हो, पण जरा लांबून बोल. हो लांब. अजूनी, आणखी जरा. एखादे वेळीं म्हाराची शिवाशीव चालेल, पण तुझ्यासारख्या बालरंडांची शिवाशिव ? शिवशिव ! प्रायश्चित्त सांगितलं आहे याला शास्त्रांत ! सकेशीच्या हातून पाणी पिणं म्हणजे सात जन्म नरकाचं साधन ! हें शास्त्र आहे, हा धर्म आहे, ही जनरूढी आहे ! माझ्या पुराणाला येऊन बसत जा रोज, म्हणजे पापपुण्याची तुला ओळख तरी होईल. (स्वगत) असली माणसं पुराणाला बसल्याशिवाय पुराणाला रंग कसा चढणार ?

**नरेंद्रः**—(स्व.) याचं पुराण हिला पापपुण्याची ओळख करून देणार म्हणे ! पुण्याची तर नाहींच नाहीं पण पापाची ओळख मात्र याच्या पुराणानं हिला पुरतेपणीं होईल. अरेरे ! धर्म—धर्म ! बालविधवांची गळचेपी करणारा,

## २६ पद.

**बलीदान घे लोकीं रूढि-चंडिका । जनता मुकी अंध कां ? ॥ ध्रु० ॥ विषसार जनाचार सुविवेक-मति ही साहिना, लव मानिना लौकिका ॥ १ ॥**

[ नरेंद्र जाऊं लागतो. पडद्यांत, 'चल, हो दूर. दूर हो. रस्ता सोड' ]

**नरेंद्रः**—( थांबून ) हा कोण ? ( पाहून ) अस्सं ! भुलेश्वरशास्त्री ! विमलेला दरडावीत इकडंच येत आहे. आड राहून जरा याची गंमत तर पहावी.

**भुलेश्वरः**—( सोंवळ्यानें प्रवेश करतो.) चल हो दूर. कपाळफुटकी ! [ विमला प्रवेश करते.] असलं हें अपशकुनी काळं तोंड सकाळींच दाखवलंस अं ! आतां काय ? दिवसभर शिमगा ! पैची तरी प्राप्ति होईल कां आज ? प्राप्तीचा दिवस आजचा ! ( स्वगत ) इचं हें असं झालं आहे तरी सौंदर्यानं कांहीं आपली नाजुक शोभा सोडली नाहीं. तारुण्याची कळीही कशी पण नुकतीच खुलत चालली आहे !

**विमलाः**—भुलेश्वर, तुम्ही याच बाजूनं येणार याचं मला अगोदर स्वप्न पडलं नव्हतं.

**भुलेश्वरः**—अगं, तें खरं. पण मी समोरून येतो आहे असं पाहून तोंड तरी फिरवायचंस. एखाद्या आडगल्लींत शिरायचं, नाहींतर रस्त्यावरच्या उकिरड्याकडं उगीचंच खाली मुंडी घालून पहात रहायचं. कां असं काळं तोंड दाखवायचं ? पण चांडाळणी, मी म्हणतों, तूं अशी राजरस्त्यावरून फिरतेस कशाला ? सोंवळ्या ओवळ्यांनीं माणसं हिंडतात. अपशकून होतो. तुझं तोंड पाहिल्यावर खात्रीनं फत्ते होणारं कामसुद्धां व्हायचं नाहीं कोणाचं !

**विमलाः**—( जवळ जाऊन ) मी नदीवर अंग धुवायला निघाले होते.

**भुलेश्वरः**—हां, पण दुरून बोल. दूर उभी रहा. सांवली पडते आहे अंगावर ! अरेरे पडलीच. आतां पुनः सचैलस्नान केलं पाहिजे. म्हणे नदीवर अंग धुवायला निघाले होते; कायमचीच घे नां जलसमाधि ! म्हणजे गांवचं एक जिवंत अभद्र तरी टळेल !

**नरेंद्रः**—( स्वगत ) अरेरे, बालविधवांची काय ही विटंबना !

मुलेश्वरः—आणि तुला जायचंच होतं नदीवर तर तशी बाहेरच्या म्हारवड्यांतून मसणवटींतून कां नाहीं जात घाटावर? या हमरस्त्यावरून अशी तूं फिरतेस, अपशकून होतो दुसऱ्याला. (स्वगत) सौंदर्य कसं पण लाखांत चमकेल लाखांत!

नरेंद्रः—(भुलेश्वराकडे न्याहाळून पहात) अरे ढोंग्या! एकीकडं तोंडानं धर्माचा नटवा वेदांत बडबडतांना या पवित्र सौंदर्यावर आपले विषारी पापी डोळे रोंखतोस काय?

विमलाः—(गाऱ्हिंवरून) अपशकून होतो! भुलेश्वर, माझं तोंड पाहिलं की लोकांना अपशकुन होतो अं! पण माझ्यांत असं काय अपवित्र आहे की माझं दर्शन जगाला अपशकुनी वाटावं? माझी सांवलीसुद्धां अस्पर्श्य व्हावी? सांगा, मी विधवा झालें, यांत माझा कांहीं अपराध आहे काय? हा दोष माझा कीं माझ्या दुर्दैवाचा?

भुलेश्वरः—तुझा, सर्वस्वी तुझा! अगोदर विधवा! त्यांतून सकेशा! अब्रह्मण्यम्! अब्रह्मण्यम्! अगं, तूं हे केंस पोलादी फणीनं साफ विंचरले नाहींस तर तो तुझा बिचारा नवरा स्वर्गाला न पोहोंचतां त्रिशंकूप्रमाणं मध्येंच गटंगळ्या खात असेल ना दुःखसागरांत? हे केंस ठेवून नवऱ्याचा केंसानं गळा कांपतेस? कांहीं शरम?

विमलाः—भुलेश्वर, शास्त्र काय सांगतं, धर्म काय शिकवितो मला सांगा, नीट समजाऊन सांगा, म्हणजे त्याप्रमाणें—[जवळ जाते.]

भुलेश्वरः—अगं हो, पण जरा लांबून बोल. हो लांब. अजूनी, आणखी जरा. एखादे वेळीं म्हाराची शिवाशीव चालेल, पण तुझ्यासारख्या बालरंडांची शिवाशिव? शिवशिव! प्रायश्चित्त सांगितलं आहे याला शास्त्रांत! सकेशींच्या हातून पाणी पिणं म्हणजे सात जन्म नरकाचं साधन! हें शास्त्र आहे, हा धर्म आहे, ही जनरूढी आहे! माझ्या पुराणाला येऊन बसत जा रोज, म्हणजे पापपुण्याची तुला ओळख तरी होईल. (स्वगत) असली माणसं पुराणाला बसल्याशिवाय पुराणाला रंग कसा चढणार?

नरेंद्रः—(स्व.) याचं पुराण हिला पापपुण्याची ओळख करून देणार म्हणे! पुण्याची तर नाहींच नाहीं पण पापाची ओळख मात्र याच्या पुराणानं हिला पुरतेपणीं होईल. अरेरे! धर्म—धर्म! बालविधवांची गळचेपी करणारा,

त्यांना पावलोपावलीं पशूसारखं लाथाडीत सुटणारा हाच कां निष्ठुर धर्म ?

भुलेश्वरः—चल हो बाजूला. अशी रस्ता अडवून कां उभी आहेस ? आज प्राप्तीचा दिवस ! उशीर होईल, चल, दूर हो आज वटपौर्णिमा !

विमलाः—वटपौर्णिमा ! वडसावित्रीची पूजा आज असं कां ?

भुलेश्वरः—अग हो, पण तुला कां हर्ष झाला ? तुला काय वटपौर्णिमा आणि सर्वपितृअमावास्या दोन्ही सारखींच ! मंगळागौरीची आरास आणि शिमग्याचा महोत्सव दोन्हीं एकच ! तू पूजेला येणार कीं काय ? वडाची पूजा करणार ? संभाळ हं–खबरदार घाटावर येशील तर ! आज सवाष्ण बायका जमायच्या जिथं अन् तुझ्यासारखी अभद्रकपाळी तिथं कशाला भ्रष्टाकार करायला ? आल्या वाटेनं परत जा. पुनः अशी आडवी येऊं नकोस अपशकुनी खापरतोंड घेऊन. चल, जा. ( ती जाते. ) काय ब्याद आहे पहा ! बालरंडा—( जाऊं लागतो. समोरून नरेंद्र एकदम येऊन मनगट पकडतो. )

नरेंद्रः—बालरंडा ! मग काय म्हणतोस रे धर्मलंडा ? इचं तोंड पाहून तुला अपशकून झाला ? इची सांवली अंगावर पडतांच तुला विटाळ झाला, असं काय ?

भुलेश्वरः—विटाळ म्हणजे स्नान करून अगोदर देहशुद्धि केली पाहिजे.

नरेंद्रः—देहशुद्धीच ना ? मी करतों तुझी यथेच्छ देहशुद्धि ! आणि आत्मशुद्धीसाठीं जा, त्या पवित्र देवतेच्या पायाचं तीर्थ घे. जा.

भुलेश्वरः—तिच्या पायाचं तीर्थ ! अरेरे ! भ्रष्टाकार ! भ्रष्टाकार !! या सुधारकांनीं धर्म पार बुडविला ! ठार केला !

नरेंद्रः—आणि तुझ्यासारख्या सवडीशास्त्राला सोकावलेल्या धर्मवीरांनीं तो तारला ! धर्माच्या नांवावर चरणाऱ्या नंदीबैला ! या धुवट सोंवळ्यांत सडक्या हृदयाची घाण सांठविणाऱ्या नीचा ! एका बालविधवेची सांवली तुमची पवित्रता भ्रष्ट करते आणि तुमचा हा साळसूद ढोंगी सभ्यपणा रात्रीं अपरात्रीं पापाच्या खातेऱ्यांत लोळत पडतो त्या वेळीं तुमचं पावित्र्य शुद्ध राहतं अँ ! डोळे मिटून भर रस्त्यावर पवित्र दीन वैधव्याकडं पापी दृष्टि रोंखून मग ही देवाच्या नांवानं केलेली गंभीर गर्जना म्हणजे धर्म झाला काय ? मनाचं ओढाळ गुरु पापाच्या मार्गानं दौडत असतां तोंडाची

ही मंत्राची पोकळ पोपटपंची, वेदांताची वृथा वटवट म्हणजे धर्मरक्षण नव्हे ! हा जुनं तेवढं सोनं असं मानणारा दरिद्री दुराग्रह ! हा धर्म नव्हे तर गतानुगतिक रूढीच्या सांप्रदायरूपी प्रेताला कवटाळून बसण्याचा विचित्र वेडेपणा ! ही खऱ्या धर्माची भूल ! अंधळ्या जनतेची दिशाभुल !

**भुलेश्वरः**—तुम्ही आजकालची पोरं ! सारीं अशीच. म्हणे ही दिशाभूल ! मग पूर्वीच्या महाज्ञानी ऋषींनीं घालून दिलेला वेदप्रणीत धर्म—

**नरेंद्रः**—त्रिकालवंद्यच आहे ! धर्माचीं बंधनं समाजाला पाहिजेत. धर्मबंधनांच्या बंधाऱ्यानं समाजाचा वाहता ओघ अडविला नाहीं तर तो अधोगतीच्याच ओहोटीला लागेल यांत शंका नाहीं. पण मतलबासाठीं—केवळ शेळपट सांप्रदायाच्या संरक्षणासाठीं जुन्या धर्मसूत्रांना नवं नागमोडी वळण देऊन त्यानं या प्रागतिक समाजाच्या पायांत पायबंद ठोकणं इष्ट कोण म्हणेल ?

**भुलेश्वरः**—तुम्ही आजकाल पोरं ! सुधारणेचे दिवे ! बहकलेल्या विचारांनीं तर्कटलेलीं तुमचीं डोकीं ! तुम्हाला देवधर्म कसला ?

**नरेंद्रः**—देवधर्म कसला ? आम्हांला—सुधारकांनांही देवधर्म आहे ! आमचा देश हाच देव आणि दया हाच धर्म ! हा तुमचा पोटभरू धर्म आम्हाला कळत नाहीं हें मात्र खास ! पण तो धर्मच नव्हे ! जो धर्म अनाथ बालविधवांचे रक्ताचे अश्रू पुसण्यासाठीं धांवत नाहीं तो कसला धर्म ?

**भुलेश्वरः**—धर्माची अशी धडधडीत विटंबना मांडतोस ? महत्पाप ! महत्पाप ! धर्माचीं तत्त्वं कांहीं शीक.

**नरेंद्रः**—मला शिकविण्यापेक्षां, तांदूळउपट्या, तूंच त्याचा प्रथम अभ्यास कर. स्त्रियांच्या बाबतींत मात्र धर्माचे कडक कायदे तिखट तलवारीचं उग्रस्वरूप धारण करून गरीबांच्या गळ्याला गळफांस लावतात. आणि पुरुष—

**भुलेश्वरः**—पुरुषांना धर्मानं सवलती दिल्या आहेत

**नरेंद्रः**—असं, म्हणूनच एका बायकोच्या दहाव्यालाच दुसऱ्या बायकोशीं लग्नसमारंभाचा दसरा साजरा करतांना तुमच्या नीच मनोवृत्ति शरमत नाहींत. मृत्यूचा घातकी हात स्वर्गाला ओढून नेत असतांही एका अजाण बालिकेचा हात लौकिकदृष्ट्या विधिपूर्वक हातांत घेऊन स्वतःच्या प्रेताच्या तिरडीवरही लग्नमाळ गळ्यांत घालून घेण्याची तुमची तयारी ! एक पाऊल स्मशानांत पोहोचलं तरी दुसरं पाऊल बोहल्यावर ठेवून

त्यांना पावलोपावलीं पशूसारखं लाथाडति सुटणारा हाच कां निष्ठुर धर्म ?

**भुलेश्वरः**—चल हो बाजूला. अशी रस्ता अडवून कां उभी आहेस ? आज प्रार्तीचा दिवस ! उशीर होईल, चल, दूर हो आज वटपौर्णिमा !

**विमलाः**— वटपौर्णिमा ! वडसावित्रीची पूजा आज असं कां ?

**भुलेश्वरः**—अग हो, पण तुला कां हर्ष झाला ? तुला काय वटपौर्णिमा आणि सर्वपितृअमावास्या दोन्ही सारखींच ! मंगळागौरीची आरास आणि शिमग्याचा महोत्सव दोन्हीं एकच ! तूं पूजेला येणार कीं काय ? वडाची पूजा करणार ? संभाळ हं—खबरदार घाटावर येशील तर ! आज सवाष्ण बायका जमायच्या जिथं अन् तुझ्यासारखी अभद्रकपाळी तिथं कशाला भ्रष्टाकार करायला ? आल्या वाटेनं परत जा. पुनः अशी आडवी येऊं नकोस अपशकुनी खापरतोंड घेऊन. चल, जा. ( ती जाते. ) काय ब्याद आहे पहा ! बालरंडा—( जाऊं लागतो. समोरून नरेंद्र एकदम येऊन मनगट पकडतो. )

**नरेंद्रः**—बालरंडा ! मग काय म्हणतोस रे धर्मलंडा ? इचं तोंड पाहून तुला अपशकून झाला ? इची सांवली अंगावर पडतांच तुला विटाळ झाला, असं काय ?

**भुलेश्वरः**—विटाळ म्हणजे स्नान करून अगोदर देहशुद्धि केली पाहिजे.

**नरेंद्रः**—देहशुद्धीच नां ? मी करतों तुझी यथेच्छ देहशुद्धि ! आणि आत्मशुद्धीसाठीं जा, त्या पवित्र देवतेच्या पायाचं तीर्थ घे. जा.

**भुलेश्वरः**—तिच्या पायाचं तीर्थ ! अरेरे ! भ्रष्टाकार ! भ्रष्टाकार !! या सुधारकांनीं धर्म पार बुडविला ! ठार केला !

**नरेंद्रः**—आणि तुझ्यासारख्या सवडीशास्त्राला सोकावलेल्या धर्मवीरांनीं तो तारला ! धर्माच्या नांवावर चरणाऱ्या नंदीबैला ! या धुवट सोंवळ्यांत सडक्या हृदयाची घाण सांठविणाऱ्या नीचा ! एका बालविधवेची सांवली तुमची पवित्रता भ्रष्ट करते आणि तुमचा हा साळसूद ढोंगी सभ्यपणा रात्रीं अपरात्रीं पापाच्या खातेऱ्यांत लोळत पडतो त्या वेळीं तुमचं पावित्र्य शुद्ध राहतं अँ ! डोळे मिटून भर रस्त्यावर पवित्र दीन वैधव्याकडं पापी दृष्टि रोंखून मग ही देवाच्या नांवानं केलेली गंभीर गर्जना म्हणजे धर्म झाला काय ? मनाचं ओढाळ गुरु पापाच्या मार्गानं दौडत असतां तोंडाची

ही मंत्राची पोकळ पोपटपंची, वेदांताची वृथा वटवट म्हणजे धर्मरक्षण नव्हे! हा जुनं तेवढं सोनं असं मानणारा दरिद्री दुराग्रह! हा धर्म नव्हे तर गतानुगतिक रूढीच्या सांप्रदायरूपी प्रेताला कवटाळून बसण्याचा विचित्र वेडेपणा! ही खऱ्या धर्माची भूल! अंधळ्या जनतेची दिशाभुल!

**भुलेश्वरः**—तुम्ही आजकालची पोरं! सारीं अशीच. म्हणे ही दिशा-भूल! मग पूर्वीच्या महाज्ञानी ऋषींनीं घालून दिलेला वेदप्रणीत धर्म—

**नरेंद्रः**—त्रिकालवंद्यच आहे! धर्माचीं बंधनं समाजाला पाहिजेत. धर्मबंधनांच्या बंधाऱ्यानं समाजाचा वाहता ओघ अडविला नाहीं तर तो अधोगतीच्याच ओहोटीला लागेल यांत शंका नाहीं. पण मतलबासाठीं—केवळ शेळपट सांप्रदायाच्या संरक्षणासाठीं जुन्या धर्मसूत्रांना नवं नागमोडी वळण देऊन त्यानं या प्रागतिक समाजाच्या पायांत पायबंद ठोकणं इष्ट कोण म्हणेल?

**भुलेश्वरः**—तुम्ही आजकाल पोरं! सुधारणेचे दिवे! बहकलेल्या विचारांनीं तर्कटलेलीं तुमचीं डोकीं! तुम्हाला देवधर्म कसला?

**नरेंद्रः**—देवधर्म कसला? आम्हांला—सुधारकांनांही देवधर्म आहे! आमचा देश हाच देव आणि दया हाच धर्म! हा तुमचा पोटभरू धर्म आम्हाला कळत नाहीं हें मात्र खास! पण तो धर्मच नव्हे! जो धर्म अनाथ बालविधवांचे रक्ताचे अश्रू पुसण्यासाठीं धांवत नाहीं तो कसला धर्म?

**भुलेश्वरः**—धर्माची अशी धडधडीत विटंबना मांडतोस? महत्पाप! महत्पाप! धर्माची तत्त्वं कांहीं शीक.

**नरेंद्रः**—मला शिकविण्यापेक्षां, तांदूळउपट्या, तूंच त्याचा प्रथम अभ्यास कर. स्त्रियांच्या बाबतींत मात्र धर्माचे कडक कायदे तिखट तलवारीचं उग्र-स्वरूप धारण करून गरीबांच्या गळ्याला गळफांस लावतात. आणि पुरुष—

**भुलेश्वरः**—पुरुषांना धर्मानं सवलती दिल्या आहेत

**नरेंद्रः**—असं, म्हणूनच एका बायकोच्या दहाव्यालाच दुसऱ्या बाय-कोशीं लग्नसमारंभाचा दुसरा साजरा करतांना तुमच्या नीच मनोवृत्ति शरमत नाहींत. मृत्यूचा घातकी हात स्वर्गाला ओढून नेत असतांही एका अजाण बालिकेचा हात लौकिकदृष्ट्या विधिपूर्वक हातांत घेऊन स्वतःच्या प्रेताच्या तिरडीवरही लग्नमाळ गळ्यांत घालून घेण्याची तुमची तयारी! एक पाऊल स्मशानांत पोहोचलं तरी दुसरं पाऊल बोहल्यावर ठेवून

लग्नाच्या लाजाहोमांत स्वतःच्या लाजलज्जेची आणि एकाद्या कोंवळ्या कुमारिकेच्या उभ्या जन्माची राखरांगोळी करण्याइतकी तुमची बेशरम वृत्ति ! धिःकार धिःकार असो ! चल, जा. मंत्राची मंडई मांडून पोटाची खळगी भर.

भुलेश्वरः—तुम्ही आजकालची पोरं ! तुमच्या तोंडाला लागणं म्हणजे स्वतःचंच तोंड फोडून घेण्याचा शुद्ध गाढवपणा करणं होय.

नरेंद्रः—आणि तुमच्यासारख्या फोल रूढीच्या सांप्रदायाचं ओझं वाहणाऱ्या पोटभरू गाढवापुढं पवित्र सनातन धर्माच्या गंभीर तत्त्वांची गीता वाचण्यांत तरी काय शहाणपण ?

भुलेश्वरः—माझा अपमान ? या जाड्या दशग्रंथी ब्राह्मणाचा असा अपमान ? झाडून सारीं शास्त्रंपुराणं उलथीपालथी घातलेल्या या वेदशास्त्रसंपन्न भुलेश्वरशास्त्र्याचा असा अपमान ? जा. रौरवांत पडशील हाच या तेजस्वी ब्राह्मणाचा तुला शाप आहे ! ( जातो )

नरेंद्रः—( त्याच्याकडं पाहून हंसत ) विसाव्या शतकांतला परशुरामच कीं नाहीं हा कीं याच्या शापानं मीं रौरवांत पडणार ? ( गंभीरपणानें ) अरेरे, काय हा समाजांत अंधार ! ज्या पवित्रतम हिंदुधर्माला साऱ्या जगानं वंद्य म्हणून शिरावर धारण केलं त्या सनातन हिंदुधर्माची दिव्यता, श्रेष्ठता, व्यापकता, या रूढीच्या दुबळ्या भक्तांना कशी उमगावी ?

## २७ पद.

**समता न दावि जनता । विनता विधि-युता वृथा या रूढिस गाणित धर्म परमचि रचि अघ-चय ॥ ध्रु० ॥ ही न्याय ममता पायीं तुडावितां सदयता न दाविति जन सहृदय ॥ १ ॥**

भगवानः—( गडबडीनें प्रवेश करून ) भाऊसाहेब, चला, असेंच घाटावर चला.

नरेंद्रः—अरे, झालं तरी काय ?

भगवानः—सारं सांगतो. चला अगोदर—( जातात )

# प्रवेश दहावा.

[ नदीचा घांट—वटपूजेचा समारंभ विमला पूजासाहित्य घेऊन प्रवेश करते. एक सुवासिनी विमलेला चुकून कुंकू लावूं लागते. पण चरकून मागें सरकते. ]

**एक सुवासिनीः**—काय बाई आश्चर्य! विमले, दांडगे, खुशाल आपली सवाष्ण बायकांत मिसळलीस कीं ! मी आतां चुकून तुला कुंकू लावणार होते नां ? तुला कांहीं तरी अक्कल ? चल—हो तिकडं एका बाजूला. ( दूर लोटते. ) [ सुवासिनी जातात. ]

**विमलाः**—( स्व. ) लोट, जगा, या अभागिणीला सौभाग्य--चिन्ह नाहीं म्हणून असाच दूर लोट ! म्हणजे जागत्या डोळ्यांनीं या जगांतून कायमची जातांना जिवाला दिक्कत तरी वाटणार नाहीं. सौभाग्य ! 'सौभाग्य' या तीनच अक्षरांत तिन्ही लोकांची मंगलता एकवटली आहे ! 'सौभाग्य' या एकाच शब्दांत आर्यस्त्रीच्या आयुष्यांतील सुखाचा स्वर्ग, प्रेमाचं पुण्य-धाम, आनंदाचा नंदनबाग भरला आहे ! सौभाग्य ! पण माझं सौभाग्य कसं हरपलं ? माझा सौभाग्यरवि कसा मावळला ? सौभाग्यावांचून स्त्रीचं जिणं म्हणजे प्राणावांचून कवडीमोल कुडी ! नाथ—नाथ ! पण माझे नाथ कसे होते ? नाथ, आपल्या मनोहर मंगल मुखचंद्रम्याचं चित्रसुद्धां मनःचक्षुपुढं मला मूर्तस्वरूपांत मांडता येत नाहीं. नाथ, मीही आपल्या स्वर्गीय सुखाची वांटेकरीण व्हायला येतें. अहाहा ! स्वर्गसुखाच्या कल्पनेनेंच सुखाचा स्वर्ग डोळ्यापुढं खडा झाला ! पण मी आपणाला ओळखूं तरी कशी ? सावित्री देवीनं आपला पति यमधर्माकडून परत मिळविला. अंगच्या हुषारीनं, सत्याग्रहाच्या हट्टानं मागून घेतला पण नाथ, मी आपणाला कशी ओळखूं ? 'हेंच माझे पतिदेव' असं बोट दाखवून माझं सौभाग्य मी परत कसं मिळवूं ? नाथ, दाखवा—आपली मनोहर मूर्ति या दीन दासीला दाखवा !

## २८ पद.

**नाथा गुणमया ! । आतां करि दया । कुठे शोधुं वाया ? बोला राया ! जिवाया या शांतवाया ॥ ध्रु० ॥ हृदय-राजीवा या । प्रेमामृता द्या । फुलाया खुलाया मानस हंसा ! राजसा ! आनंदवाया ॥ १ ॥**

देवी ! सावित्री देवी ! जीवाच्या जाइजुई या पुण्यप्रसंगीं प्रसन्नतेनं फुलून गेल्या आहेत. माझ्या अंतःकरणाच्या आळवणीला धांव आणि या पुष्पांजली बरोबरच या जीवाच्या करपल्या कळीलाही आपल्या पवित्र चरणीं आसरा देऊन माझ्या जीवाचा जगदीश्वर मला भेटीव म्हणजे झालं !

( हार वाहूं लागते इतक्यांत भीमामावशी येऊन तिचा हात धरते. )

**मावशी:**—अगं, थांब–थांब—चांडाळणी, काय करतेस हें ? हा हा तुझ्या हातचा विटाळलेला हार वडाला घालतेस ? पापिणी, कुठं फेडशील हें पाप ! ( हार हिसकावून घेऊन पायाखालीं तुडविते. )

**विमला:**—( दुःखानें ) सासूबाई, काय केलंत हें ? वटसावित्रीच्या पूजेसाठीं गुंफलेला जीवाभावाचा हार असा निष्ठुरतेनं पायाखालीं तुडविलांत ? त्या देवीनं या माझ्या हातच्या हाराचा असा अव्हेर मुळींच केला नसतां ! मानवी विकारांनीं निर्दयता दाखविली तरी त्या परमेश्वरी पवित्र शक्तीनं इतकी कठोरता खास दाखविली नसती ! ( धुळींतील फुलं वेंचून ) या फुलांनों ! सांगा, देवीच्या मंगल चरणावर तुम्हाला उधळतांना माझ्या वैधव्याच्या अशुभानं तुमच्या दैवी तेजाचं पावित्र्य काळवंडलं कां ? सांगा ! या विधवेच्या हातीं पडतांच तुमचं पावित्र्य भ्रष्ट झालं कां ?

## २९ पद.

**गोजिऱ्या कळ्या फुलांनों ! सृष्टि-माय-सोनुल्यांनों ! ही कां मौनता ? ॥ ध्रु० ॥ कां स्पर्श पापी विधवेचा । भाव अमंगळ खुल्या दिलाचा ? । ओसरली कां तेजोगंगा ? । भ्रष्ट काय झाला सांगा । हंसा ना आतां ॥ १ ॥**

पहा, सासूबाई, या फुलांची पाकळीन् पाकळी तुम्हाला उपहासानं हंसून नाहीं असंच उत्तर देत आहे. जगाच्या गढूळ दृष्टीला पापी दिसणाऱ्या या माझ्या हस्तस्पर्शानं करपून न जातां दाही दिशेला दरवळणारा यांचा हा सुगंध जगाला हीच ग्वाही देत आहे कीं वैधव्य म्हणजे अपवित्रतेची अमंगळ निशाणी नव्हे ! बालविधवा म्हणजे पापी गुन्हेगार नव्हे तर समाजाच्या क्रूरतेला दुर्दैवानं विकलेली मुकी गाय ! अधःपात झाला असतांहि सौजन्याचा सुगंध पसरून ही टवटवीत हंसरीं फुलं हेंच सांगत आहेत !

**मावशीः**—अगं चेटकिणी, तीं फुलं तुला सांगतात हं ! नाटकसाळ भवाने, दे फेंकून तीं ! भ्रष्टाकार माजवतेस असा ? उद्यां लोक मला वाळीत टाकतील.तुला कुठं आहे धर्म न् कर्म ? तुझा हा जिवंत अपशकून माझा कुठं केव्हां कसा घात करील—

**शामसुंदरः**—( घाबरेपणानें प्रवेशून ) घात–घात–मावशी, सर्वस्वी घात झाला ! चोरी, दिवसाढवळ्या दरवडा ! पांच हजारावर डल्ला मारला !

**मावशीः**—काय म्हणतोस ? [ छाती बडवून घेऊन मटकन् खालीं बसते. ] माझी तर छाती दडपली रे बाबा ! आतां काय करूं रे देवा !

**शाम०ः**— मावशी, घाबरूं नकोस अशी. चोर कांहीं लांब नाहीं. मी त्याला पूर्ण ओळखतों.

**मावशीः**—कुठं आहे ? कुठं आहे सांग, आत्तां त्याचा समाचार घेतें— ( उठून जाऊं लागते )

**शाम०ः**—चाललीस कुठं ? चोर तर इथंच उभा आहे.

**मावशीः**—कोण ? ही अवदसा ?

**विमलाः** - कोण ? मी ?

**शाम०ः**—अलबत्, तूंच. मावशी, झडती घेऊन पहा. चोरी सांपडलीच पाहिजे. ( ती झडती घेते–नोटा सांपडतात–विमला सखेद आश्चर्यचकित होते. )

**विमलाः**—(स्व.) अस्सं, काळसर्पा, असा उलटा डाव केलास काय ?

**मावशीः**—अगं चांडाळणी, चोरी, चहाडी, शिंदळकी–साऱ्या गुणांत कशी तरबेज तूं ? मला मातीला मिळवायचा तर तुझा मतलब नाहीं ना ?

**शाम०ः**—मावशी, अशांच देऊं कां पोलीस चौकींत वर्दी ? म्हणजे निघतील चांगले अब्रूचे धिंडवडे ! पण कुणाच्या ? आमच्याच ! हिला काय ? अब्रू असेल तर त्याचे धिंडवडे निघायचे. शिवाय दुसरं असं कीं आपलेच दांत आणि आपलेच ओंठ ! घरांतली अब्रू चव्हाट्यावरच्या मंडईत मांडण्यांत तरी काय शहाणपणा ?

**मावशीः**—शाम—!

**शाम०ः**—मावशी—!

**मावशीः**—इच्यापुढं आतां मी डोकं कां फोडून घेऊं कीं हिचंच डोकं दगडानं ठेंचून टाकूं ?

शाम०:—पहा बुवा तुझं तूंच ! आहे हा प्रकार असा आहे ! उद्यां अशांच घराला आग लागेल. तुला मला विषप्रयोग सुद्धां व्हायचा !

मावशी:—आहेच ती तशी ! ( मारते ) गोगलगाय आणि पोटांत पाय ! हं—घ्या इथंच आतां जलसमाधी ! खबरदार पुनः घरांत पाय टाकशील तर ! होती कीं नव्हती करून टाकीन—

विमला:—नाहीं—नाहींच येत मी घरीं ! माझा सोक्षमोक्ष आज इथल्या इथंच होणार आहे ! या देवीच्या पायावरच डोकं ठेवून कायमचे डोळे झांकणार मी. नको—तें घरहि नको आणि ते जगणंहि नको ! तुमचा माझा लागाबांधा आज संपला !

शाम०:—या देवीच्या पायावर डोकं ठेवून म्हणे जीव सोडणार ! मोठी संत सखूबाईच लागून गेली कीं नाहीं ? चोरी करून वरती या उलट्या बोंबा ! वा रे ! पुण्यशील संत सखूबाई !

विमला:—माझं भाग्य त्या देवतेएवढं कुठं आहे ? तिच्या भेटीला पंढरीचा पांडुरंग आला !

मावशी:—तुझ्याही भेटीला येईल कीं कुणी तरी सोदा अनाथ पांडुरंग ! नाहीं तर तूंच जा हें डबोलं घेऊन त्याच्या डोंबलावर घालायला ! बोल, अवदसे, हा पराक्रम गाजवलास तरी केव्हां आणि कसा ? केव्हां चोरल्यास नोटा ?

विमला:—मी चोरल्या नाहींत, मला ठाऊक नाहींत.

शाम०;—या पापाबद्दल प्रायश्चित्त देव खास देईल !

विमला:—पण ज्यानं तें पाप केलं असेल त्याला. मला नव्हे.

मावशी:—मग काय ? तूं चोरल्या नाहींस ?

विमला:—नाहीं—नाहीं—नाहीं. कितीदां सांगूं ! ( मावशी मारूं लागते) हां—दूर व्हा सासूबाई, खबरदार माझ्या अंगाला हात लावाल तर ! आजपासून तुम्ही मला मेलात आणि मी तुम्हांला मेले !

मावशी:—तूं मेलीस तर दुनिया थोडीच ओस पडणार आहे ?

शाम०:—जगांत थोडाच धरणी कंप होणार आहे ?

मावशी:—तुझ्या नांवानं चार तांबेसुद्धां डोकीवरून घेणार नाहीं. पुनः विचारते, बऱ्या बोलानं कबूल हो. तूं नाहीं चोरी केलीस ?

विमला:—नाहीं—हजारदां विचारलं तरी हेंच एक उत्तर !

**मावशीः**—तूं चोरल्या नाहींस तर काय गांवांतल्या चोरानं तुझ्या पोथींत आणून ठेवल्या या नोटा !

**विमलाः**—असेल ! तसंही असेल ! देवाला ठाऊक !

**शाम०ः**—पहा, मावशी, उद्दामपणाचीं उडवाउडवीचीं उलट उत्तरं कशीं येत आहेत तीं ! पाठिंबा सबळ आहे ना त्या नरेंद्राचा !

**विमलाः**—प्रत्यक्ष कराल काळाला न डगमगतां खुषीनं कवटाळायला मी तयार झाले आहे तर तुम्हांला आतां भिऊं कीं काय ? या अशा अन्यायानं चिडून जाऊन गरीब शेळीसुद्धां चवताळलेल्या सिंहिणीची उग्रता धारण करील.

**शाम०ः**—चोरी तूं केली नाहींस, मावशीनं केली नाहीं, तर काय मी केली ?

**वारुताईः**—(प्रवेशून) होय-होय-तूंच केलीस ! नराधमा, तूंच केलीस.

**शाम०ः**—कुणी मी ?

**वारु०ः**—होय तूंच-तूंच. हिच्यावर चोरीचं कुभांड रचून हिचा सूड घेण्याच्या बुद्धीनं सकाळीं तूं या नोटा या गुरुचरित्राच्या पोथींत ठेवल्यास ! ही सैतानशाही तुझीच आहे-हिची नव्हे !

**शाम०ः**—पण याला पुरावा ?

**वारुताईः**—प्रत्यक्ष हे माझे डोळे !

**शाम०ः**—मावशी ही या दोघींची मसलत आहे.

**मावशीः**—(विमलेस)हां-कवटाळिणी, चोरी तरी कबूल कर नाहीं तर जीव द्यायला तरी तयार हो. सोड आतां प्राणावर तिलांजली !

**विमलाः**—प्राणावर तिलांजली पूर्वींच सोडली आहे. भग्न हृदयाचे तिळतिळ तुकडे अश्रूंच्या पाण्यांत कालवून प्राणांचं उदक या काळाच्या हातावर सोडण्यासाठींच मी इथं आली आहे. ही पहा, आपण होऊन मी काळाच्या खड्डयांत उडी घेते ! तुमचं तरी राक्षसी समाधान होऊं दे. ( नदीकडे धांवते. )

**मावशीः**—( तिला थांबवून ) अशी नाहीं तुला मरूं देणार मी. माझ्या हातांनीं तुझ्या टाळक्यांत दगड घालून तुझा कपाळमोक्ष करीन त्याचवेळीं माझे डोळे निवतील बघ-

**वारुताईः**—( मावशीला ) महामाये ! ही वारुताई इथं जिती जिवंत

उभी असतांना विमलेच्या केंसालाही धक्का लावण्याची तुझी काय मगदूर ! [ विमलेला जवळ घेते. )

**मावशीः**—[ वारुताईला हिसडा देऊन ] चल—हो दूर. शाम, असा अजागळसारखा ' आ ' करून भेकडासारखा काय पहात राहिलास ? उचल धोंडा आणि घाल हिच्या डोकींत—

**दीनानाथः**—( धांवत प्रवेशून ) नका—नका, माझ्या लाडक्या ताईला मारूं नका. तुमची इच्छाच असेल तर माझं डोकं दगडानं ठेंचा पण माझ्या ताईला नका हो हात लावूं ? तिला मारूं नका. तिच्याबदली मला मारा. ताई—ताई—

**शाम०ः**—चुप् कार्ट्या,एक शब्द अधिक बोलशील तर जीभ मुळापासून—

**दीनानाथः**—उपटून टाका-खुशाल उपटून टाका. पण माझ्या ताईला मारूं नका.

**शाम०ः**—तूं आणि तुझी ताई—दोघानांही एकाच वेळीं एकाच सरणाच्या शय्येवर कायमची काळनिद्रा घ्यायला लावतो. चल—ये असा कारट्या, तुलाच अगोदर स्वर्गाची वाट दाखवितो—

**विमलाः**—नका—नका. माझ्या दीनाला नका स्वर्गाची वाट दाखवूं. त्याच्या ऐवजीं मला सातदां स्वर्गांत धाडा पण माझ्या बाळाला—!तुमच्या पुढं मी पदर पसरते. माझ्या दीनाच्या जीवदानाचा जोगवा मला घाला ! मला जाऊं दे या जगांतून पण माझ्या दिनाला शतायुषी होऊं दे !

**मावशीः**—ही पहा, तुझ्या दिनाला शतायुषी करते ! ( दगड उचलूं लागते. भयंकर सर्प फणा काढून तिच्यावर फूत्कारितो. ) अगबाई ! धांवा ! साप—साप ! [ नरेंद्र आणि भगवान प्रवेश करतात. ]

**नरेंद्रः**—हात आंवर, राक्षसिणी, हात आंवर ! हा सर्प या मानवीं काळसर्पापेक्षां अधिक विषारी खास नाहीं ! ( वारुताईस ) ताई, विमलेला आणि दिनाला घेऊन घरीं चल.

**शाम०ः**—नरेंद्र, हें धडधडीत किडनॅपिंग आहे !

**नरेंद्रः**—चले जाव सैतान !

**मावशीः**—दुसऱ्याच्या पोरी फूस लावून पळवून नेतोस ?

**नरेंद्रः**—चुप्, थेरडे, या काळसर्पाला गळ्यांत बाळगून पोटच्या गोळ्याच्या अनाथ पत्नीवर—प्रत्यक्ष सुनेवर ही धोंड आढळतेस ? स्त्री-

जातीला कलंक झालेल्या महामाये! पहा–पहा, चांडाळणी, दयाळू देवाच्या दरबारीं न्याय आहे हें सांगण्यासाठींच हा काळदूत तुझ्यावर फुत्कारीत आहे!

**शाम०:**—(आवेशानें) पर्वा नाहीं. मेलों तरी बेहेत्तर पण अगोदर हिला ठार करून सूडाचं समाधान तर मिळवीन!

[ शामसुंदर दगड उचलतो. पुनः सर्प अंगावर फुस् करून येतो. सर्व घाबरतात. ] [ पडदा ]

## अंक दुसरा समाप्त.

उभी असतांना विमलेच्या केंसालाही धक्का लावण्याची तुझी काय मगदूर ! [ विमलेला जवळ घेते. )

**मावशीः**—[ वारुताईला हिसडा देऊन ] चल–हो दूर. शाम, असा अजागळसारखा ' आ ' करून भेकडासारखा काय पहात राहिलास ? उचल धोंडा आणि घाल हिच्या डोकींत—

**दीनानाथः**—( धांवत प्रवेशून ) नका–नका, माझ्या लाडक्या ताईला मारूं नका. तुमची इच्छाच असेल तर माझं डोकं दगडानं ठेंचा पण माझ्या ताईला नका हो हात लावूं ? तिला मारूं नका. तिच्याबदली मला मारा. ताई–ताई—

**शाम०ः**—चुप् कार्ट्या,एक शब्द अधिक बोलशील तर जीभ मुळापासून—

**दीनानाथः**—उपटून टाका-खुशाल उपटून टाका. पण माझ्या ताईला मारूं नका.

**शाम०ः**—तूं आणि तुझी ताई–दोघानांही एकाच वेळीं एकाच सरणाच्या शय्येवर कायमची काळनिद्रा घ्यायला लावतो. चल–ये असा कारट्या, तुलाच अगोदर स्वर्गाची वाट दाखवितो—

**विमलाः**—नका–नका. माझ्या दीनाला नका स्वर्गाची वाट दाखवूं. त्याच्या ऐवजीं मला सातदां स्वर्गांत धाडा पण माझ्या बाळाला—!तुमच्या पुढं मी पदर पसरते. माझ्या दीनाच्या जीवदानाचा जोगवा मला घाला ! मला जाऊं दे या जगांतून पण माझ्या दिनाला शतायुषी होऊं दे !

**मावशीः**—ही पहा, तुझ्या दिनाला शतायुषी करते ! ( दगड उचलूं लागते. भयंकर सर्प फणा काढून तिच्यावर फूत्कारितो. ) अगबाई ! धांवा ! साप–साप ! [ नरेंद्र आणि भगवान प्रवेश करतात. ]

**नरेंद्रः**—हात आंवर, राक्षसिणी, हात आंवर ! हा सर्प या मानवीं काळसर्पापेक्षां अधिक विषारी खास नाहीं ! ( वारुताईस ) ताई, विमलेला आणि दिनाला घेऊन घरीं चल.

**शाम०ः**—नरेंद्र, हें धडधडीत किडनॅपिंग आहे !

**नरेंद्रः**—चले जाव सैतान !

**मावशीः**—दुसऱ्याच्या पोरी फूस लावून पळवून नेतोस ?

**नरेंद्रः**—चुप्, थेरडे, या काळसर्पाला गळ्यांत बाळगून पोटच्या गोळ्याच्या अनाथ पत्नीवर—प्रत्यक्ष सुनेवर ही धोंड आदळतेस ? स्त्री-

जातीला कलंक झालेल्या महामाये ! पहा—पहा, चांडाळणी, दयाळू देवाच्या दरबारीं न्याय आहे हें सांगण्यासाठींच हा काळदूत तुझ्यावर फुत्कारीत आहे !

**शाम०:**—(आवेशानें) पर्वा नाहीं. मेलों तरी बेहेत्तर पण अगोदर हिला ठार करून सूडाचं समाधान तर मिळवीन !

[ शामसुंदर दगड उचलतो. पुनः सर्प अंगावर फुस् करून येतो. सर्व घाबरतात. ] [ पडदा ]

## अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

[ व्हिक्टोरिया टर्मिनस् स्टेशन. वेटिंगरूम. भीमामावशी आणि शामसुंदर प्रवेश करतात.]

**मावशी:**—गेली, सटवाई त्या नऱ्याचा हात धरून शेवटीं पळून गेली. सटवाईला नाहीं नवरा आणि म्हसोबाला नाहीं बायको ! मला तर ते सारं घर कसं खायला आलं होतं ! उभा गांव कांहीं वर तोंड काढूं देईना. तसं केलंच म्हणा त्या अवदसेनं ! बरं झालं टळली तें. माझ्या उरावरची जळती शेगडी तरी दूर झाली. तरी बरं, शाम, तुला ही काशीयात्रेची सोळा आणे कल्पना सुचली ! या निमित्तानं तरी गांव सोडण्याची संधि मिळाली.

**शाम०:**—अगं मावशी, वहिनी इथं या मुंबईलाच आहे म्हणे ! नरेंद्रानं डॉक्टरीची प्रॅक्टीस सुरू केली आहे. त्या दोघांची चैन चालली असेल आतां.

**मावशी:**—कलियुग ! बाबा, हें कलियुग बरं ! माझा वसंत गेला. ती अवदसाही लोकांतून उठून गेली. शाम, आतां तुझाच काय तो मला या म्हातारपणीं आधार ! अंतकाळीं तूंच मला पाणी पाजविणार.

**शाम:**—( स्वगत ) चांगलेंच पाणी पाजवतो !

**मावशी:**—तुझं एकदां लगीन झालं, कीं मी सुटलें.

**शाम०:**—लग्न ? मावशी, आतां कशाला लग्न ? मला आतां आयुष्यांत मौजच वाटत नाहीं. झाले, एकदां एकदां सारे सोहाळे होऊन गेले.

**मावशी:**—पण, बाबा, नशिबापुढं कांहीं रडायचं आहे कां ? आज रमा असती तर तिनं चांगला संसार नसता कां उजविला ?

**शाम०:**—( दुःखमिषानें ) हां ती गेली अन् आमचा संसारच

आटोपला. आतां तशी बायकोही मिळायची नाहीं. आणि त्या लग्नाच्या गोष्टीच नकोत.

**मावशीः**—छे छे, वेड्या, असं कुठं झालंय मुलुखांत? तरणाबांड, शिकलेला, गुणाचा तूं. माझ्या मागं या घरांत तूंच दिवा लावणार! एवढ्या या काशीयात्रेहून परतलें, कीं टाकतें येत्या शिमग्यांतच तुझं लग्नीन उरकून.

**शामः**—( स्वगत ) थेरडे, काशीयात्रेहून परततेस कसली? आजच तुझा या जगांतला अखेरचा दिवस! ( उघड ) मावशी, आतां मला कांहींच इच्छा नाहीं. बस्स, म्हातारपणीं तुझी सेवा करावी आणि तुला सुख द्यावं एवढी इच्छा बाकी आहे.

**मावशीः**—पण शामू, काशियात्रेला निघायची जरा घिसाड घाईच झाली नाहीं?

**शामः**—माझं काय? चार महिन्यानंतर निघालों असतों तरी माझं कुठं बिघडत होतं? पण तुझीच इच्छा बलवत्तर दिसली, मग म्हटलं आतां विलंब नको. शुभस्य शीघ्रम्!

**मावशीः**—होय बाबा, तेंही बरंच झालं. नाहींतर काशीयात्रा म्हणतां म्हणतां पटकन् माझ्या महायात्रेचीच तयारी करावी लागायची तुला. बरं, पण आतां इथं स्टेशनवरच किती वेळ बसायचं?

**शामः**—हें पहा, मावशी, असं करूं? आजचा दिवस कांताआक्काच्या इथं राहूं, नंतर उद्यां जी.आय. पी नं जायचं कीं बी. बी. सी नं प्रथम मथुरा करून नंतर बनारस गाठायचं तें स्वस्थपणें ठरवूं. बरं, तूं बैस इथंच. सावधगिरीनं रहा. मी एक व्हिक्टोरिया ठरवून येतों. [ जाऊं लागतो, पुनः परतून ) हो, पण मावशी, तो दागिन्यांचा डबा इकडं दे माझ्याजवळ. या बॅगमधें ठेवतो, म्हणजे तुझ्या जीवाला घोर नाहीं.

**मावशीः**—म्हणंजे? मला तूं बाळबुद्धीची कची समजलास कीं काय? अरे, दिल्लीला जाऊन येईन एकटी; दिल्लीला! तूं काय समजलास?

**शाम०ः**—तें खरं, पण मावशी, ही मुंबई आहे! इथल्या पठाणांच्या लीला तुला माहीत नाहींत. दिवसाढवळ्या भर रस्त्यावर खून पाडतात खून! काळाचा पाश पुरवला, पण त्या पठाणांचा सुरा नको. शिवाय, हे मुंबईचं गप्पोदास भामटे, हां हां म्हणतां डोळ्यांत धूळ फेंकतात. म्हणून म्हणतां—

मांवशी:—( घाबरून ) असं कां ? बाबा, तर हा डबा तुझ्याजवळच ठेव. ( दागिन्यांचा डबा देते. तो बॅगमधें ठेवतो.) बरं, लौकर ये.

शामसुंदर:—हा आलोंच पहा. ( स्वगत ) आतां करूंचे हिला हा शामसुंदर तोंड दाखवितों ! ( विकट हास्य करून ) काशीयात्रा ! या थेरडीची महायात्रा आतां मुंबईतच उरकणार ! दोन हजाराची रोकड आणि हे पांच हजारांचे दागिने तर या पठ्याच्या हातीं पडले आज. पुढचं पुढं ! काशीयात्रेच्या प्रवासांत ही थेरडी मेली अशी अफवा लोकांत उठवून त्या घरादाराचा करतो लिलांव आणि ठेवतों या मुंबईतच कायमचं बस्तान ! एकदां हा शामसुंदर पैसेवाला होऊन मोटारी उडवूं लागला कीं त्याचा मागला इतिहास कोण पहाणार ? मग माझी लब्धप्रतिष्ठितांत गणना झालीच म्हणून समजा. कारण, 'यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः'! या मुंबईत माझ्यासारखे असे पाजी लब्धप्रतिष्ठित किती तरी आहेत, कीं पापाच्या पायावर वैभवाचे डोलारे रचून श्रीमंतींत लोळत, समाजांत 'बडे' म्हणून खुशाल उजळमाथ्यानं वावरत आहेत. पैसा ! पैशाचा पराक्रम अजब आहे. एक पैसा जवळ असला कीं, मानमरातब, कीर्ति, प्रत्यक्ष स्वर्गसुद्धां खरेदी करतां येतो. या पैशाच्या पाठिंब्यावर मी सप्तपाताळांची सातदां उलथापालथ करीन. [ जातो.]

मावशी:—( स्वगत ) शामूनं पठाणांचं नांव काढतांच माझं काळीज तर धडधडूंच लागलं. बरं झालं, तें जड जोखीम त्याच्याच हवालीं केलं, नाहीं तर जिवावरचाच प्रसंग गुजरायचा. आतां ते मेले पठाण आले तरी काय घेणार ? पण ते रामोशी मलाच घेऊन गेल तर ! (एक पठाण येतो.)

पठाण:—ए बुड्ढी, दे दो जलदी. जो कुछ तुमारे पास पैसा आडका हो वह सब रख दे यहां. नहीं तो जानसे मार डालूंगा ! याद रखना, जलदी करो.

मावशी:—( घाबरून ओरडते.) धांवा, धांवा, मेलें—वांचवा—

पठाण:—हां. खबरदार, फुजुल शोर न मचाना! चिल्लाना मत् !( सुरी दाखवून ) देखा, यह क्या है देखा ? तुम्हारा काल !

मावशी:—अगबाई, देवा तूंच सांभाळ ! बाबा, त्यांत काय असेल तें घे. पण माझा प्राण घेऊन नको. ( पठाण बोचकें सोडून त्यांतले चांदीचे देव आणि पूजापात्रें काढतो. ) अगबाई, या दैत्यानं माझ्या देवावरच

हल्ला केला ! मेल्यांना देवधर्माची कांहींच कशी भीति नाहीं? ( पठाण इकडे तिकडे पहात चटकन् तें बोचकें घेऊन पळून जातो. ) गेला मेला एकदाचा. तरी बरं ! त्या देवानंच हें प्राणसंकट टाळलं म्हणायचं ! मेल्यानं माझा चांदीचा बाळकृष्ण नेला हो ! नेईना कां म्हणा. प्राण घेऊन गेला नाहीं हेंच भाग्य ! पण हा शाम्या कां बरं अजुनी आला नाहीं? कीं त्यालाही गाठलं एकाद्या पठाणानं? छे, बाई, त्याची वाट पाहतां पाहतां स्वर्गाची वाट धरावी लागायची ! [ जाते. ]

---

# प्रवेश दुसरा,

[ श्रीयुताचें घर—श्रीयुत विचित्र पोषाखांत बाहेर निघाला आहे. ]

**श्रीयुतः**—[ कांतेचा हात झिडकारून ] सोड, सोड मला. एका महत्त्वाच्या कामासाठीं मी बाहेर निघालों आहे. [ फोटो पाहतो. ] या वेळीं तुझं तोंड सुद्धां पहायची माझी इच्छा नाहीं.

**कांताः**—( स्वगत ) पाहतां तें कुणाचं तोंड? ( प्र. ) पण हा विक्षिप्त-रावासारखा, विचित्र पोषाख करून कुठं चाललांत? कुणाला वाटेल कीं ' विचित्रलीले ' तील विचित्रच—

**श्रीयुतः**—रंगभूमीची मर्यादा ओलांडून रस्त्यानं राजरोस फिरूं लागला आहे, असंच ना? पण वेडे ! हा विचित्र पोषाख नव्हे. ही अप-टु-डेट फॅशन आहे ! यांतलं मर्म तुला काय कळणार? .

**कांताः**—खरंच. मला कसं कळावं तें? मी अरसिक ! मर्मज्ञ कुठं आहे? पण मला मात्र नेहमीं मर्मी झोंबेलसं बोलायचं कीं गबाळग्रंथी गयाळ ध्यान म्हणून. पण आपण—

**श्रीयुतः**—अगं, आम्ही कवि, लेखक, कादंबरी-नाटककार म्हणजे परोपदेशे पांडित्य गाजविणारे जगाचे उपदेशक ! मनांतल्या विचारांची आणि आचारांची सांगड घातली तर भलतंच त्रांगडं व्हायचं ! लिहायचं एक, बोलायचं एक आणि करायचं भलतंच ! बोलल्याप्रमाणंच मी चालूं

लागलों तर 'बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें' असं सांगणाऱ्या तुकारामाप्रमाणं माझ्याही कवितेच्या चोंपड्या कुणी दरी समुद्राच्या इंद्रायणींत बुडवून टाकायचा आणि पाउलं वंदून पाद्यपूजा करण्याऐवजीं खरपूस खेटरपूजा मात्र बांधायचा! बरं पण सोड. वेळ झाला.

**कांता**:—कां ? कुठली गाडी गांठायची आहे वाटतं ?

**श्रीयुत**:—नुसती साधी गाडी नव्हे तर स्पेशल!

**कांता**:—कुठं ? चर्नीरोड गार्डनमध्यें ?

**श्रीयुत**:—वः कसं पण ओळखलंस! तुझ्या डोक्याचे ढिले स्क्रू माझ्या सहवासानं आस्ते आस्ते बरेच बळकट होऊं लागले आहेत. ती स्पेशल गाडी गांठायला हा स्पेशल थाट केला आहे. बरं, चल सोड.

**कांता**:—मी नाहीं जाऊं द्यायची अशा हेंगाड्या वेषानं लोक हंसायला!

**श्रीयुत**:—लोकांना हस्तीदंती पाजळायला काय जातं ? पण या पोषाखांतलं रहस्य फक्त माझं मलाच माहीत. माझा हा पोषाख म्हणजे सर्व जातींची, सर्व मतांची, सर्व धर्मांची महासभा—स्पेशल कॉंग्रेस आहे! हिंदू मुस्लिम युनिटी, सहकारिता असहकारिता, देशभक्ति, राजनिष्ठा, सर्व तत्त्वं यांत गुरफटलीं आहेत. यावेळीं माझ्याकडं अशा मोठ्या वटारलेल्या नजरेनं न पाहतां जरा बारीक नजरेनं पहा म्हणजे मी एक वाटोळा गरगरीत भूगोल आहे भूगोल असं तुला दिसेल.

**कांता**:—तुम्ही भूगोल आणि ही त्यावरची पोषाखाची महासभा ? महाशोभा आहे खरी! ही मुसलमानी टोपी—

**श्रीयुत**:—मुस्लिम धर्माची विजयझेंडी आहे. ही खादीची बाराबंदी बंडी म्हणजे मूर्तिमंत आर्यसंस्कृतीचा अस्सल अभिमान! शिवाय असहकारितेची चालू राष्ट्रीय चळवळ—

**कांता**:—ढेंकणांची चळवळ दिसतें आहे यांत!

**श्रीयुत**:—ही फ्लॅनेलची फॅशनेबल पॅंट म्हणजे पाश्चात्यसंस्कृतीची ऐट! तिनं माझे असे हे पाय धरले आहेत!

**कांता**:—आणि याच्या खालीं हा पुणेरी पायपूस, तोही फाटका! काय पण शोभतो आहे!

**श्रीयुत**:—हा पायपूस म्हणजे ब्राह्मणशाही अजागळ दिमाख आहे.

पुणेरी पगडी आणि पुणेरी पायपूस यामुळंच तर टिळकांनीं साऱ्या जगावर पगडा बसविला. पुण्याचं पाणी असं नखशिखांत त्यांच्या अंगांत खेळत होतं म्हणून तर त्यांनीं प्रतिपक्षाला पाणी पाजलं! हो, पण, या पगडी पायपूसाच्या पुराणांत जायचा अध्याय तसाच राहिला. पण तूं विनाकारण माझ्या वेळेची खोटी करतेस झालं.

**कांता:**—अस्सं. अस्सं. हं, कळलं, सारं कळलं. आतां कशाला चोरून ठेवतां?

**श्रीयुत:**—यांत चोरी कसली? एक प्रख्यात कवियित्री—

**कांता:**—तिचं नांव?

**श्रीयुत:**—'श्रीमती शैलबाला' अहाहा! नांवांतच काय जादू आहे! रोमान्स, पोइट्री, चार्म! त्रिवेणी संगम झाला आहे!

**कांता:**—ती तुम्हांला भेटायला येणार आहे वाटतं तिथं?

**श्रीयुत:**—हो. तिची माझी एंगेजमेंट ठरली आहे.

**कांता:**—खरं आहे. दोघेही रसिकच! पण असला हा सावळागोंधळ—

**श्रीयुत:**—चुप्. भलतीच शंका? तिचं लग्न झालं आहे. मी सुद्धां विवाहितच आहे. लग्नाचा पासपोर्ट जवळ असला कीं कोणत्याही तरुण युग्मानं कुठं कसं कांहींही केलं तरी त्याविषयीं शंका घेणं महामूर्खपणा आहे. पंचाईत असते लग्नाचा पासपोर्ट जवळ नसलेल्या अविवाहितांची! जग त्यांच्याकडं वक्रदृष्टीनंच पाहत असल्यानं त्यांच्या सिध्या नजरेंतही जगाला वांकडेपणाच दिसतो आणि त्यांचं सरळ पाऊलही वाकडं पडल्याचाच त्याला भ्रम होतो. चल सोड. मी नामांकित रसिक कवि आहें. रसिक लोक असे लागायचेच पाठीमागं. माझं तोंड वाजवूं नकोस ज्यास्त. तोंड घेऊन जा कशी. ( बॅग घेतो. )

**कांता:**—(स्व.) आज सरोजिनीनं सांगितल्याप्रमाणं यांच्या डोळ्यांत चांगलंच चुरचुरणारं अंजन घालते. [जाते. श्रीयुत जाऊं लागतो. शामसुंदर एकदम प्रवेशून त्याला थांबवितो. ]

**शाम०:**—श्रीयुतराव, थांबा. एकदम थांबा. माझं तुमच्याकडं कांहीं जरूरीचें काम आहे.

**श्रीयुत:**—अहो, पण असे पोलीस किंवा पठाण पाठीं लागल्यासारखे घाबरलांत कां?

**शाम०:**—तसं कांहीं नाहीं. पण मी एक मासिक काढलं आहे.

**श्रीयुतः**—काय म्हणतां ? अहो, हीं वर्तमानपत्रं आणि मासिकं काढायची अवदसा तुम्हांला कोठून आठवली ? अहो, मासिकपत्रं, दैनिकं चालविणं म्हणजे तुम्ही पोरखेळ समजलांत कीं काय ? संभाळा हं. तुमच्या मासिकाचं बारसं आणि बारावा एकदमच उरकण्याचा प्रसंग येईल तुमच्यावर !

**शाम०:**—अहो, तशीच अवस्था झाली आहे. मजकूर नाहीं! या महाराष्ट्रांत कवि, लेखकांचं पैशापासरी पीक फोंफावलं आहे तरी मॅटर मिळत नाहीं. बड्या लेखकखंडांनीं हा पोटभरू लिहिण्याचा धंदा सुरू करून आपल्या अकलेचा लिलांव शेंकड्यावारी सुरू केला आहे ! अगोदर पैसे मग लेख. अहो, तुटपुंजे कविसुद्धां मोबदला मागूं लागले तेव्हां म्हटलं श्रीयुतराव आपले घरचेच आहेत त्यांच्याच कविता घ्याव्यात झालं.

**श्रीयुतः**—उत्तम ! सर्वोत्तम ! पण मी म्हणतों, मासिकांत मजकुराची खिचडी भरायला काय हो उशीर ! एखाद्या गोमागणेशाचें चरित्र, एखादं मांबुडर्याचं प्रवासवर्णन, मुर्दाड मेंदूंतून उतरलेला एखादा टीकालेख, आणि माझ्यासारख्या चार दोन श्रीयुतांच्या कविता ! एवढी खिचडी करावी. एखाद्या चालूं कादंबरीचा चटोरपणा प्रत्येक अंकांत चालूं ठेवावा आणि या भेसळीवर उत्तम बायंडिंगचं पॅकिंग करून त्यावर एखाद्या सुप्रसिद्ध स्त्री-पार्ट्यांच्या किंवा सुस्वरूप वेश्येच्या फोटोचं लेबल चिटकवावं ! अहो, मासिक चालवायला टॅक्ट लागते ! नाहीं तर तुम्ही काढणार दिवाळीचा खास अंक शिमग्याला आणि अनियमितपणानं शिमगा उडाला म्हणजे चालूं सालचा वर्षारंभाचा अंक जोड अंक म्हणून पुढल्या वर्षी प्रसिद्ध करणार ! बरं. मला आतां वेळ नाहीं. मी जरा बाहेर जाऊन येतों.

**शाम०:**—छे—छे—मला दोन प्रेमाच्या कविता द्या आणि मग जा.

**श्रीयुतः**—पण प्रेमाच्या कविता कुणाला उद्देशून ?

**शाम०:**—अहो, जगांतील कोणत्याही स्त्रीला ! कुणाचं तरी नांव घाला. 'लाडक्या विमलेस'—हेंच नांव !

**श्रीयुतः**—पण ही विमला कोण ? मी पाहिलीहि नाहीं. आणि तिच्यावरून प्रेमाची कविता कशी करूं ?

**शाम०:**—पुरे करा हो ! कवितेवर नांव मी घालीन. नाहीं तर नांवं

ठेवण्याचें काम आपण लोकांवरच सोपवूं. तुम्ही ठराविक कल्पनांची प्रेमाची कविता द्या म्हणजे झालं.

**श्रीयुत:**—छे—छे -भलतंच !

**शाम०:**—श्रीयुतराव, नाहीं म्हणूं नका हो! मासिकाची रिकामी जागा तर भरून काढली पाहिजे. माझं काम होईल, तुमचं नांव होईल.

**श्रीयुत:**-(स्व.)संपादक माझ्या पाठीं कवितेसाठीं लागला आहे हा माझ्या आयुष्यांतला तरी पाहिलाच प्रसंग आहे!(प्र.)छे—बुवा,जातो,मग पाहीन.(स्व.) या वेळीं जरा आढ्यताच दाखविलीच पाहिजे. ( जाऊं लागतो. )

**शाम०:**—(थांबवून) जातां कुठं ? मुकाट्यानं द्या. नाहीं तर हें पहा—( पिस्तूल दाखवितो. )

**श्रीयुत:**—( घाबरून ) अरे बाप रे! तुम्ही तर या कैलासवासीला कैलासाच्याच प्रवासाला पाठविण्याचा घाट घातलांत कीं हो !

**शाम०:**—जिथं जिभेचा जोर निष्फळ ठरतो तिथं याचा बार काढावा लागतो. हं बोला—

**श्रीयुत:**—आतां बोलूं काय कपाळ ? ही ब्याग ! हें कवितेचं बाड ! सारं घेऊन जा पण प्राण घेऊं नका.(स्व.) देवी शारदे, तुझ्या भक्तांवर सुद्धां ही सैतानी अरेरावी ! तुझ्या राज्यांत सुद्धां रावणशाही गाजावी अं !

**शाम०:**—( बॅगमधून दोन कविता घेऊन ) श्रीयुतराव, माफ करा. (हंसत) केली आपली थोडीशी गंमत !

**श्रीयुत:**—( हात जोडून ) ठीक आहे, तुमची गंमत ! माझी खचली हिंमत—

**शाम०:**—अहो, तशीच आहे तुमच्या कवितांची किंमत! उगीच नाहीं तुमच्यापाठीं लागलों मी. तुमची पाठपुरवणी—

**श्रीयुत:**—पुरे—इतकीच पुरे—पुनः करूं नका. ( स्व. ) छे, आपणच आतां येथून पाय काढावा नाहीं तर काव्यापायीं ठारच व्हायचा मी ! ( ब्याग घेऊन घाबरून जातो. )

**शाम०:**—( स्व. ) नरेंद्रानं म्हणे विमलेच्या शिक्षणाची, राहण्याची वगैरे सोय 'वुइडोज होम'मध्यें—त्या विधवाश्रमांत करण्याची योजना केली आहे. या दोन प्रेमाच्या कविता विमलेच्या नांवावर Olo Lady Superintendent अशा पत्त्यावर पाठवून विमलेच्या वर्तणूकीसंबंधी

स्वतंत्र पत्रांत ही नालस्ती करावी म्हणजे पहातो ती त्या पोरटीला आश्रमांत कशी ॲडमिट करते ती ! साऱ्या मुंबईत तिच्या शीलाची बदनामी करून चोहाकडून तिच्या सुखाच्या खुंट्या पिरगळल्या कीं, एक तऱ्हेनं त्या नरेंद्राचच नाक ठेंचल्यासारखं होणार आहे. त्या थेरडीला तर दिलीच आहे वाऱ्यावर सोडून. तिची होईल काशियात्रा आतां सोनापुरांत! सोन्या-सारखी काशीयात्रा ! नरेंद्रा ! तुझ्या छाताडावर नाचायला या मुंबईतच आलेला हा शामसुंदर तुला धुळीला मिळवील तेव्हांच स्वस्थ बसेल ! हो-पण—आक्का आलीच. (कांता येते.) आक्का,

कांताः—दादा, केव्हां आलास ? कां आलास ?

शाम०:—कां आलों ? आक्का आज हा काय भलताच प्रश्न ?

कांताः—(रागानें) तुझं तोंडहि पाहण्याची माझी इच्छा नाहीं. जा.

शाम०:—आक्का, हें शब्द तुझ्या तोंडून आज बाहेर पडत आहेत तरी कसे ?

कांताः—केवळ तुझ्याच काळ्या करणीमुळं ! समजलास ?

शाम०:—मोठंच आश्चर्य आहे. सारंच अकल्पित !

कांताः—अकल्पित तर खरंच.पण पृथ्वीच्या पोटीं हिरकणीहि जन्म घेते आणि गारगोटीहि जन्म घेते ! दादा, दादा, पण—छे, तुला 'दादा' या प्रेमळ संबोधनानं हाक मारायची सुद्धां मला आतां लाज वाटूं लागलं आहे. तुझं अंतःकरण इतकं काळकुट्ट विषारी असेल अशी मला कल्पनाहि नव्हती. तुझं हृदय—पण छे—तुला हृदयच उरलं नाहीं. दुष्टवृत्तीच्या दडपणा-खालीं तुझ्या हृदयाचा पार चक्काचूर उडाला आहे. जा, काळं कर. भविष्यकाळच तुझी भवितव्यता तुला पटवून देऊन तुझे डोळे नीट उघडील.

शाम०:—( कांतेचे पाय धरून ) आक्का—आक्का, माझ्याकडून कांहीं अपराध घडलाच असेल तर त्याची मला क्षमा कर. पण बंधुप्रेमाला पायाखालीं तुडवूं नकोस.

कांताः—बस्स. पुरे कर हें मानभाविपणाचं मायावी भाषण ! मीच काय पण या समाजांतील कोणतीहि सुशील, सत्यनिष्ठ भगिनी आपल्या दुष्ट बंधूला असाच एकदां नव्हे तर लाखदां धिःकार—धिःकारच करील !

शाम०:—( काकुळतीनें ) नको—आक्का, इतकी निष्ठुर होऊं नकोस. तुझ्या हृदयांतील बंधुप्रेम—

**कांता:**—मेलेलं नाहीं खास ! पण तुझ्या या लाडक्या प्रेमळ आक्काला तुझ्याच सैतानी करणीनं असं निष्ठुर बनविलं आहे. चल, चालता हो. ज्या दिवशीं तूं सैतान नसून मनुष्यच आहेस अशी माझी खात्री होईल त्याच दिवशीं ही तुझी कांताआक्का मोठ्या आनंदानं–प्रेमानं तुझं स्वागत करील. तुझ्यावरून जीवाभावाचं लिंबलोण उतरून टाकील. पण तोपर्यंत तुझं तोंड सुद्धां पहाणार नाहीं. आपल्या घरांत तुला पाणीसुद्धां पिऊं देणार नाहीं. जा, आल्या वाटेनें परत चालता हो.

**शाम०:**—आक्का, तुझी क्षमा मागतो. ( पाय धरतो–ती झिडकारून जाते. ) ( उठतो. ) अस्सं–आलं लक्ष्यांत. त्या सरोजिनीनंच हिला माझा इतिहास सांगितलेला दिसतो. ठीक आहे, नाटकी पोरटे, सरोजिनी, या दुखावलेल्या मानवी सर्पाचा प्रताप तुलाहि रसातळाला पोहोंचवील, याद राख ! ( जातो )

---

# प्रवेश तिसरा.

[ दिवाणखाना. सरोजिनी आणि वारुताई प्रविष्ट. ]

**सरोजिनी:**—वारुताई, माझा तर हेतू असा आहे, कीं विमलेनं आपलं आयुष्य कुठं तरी एखाद्या परोपकारी संस्थेंत काढावं किंवा नर्सच्या शिक्षणाचा कोर्स संपवून लोककल्याणार्थ तिनं आपलं तन, मन, धन वेंचावं.

**वारुताई:**—या गोष्टीला ती तयार होईल परंतु तुम्ही मघाशीं तिच्या पुनर्विवाहाची गोष्ट बोलत होतां, तें तिला कितपत रुचेल याचाच प्रश्न आहे.

**सरोजिनी:**—ती पहा, विमलच इकडं येत आहे. तिच्या चेहऱ्यावरची उदासिनता कांहीं केल्या जात नाहीं. यावरून तिला आपलं जीवित भारभूत वाटत आहे हेंच नाहीं कां स्पष्ट होत ?

**वारुताई:**—वैधव्याची जाणीव कोंवळ्या जीवाला जाचक व्हावी यांत नवल तें काय ? बरं, मी जाते. तुम्हीच ती गोष्ट पुनः तिच्याजवळ काढाः ( जाते. )

**सरोजिनी:**—( स्व. ) दुर्दैवी तरुण जीव ! विविध मोहरंगांनीं

भरलेल्या या जगांत, सैतानी डावपेंच चालविणाऱ्या या समाजांत, स्वावलंबनाच्या पायावर उभा राहून निष्कलंक जीवित कंठूं शकेल काय? दुर्दैवाच्या झंझावातानं समाजाच्या पायदळीं पडलेली ही फुलवेल आधाराशिवाय सुखानं नांदूं शकेल काय? छे. मुळींच नाहीं.

**विमलाः**—( प्रवेशून ) सरोजताई, अहाहा! हें पहा, '**अभागी कमल**!' खरोखरीच करुणरसानं ओथंबलेलं एवढंच एक रसाळ, परिणामकारक सामाजिक काव्य आहे असंच मला वाटतं. यांतील बिचाऱ्या कमलेला आपल्या पंचप्राणाच्या पाकळ्या समाजाला वैतागून शेवटीं कृष्णार्पणच कराव्या लागल्या. नरेंद्रांनीं मला या मुंबईला आणलं नसतं तर मला वाटतं माझ्यासुद्धां आयुष्याची अखेर मला अशीच करावी लागली असती.

**सरोजिनीः**—पण तें आतां कशाला? सुदैवानं तुला आतां चांगले दिवस दाखविले आहेत—

**विमलाः**—पण सुखाच्या अमृताची पुटं चढलीं तरी दुःखी जीवनाचा विषारीपणा कसा कमी होईल?

**सरोजिनीः**—तें असो, पण कालच्या गोष्टीचा विचार केलास कां? बाकी सोनारानंच कान टोंचले पाहिजेत म्हणा!

**विमलाः**—तें कसं काय?

**सरोजिनीः**—नरेंद्रांनींच हा प्रश्न तुझ्यापुढं टाकला असतां तर!

**विमलाः**—त्याचा विचार करणं मला भागच होतं. कारण त्यांचे माझेवर अगणित उपकार आहेत. त्या उपकारांची फेड, पण छे, तो उपकार-भार जन्मोजन्मीं शिरावर अखंड धारण करण्यांतच मला आनंद आहे. माझ्या दिनाला त्यांनीं भयंकर आजारांतून वांचविलं, काळाच्या दाढेंतून सुरक्षित बाहेर काढलं. या जगांत नरेंद्रानांच मी माझा परमेश्वर समजतें.

( दीनानाथ, 'ताई' अशी आंतून हांक मारतो. )

**सरोजिनीः**—वः दिना आला वाटतं शाळेंतून.

**दिनानाथः**—( प्रवेशून ) ताई, ताई, माझा पहिला नंबर आला आज. मास्तरांनीं खूष होऊन ही पहा मला दोन पुस्तकें बक्षीस दिलीं. सरोजताई, पहा, कशीं छान पुस्तकं आहेत हीं!

**सरोजिनीः**—आहेत खरी—

**विमलाः**—आणखी काय म्हणत होते तुझे मास्तर!

**दिनानाथः**—त्यांनीं प्रत्येक मुलाला विचारलं कीं तुझं पुढचं ध्येय काय? तूं काय होणार? मला विचारलं तेव्हां मी सांगितलं—

**विमलाः**—काय होणार म्हणून सांगितलंस? एखादा बडा सरकारी ऑफिसर? कमिशनर कीं गव्हर्नर—?

**दिनाः०**—छे, छे, मी लोकमान्य टिळक होणार म्हणून सांगितलं!

**सरोः०**—शाबास! जातीच्या हिंदपुत्राला, महाराष्ट्रमाउलीच्या वीरपुत्राला साजेसंच तूं उत्तर दिलंस. (दीनानाथ लोकमान्यांचा फोटो काढून त्याला नम्रपणें वंदन करितो.) हा फोटो कुणाचा?

**दिना०ः**—लोकमान्यांचा! मास्तरांनीं हे फोटो आज बक्षीस वाटलें आम्हाला! हा अकरावा अवतार साऱ्या जगाला वंद्य आहे!

## पद ३०

**या हिंददेवतेचा। आधार जो जिवाचा। सत्पुत्र मायभूचा। वालीच गांजल्यांचा। देशार्थ जन्म ज्याचा। देशार्थ जीव ज्याचा। लोकाग्रणी सुधीर। तो वंदितो त्रिवार! ॥ १ ॥**
**देशास उद्धराया। धर्मास उद्धराया। राष्ट्राऽऽपदा हराया। दास्यास संहराया। सत्या जयी कराया। झाला जगावरी या विश्वेश्वरावतार। तो वंदितो त्रिवार! ॥ २ ॥**

**सरोजिनीः**—बरं आतां चल, कपडे काढ, भूक नाहीं कां लागली?

**दिना०ः**—चला. [ दोघे जातात. ]

**विमलाः**—(स्व.) त्या आगींतून या फोंफाट्यांत येऊन पडल्यासारखं मला झालं आहे! हालहपेष्टांनीं होरपळलेल्या या माझ्या जीवाला हा सुखाचा वारा आनंददायी कां होऊं नये? सुखाचीं सारीं साधनं आहेत पण त्या सुखाचा उपभोग घेण्याची या संन्यासी जीवाला संवयच नाहीं त्याला काय करायचं? कांहींच सुचत नाहीं. करमणुकीसाठीं कांहीं केलं तरी जीवाला स्वस्थताच लाभत नाहीं. ती कालची नरेंद्रांची चालीवरची कविता पेटीवर गात बसूं कां? हो असंच करावं. ( गाते. )

## पद ३१

**शीलधना ललना आम्ही या पेशा दीना । या भव-सागरिं सांवरी कोण निवारी क्लेशांना ? ॥ ध्रु० ॥ ही जनता मानी । पशुसम अज्ञानी । आम्हांसि; मना जाळत जाई ही दैना ! ॥ १ ॥**

**नरेंद्रः**—(प्रवेशून) वः या माझ्या कवितेचं चीज आज झालं. पण एखादी दुसरी चीज या गानदेवतेच्या गोड गळ्यांतून उसळूं दे !

( विमला गाणें थांबवून लाजून उभी राहते. )

**नरेंद्रः**—वः, गाणं थांबवून आम्हाला ही अशा आगत स्वागताची सलामी दिली वाटतं ! या कोकीळ कंठांतून उंच उसळणाऱ्या भिरभिरत्या लकेरी भोंवतालच्या वातावरणांत खुषीची खैरात उधळतांना ही नाचऱ्या नजरेची नव्या नवाईची नजरबंदी चंचल चित्तवृत्ती जखडून जड बनविते तर ती जीवकोटींना झुलविणारी गोड गळ्याची जादू जडतेलाही जीव-कळा देते ! म्हणून म्हणतों, या कोकिळेचं कर्णमधुर संगीत—

**विमलाः**—अशा स्तुतीनं हुरळून जाणारी ही विमला नव्हे बरं कां ? शिवाय गाणीं म्हणत बसायची ही वेळ कां आहे ?

**नरेंद्रः**—अवेळ असली तरी गा. ' **अवेळ तरिही बोल कोकिळे, अवेळ तरिही बोल !**

**विमलाः**—भले ! गोविंदाग्रजांची ओळसुद्धां वेळेवरच आठवली. काव्य सुचूं लागलं !

**नरेंद्रः**—कां सुचणार नाहीं ? प्रेमाच्या पायावरच काव्याची उभारणी असते. शिवाय बाळपणीं तुझ्याच प्रेमानं माझ्या मनोभूमींत काव्याचं बीजारोपण केलं आहे ना ? जीवनमदिरेचा प्याला प्रेमाच्या रसरंगानं रसरसला तरच त्याची लज्जत !

## पद ३२

**हें प्रेम शुभ-धाम । काव्यासि दे जन्म । संसार सुखसार नव जीवनाधार ॥ ध्रु० ॥ काव्य-रस उसळला । नवरंग त्याला । हा प्रीत प्याला । करि ताप-संहार ॥ १ ॥**

विमलाः—पण त्या बाळपणींच्या प्रेमाचे रंग परिस्थितीबरोबरच पालटूंहि शकतात !

नरेंद्रः—या नियमाचा निर्बंध नाटकी प्रेमाला लागूं होईल.

विमलाः—तेंहि खरंच. खऱ्या निःस्वार्थी प्रेमानं निसर्गाच्या कोणत्या नियमांना आजवर जुमानलं आहे ? प्रेमाच्या परमेश्वरी प्रभावापुढं प्रत्यक्ष काळालाहि आपला अहंकार नमवावा लागतो ! ( वारुताई आणि सरोजिनी येतात. )

नरेंद्रः—(सरोजिनीस) विमलेची व्यवस्था वुइडोज होममध्यें फार उत्तम झाली.

वारूताईः—पण तिथं शिक्षणाची सोय चांगली आहे नां ?

नरेंद्रः—अनाथ विधवांना स्वावलंबी बनविणारे धंदे–शिक्षण देणं हें तर त्या संस्थेचं ध्येय आहे. अशा परोपकारी संस्था आणखी निघाल्या तरच आमच्या समाजांतील किती तरी विधवांच्या कपाळींचं पोळपाट लाटणं खास चुकणार आहे. ( एक नोकर व्हिजिट कार्ड आणून देतो. ) कोण ? सुपरिंटेंडंटबाई गुडवुईल ! आंत घेऊन ये जा. ( नोकर जातो. )

नरेंद्रः—( मिस् गुडवुईल येते. ) गुड इव्हिनिंग मिस् गुडवुईल, प्लीज टेक युअर सीट. या बसा— [ सरोजिनी शेकहँड करते. ]

गुडवुईलः—मिस्टर नरेंद्र, सॉरी, आय कांट अॅडमिट दॅट गर्ल. त्या मुलीला शाळेंत घेतां येत नाहीं.

नरेंद्रः—व्हाय, व्हाय फॉर ? कारण काय ?

गुडवुईलः—दीज आर दि लव्ह लेटर्स वुइच प्रुव्ह हर बॅड कॅरेक्टर ! हीं पत्रें, ही पोइट्री–हें काय दाखवितात ? ( पत्रें दाखविते. )

नरेंद्रः—( पत्रें पाहून सखेद आश्चर्यानें स्वगत ) हा दुष्टपणा शामसुंदरचा तर नसेल ना ? ( प्रकट ) मिस, गुडवुईल, हीच ती मुलगी. मला वाटतं हिच्या शुद्ध शीलाविषयीं शंका घेणं महापाप होईल.

गुडवुईलः—हिला पाहून असंच वाटतं. पण हीं पत्रें—

सरोजिनीः—याचा उलगडा कांहींच करतां येत नाहीं. पण हें कवितेतील हस्ताक्षर श्रीयुताच्या हस्ताक्षरासारखं दिसतं. त्याचं कवितेचं बाड मी पाहिलं होतं, त्यावरून म्हणते.

**विमलाः**—( स्वगत ) दुर्दैवा, दुःखाचे वळसे आणखी किती देणार ते तरी कळूं दे.

**नरेंद्रः**—यावेळीं श्रीयुताला बोलावणं पाठवूं कां?

**चारुताईः**—कशाला? तें पहा, तें ध्यान इकडेच येत आहे.

**श्रीयुतः**—( प्रवेशून ) वंदे मातरम्! गुड इव्हिनिंग! वंदे मातरम्! सरोजिनीबाई, वंदे मातरम्! चलता नां चर्निरोडगार्डनमधें? चला लौकर.

**नरेंद्रः**—ए कवि, देशभक्त—

**श्रीयुतः**—वः नरेंद्र, आल्याबरोबर शिवीगाळीला सुरवात करतोस? हा काय शिष्टाचार? खबरदार, कवी, देशभक्त म्हणशील तर!

**नरेंद्रः**—ये असा, अगोदर हें सांग, मूर्खा, हा पराक्रम केव्हां गाजविलास? हें अक्षर तुझ्या ओळखीचं आहे कां?

**श्रीयुतः**—(पाहून) ओळखीचं म्हणजे? मीच लिहिलं आहे हें? स्वतः लिहिलेलं स्वतःला न कळण्याइतका मी कांहीं हा नाहीं.

**नरेंद्रः**—पण या पत्रांत तूं हें प्रेम कां पाघळलं आहेस? ही विमला तुझ्यावर प्रेम करायला केव्हां आली होती? अरे आचरटा, तुझी रासिकता येथवर पोहोंचली कां?

**श्रीयुतः**—(घाबरून) छे छे, मलतंच! हें तुम्ही काय बोलतां? मी असला भानगडी मनुष्य नाहीं बरं.

**विमलाः**—(रागानें) मग हें काय? याचा जाब द्या. बायकांची अब्रू म्हणजे खेळणं वाटलं होय तुम्हांला? .

**श्रीयुतः**—विमलाबाई, तुम्ही मला माझ्या आईसारख्या, बहिणीसारख्या; तुम्हांला उभ्या जन्मांत आजच पहातों आहें. तुमच्या पाया पडतो. ( हातरुमाल पसरून ) हा पहा तुमच्या पुढं मी पदर पसरतों. मला क्षमा करा. [ पाय धरतो. ]

**नरेंद्रः**—ऊठ मूर्खा, मग हीं पत्रं कुणीं धाडलीं? या कविता कुणाच्या?

**श्रीयुतः**—या प्रेमकाव्याचा कर्ता हा कैलासवासीच आहे. पण माझ्यावर पिस्तूल रोखून त्या शामसुंदरानं या कविता माझ्याकडून मागून घेतल्या हो! आणि हा घोंटाळा करून या विमलाबाईच्याबरोबरच माझंही कर्म माझ्यापुढं उभं केलं. या काव्याचीच शपथ घेऊन सांगतों कीं, मी अगदीं

निर्दोषी आहे. त्रिवार सांगतों कीं, मी निर्दोषी आहें. त्या दुष्टाला, शामसुंदरला शतशः धिःकार–धिःकार–धिःकार असो !

**नरेंद्रः**—( हंसून ) मिस् गुडवुईल, पाहिलांत हा प्रकार? झाला उलगडा? हें कारस्थान एका व्हिलनचं आहे. या कविता या व्यक्तीच्या आहेत. याच्या पोषाखावरून, आचाराविचारावरून याची लायकी ओळखा आणि भलताच गैरसमज मनांतून काढून टाका.

**गुडवुईलः**—ओ आय सी ! बट् हू इज दॅट रास्कल? तो बदमाष कोण? ही गर्ल फारच गरीब आहे. इनोसंट् आहे. वेल, आय टेक युअर लीव्ह नाऊ. [ शेकहँड करून जाऊं लागते. ]

**सरोजिनीः**—प्लीज, वोंच्यू हॅव टी? चहा घेऊन चला.

**गुडवुईलः**—जस्ट अॅज यू प्लीज. [ विमलेखेरीज सर्व जातात. ]

**विमलाः**—देवा, निष्कारण सूडाच्या सैतानी वासनेनं पछाडलेल्या समाज कंटकांचा असा हा दुष्टपणा पाहिला कीं, आधाराशिवाय जीवधारणा कशी करायची हेंच कळत नाहीं.

### पद ३३

**खल–मकर भयद करि भवार्णवा। जीवास खास न निवास ठावा ॥ ध्रु० ॥ तुजविण देवा ! कुणास केवा ?। ध्याला जीवा तुझा विसांवा! ॥ १ ॥** ( जाति. )

---

## प्रवेश चौथा.

[ बॅकवे—सायंकाळची वेळ. सरोजिनी प्रवेश करते. ]

**सरोजिनीः**—आत्मयज्ञ ! दयेच्या पायावर उभारलेला स्वार्थाचा संन्यास ! सरोजिनी, हा स्वार्थसंन्यास तुला संतोषानं स्वीकारलाच पाहिजे. पण–पण–काय? स्वतःच्या हिताचा होम करून, कर्तव्याच्या कठोरतेनं माझ्या मनोरथांचे मनोरे मी मातीला मिळवूं? नरेंद्र ! ज्यांच्या प्रेमळ मूर्तिकडं मी आजवर पतिप्रेमाच्या दृष्टीनं पाहिलं, त्यांची या दिलाच्या

देव्हाऱ्यांत अन्य भावानं पूजा करूं ? प्रेमाच्या पूजेसाठीं जमा केलेलीं सुखाशेचीं फुलं त्या प्रेमाच्या प्रेतावर उधळूं ? तें प्रेम ! पण कसं झालं तरी तें पार्थिव प्रेम! सरोजिनीच्या प्रेमा ! तुझं आकुंचित स्वार्थ—क्षेत्र सोडून तूं कर्तव्याच्या विशाल क्षेत्रांत कां उडी घेऊं नयेस बरं ? छे, माझं प्रेम स्वार्थी नाहीं हें जगाला साधार पटलंच पाहिजे. नरेंद्र, नका—अशा संशयित नजरेनं माझ्याकडं पाहूं नका. स्वतःच्या आसवांनीं विमलेचं दैन्य आपणाला नको कां धुवून काढायला ? प्रेमभंगानलानं पंचप्राण पोळतील—पण नाहीं, कांहीं झालं तरी माझ्या विनंतीचा अव्हेर तुम्ही नाहींच करणार. ( सचिंत होते. ) हो, पण नरेंद्र कां अद्याप आले नाहींत ? ( पाहून ) हे पहा, आलेच.

**नरेंद्रः**—( प्रवेशून ) सरोज, किती नयनरम्य देखावा हा ! खरोखर, ही बॅकवे म्हणजे आनंदाचं आगर, उत्साहाचं उगमस्थान, विलासी मुंबापुरीच्या वैभवाचं विश्रामस्थळच नाहीं कां ?

**सरोजिनीः**—या ठिकाणीं भावनामय कवीच्या कोमल हृदयांत काव्यस्फूर्तीच्या उत्तुंग उर्मी उसळाव्यात हे साहजीकच आहे. पण नरेंद्र, मृत्युलोकींच्या मानवी सौंदर्यसृष्टीचा मोह सोडून जरा आकाशाकडं दूर दृष्टी फेंका ! किती भेसूर भीषणता पसरली आहे !

**नरेंद्रः**—तिथली स्वर्गीय शोभा तर द्विगुणित झाली आहे ! इकडं हा अस्तंगत सूर्याच्या सोनेरी किरणरंगांनीं पश्चिमचा प्रांत रंगला आहे ! आणि इकडं पौर्णिमेचा पूर्णचंद्र चढत्या तेजोमणींची मोहनमाळा पूर्वेला घालतांना प्रेमरंगानं रंगला असून त्यामुळं पूर्वदिशेच्या गालावर प्रणयी गुलाबी छटा चमकत आहे ! रविराजाला हृदयाशीं कुरवाळतांना पश्चिमासुंदरीच्याही कपोलप्रांतावर प्रीतीच्या गुलाबपाण्याची बरसात बरसली आहे. अहाहा ! या गगनाचा हा गोंडस गुलाब प्रणयश्रीनं किती शोभत आहे !

**सरोजिनीः**—छे, नरेंद्र, मला तर हें मोहक दृश्य निराळ्याच स्वरूपांत दिसत आहे. ही पूर्वदिशा कलावंत चंद्राच्या समागमानं सौभाग्ययुक्त दिसत आहे तर ती पश्चिमा सूर्याच्या वियोगानं वैधव्यदुःखांत होरपळत आहे ! एकीकडं मूर्तिमंत मंगलता महिरली आहे तर दुसरीकडं अघोर अमंगलता अभद्र सुचवीत आहे. दोन्ही दिशांच्या मुखावर एकच रंग पसरला आहे.

पण अगदीं परस्पर भावनांचा ! हा शुभाशुभांचा संगम जगाला कांहीं तरी गूढ स्वर्गीय संदेश नाहीं का सांगत ? कालदेवाची अतर्क्य लीला चराचराला नमविते हेंच खरं !

**नरेंद्र:**—कालाय तस्मै नमः ! या कालचक्राच्या फेऱ्यांनींच आमच्या समाजबंधनांची शिथिलता वाढविली आहे. जुन्या आणि नव्या काळाच्या कैचींत सांपडलेल्या या समाजांत, समाजीहितासाठीं तळमळणारे कितीसे महात्मे असतील ?

**सरोजिनी:**—कां बरं ? समाजाच्या हिताहिताची कळकळ अहोरात्र उराशीं बाळगणारे कर्तबगार कर्मतपस्वी कोणीच कां होऊन गेले नाहींत ?

**नरेंद्र:**—पण या हल्लींच्या सुसंस्कृत, सुशिक्षित तरुणपिढींत अलौकिक स्वार्थत्याग करणारा एक तरी उदार जीव आहे काय. ?

**सरोजिनी:**—हो पुष्कळ आहेत. पण मी म्हणते, तसा कुणी नसलाच तर स्वतःच्या स्वार्थत्यागाचा कित्ता साऱ्या समाजापुढं ठेवून तुम्ही भावी पिढीचा कर्ममार्ग उज्ज्वल चारित्र्यानं उजळून टाका.

**नरेंद्र:**—समाज–हित साधणं हें तर माझं ध्येयच आहे. पण प्रसंग पाहिजे ! प्रसंगाशिवाय वीराचीहि कर्तबगारी कुचकामाची ठरते. तेजानं तळपणाऱ्या तलवारीचं पोलादी पातंसुद्धां पराक्रमाच्या प्रसंगाभावीं म्यानाच्या महालांत विश्रांती घेत पडतं ! अशी एखादी समाजसुधारणेचा श्रीगणेशा सुरू करण्याची सोन्याची संधि आली मात्र पाहिजे—

**सरोजिनी:**—खरं आहे. आली नाहीं तोंपर्यंतच हा तोंडाचा वेदान्त ! पोकळ पोपटपंची ! प्रत्यक्ष प्रसंगाला पाहून धीर खचेल. मनोधैर्याच्या वाचाळ वल्गना मवाळ मौनता स्वीकारतील !

**नरेंद्र:**—सरोजिनी, माझ्या ध्येयसंपादनाच्या दगडी निश्चयाच्या धडाडीला तूं असं दांभिकपणाचं दुबळं स्वरूप देतेस अं !

**सरोजिनी:**—मी तुमचीच नव्हे तर सर्वसाधारण समाजाबद्दलची स्थिति सांगितली. स्त्रीस्वातंत्र्याचे शब्दशूर भोक्ते, पुनर्विवाहाचे पोपटी पुरस्कर्ते, तोंडाचे बोलके नगारे वाजविणारे कृतिशून्य सुधारणेचे शाहीर, या समाजांत—या आरंभशूर अवसानघातकी समाजांत थोडे का आहेत ? अंतर्बाह्य विरोधी वर्तनाचा दुहेरी तोंडाचा पट्टा चालविणारा दुटप्पी समाज तुम्ही पाहतांच ना ? म्हणून म्हणते, हे तुमचे आजचे ताज्या तडफेचे

उद्गार उद्यां फोल शब्द ठरतील. पहा बरं, पुनः बजावते, परिस्थिति, लौकिक यांचे प्रांत ओलांडून रूढीशीं रणसंग्राम करायला तुमची तयारी आहे काय ?

**नरेंद्रः**—लौकिकाचा लबेदा, परिस्थितीचा आडणा आड येतो खरा पण त्याचं काय ? स्वःतच्या आत्मयज्ञानं उज्ज्वल कर्ममार्गाला, प्रोत्साहन देऊन प्रवृत्त करणारी प्रबोधक दिव्य शक्ति मात्र पाठीशीं धीर द्यायला पाहिजे. समाजाच्या साम्राज्यांत सुधारणेची स्वराज्यसंपादणी करायला सज्ज झालेल्या कर्तबगार कर्मवीरांना भवानी जगन्मातेसारख्या आदिशक्तीच्या पुण्याईकडं मंगल आशीर्वादांच्या आशेनं पहावंच लागतं—

**सरोजिनीः**—पण शब्दशूरांच्या बाबतींत त्या आदिशक्तीचेही आशीर्वाद अनाठायींच होणार ! परिस्थितीची पांगळी सबब ! परिस्थितीच्या पाशांत गुरफटून गतानुगतिक पंथाचाच जर अखंड अवलंब केला तर मनुष्याच्या हातून अलौकिक असं काय होणार ? आणि जगाच्या जिभेवर त्याचं नांव तरी नाचणार कसं ?

**नरेंद्रः**—हें खरं; तरी पण—

**सरोजिनीः**—बरं समजा, तुमच्या परप्रकाशी बुद्धीला प्रोत्साहन देणारी, आपल्या आत्मयज्ञानं दिपवून सोडणारी कुणी व्यक्ति लाभली तर—

**नरेंद्रः**—तर हा नरेंद्र बेधडक आपल्या ध्येयाच्या मागं धांवत जाईल.

**सरोजिनीः**—नरेंद्र, यावेळीं तुमच्या रूपानं हा सारा हल्लींचा हतभागी तरुण समाजच माझ्यापुढं उभा राहून आपल्या दुबळेपणाचं प्रदर्शन दाखवीत आहे असंच मला वाटतं ! पण नरेंद्र, पूर्ण विचार करा. भावनावश होऊं नका. शब्दांतील उसनी शक्ति शेळपट ठरेल. विकारवश हृदयाचा आत्मविश्वास वायफळ होईल. मी तुम्हाला समाजसेवेची नामी संधि सुचवितें. पण आहे कां तुमचं मनोधैर्य एवढं अचाट ?

**नरेंद्रः**—सरोज, इतक्या दिवसाच्या सहवासानंसुद्धां तुला माझ्या हृदयाची पारख करतां येऊं नये अं ! सांग, कोणती सोन्याची संधी—

**सरोजिनीः**—सांगते, पण—

**नरेंद्रः**—नको, सरोज, माझ्या पोलादी निश्चयाचा पारा अधिक चढवून दाखवायचा दुराग्रह धरूं नको. शब्दांनीं मला माझा सत्संकल्प सांगतां येत नाहीं. पाहिजे तर हें वचन घे. पण सांग. काय करूं तें धे...

पद ३४

**निराधार या कां कटु शंका वरित वृथा मन ? । त्वरित राजसे ! अपुली बोल मनीषा ॥ ध्रु० ॥ प्रेमबळें जिंकिसि किंकर हा । मुदें धरित शिरिं आज्ञा । दुर्बलता सेविन केंविं अतां ? जाणसि मम गुणदोषा. ॥ १ ॥**

**सरोजिनीः**—माझ्याशीं लग्न लावण्यच्या विचारांना मूठमाती देऊन त्या अभागी विमलेला सौभाग्यदान द्या. [ नरेंद्र चपापून मागें सरतो. ] नका—असें चपापून मागं सरूं नका. समाजसेवेला सज्ज झालेल्या सत्यनिष्ठ पुरुषोत्तमाचं पाऊस पुढं पुढंच प्रत्यहीं पडावं लागतं. असं मागं नव्हे. नका—अशा भांबावलेल्या भेदक दृष्टीनं माझ्याकडं पाहूं नका. तुमच्या हृदयाची खळबळ मी जाणतें. विमलेला सौभाग्यदान करून तिला सुखाच्या शिखरावर बसवतांना आपल्या परस्पर हृदयांना पीळ पडेल पण तिच्या आनंदाकडं दृष्टि ठेवून आपण भावी आयुष्य सुखांतच घालवूं ! नरेंद्र, स्वार्थत्यागाचं सात्त्विक समाधान कसं असतं हें सांगायला अनुभवाचीच अवश्यकता असते. करा. एवढं कराच. माझ्या प्रेमाखातर तरी माझ्या या विनंतीचा अव्हेर करून मला निराश करूं नका. नरेंद्र—

**नरेंद्रः**—सरोज,

**सरोजिनीः**—काय ?

**नरेंद्रः**—आपलं प्रेम—

**सरोजिनीः**—आपल्या प्रेमाला तर त्रिकालाबाधित चिरंजीवन निःस्वार्थीपणा खास देईल. नरेंद्र, माझ्याविषयींच्या व्यक्तिगत प्रेमाचा लोप करून तुमचं प्रेमवैभवानं फुललेलं विशाल हृदय—ब्रह्मांड विश्वबंधुत्वाच्या वेदिकेवरून साऱ्या जगावर उधळून टाका. माझ्या हृदयांतीलही व्यक्तिगत वैषयिक प्रेमभावना आजपासून साफ नष्ट झाली आहे. माझा स्वार्थत्याग—पण माझी ही कृति तुम्हाला स्वार्थत्यागाच्या स्वरूपांत दिसत असेल तर—माझ्या त्यागाचं चीज करण्यासाठीं तरी एवढं कराच. या मावळत्या सूर्याच्या साक्षीनं उदयोन्मुख पत्निप्रेमाचा लोप करून या उगवत्या चंद्राच्या साक्षीनं ही सरोजिनी, नरेंद्र, आज हा हात भगिनीप्रेमाच्याच भावनेनं तुमच्या हातांत देत आहे. घ्या. बंधुराज, या भगिनीला हा बंधुप्रेमाचा [illegible] द्या. ( त्याचा हात आपल्या हातांत घेते. )

**नरेंद्र**:—सरोज, तुझ्या स्वरूपांत या वेळीं माझ्यापुढं साक्षात् समाज-सेवेची मंगल सौभाग्यलक्ष्मी खडी आहे असंच मला वाटतं.

**सरोजिनी**:—मग काय ? नरेंद्र, विमलेशीं पुनर्विवाह लावणार नां ?

**नरेंद्र**:—होय. पण तूं—

**सरोजिनी**:—मला आतां विवाहाची सोन्याची शृंखला पायांत जख-डून घेऊन कोणत्या प्रेमी जीवाची पूजा बांधायची आहे ? आतां हा समाज हाच माझा संसार ! तुमच्या संसाराचा आनंद तोच माझा आनंद ! माझा डॉक्टरीचा धंदाही परोपकारतेला पोषकच आहे. आतां अगोदर विम-लेचं मन वळविलं पाहिजे. चला, नरेंद्र, माझ्या या कृत्याला बाबांचीही संमति आहेच. त्यांच्याच अधिकारवाणीचा परिणाम तुमच्या मनावर अधिक झाला असता. पण प्रेमाच्या अधिकारानं—

**नरेंद्र**:—तूं मला माझ्या कर्तव्याचा मंगल मार्ग दाखविलास ! तुझ्या-सारख्या त्यागशील वृत्तीच्या समाजभगिनी समाजसेवेसाठीं स्वतःच्या सुख-सर्वस्वावर सर्वस्वीं पाणी सोडायला तयार झाल्या तर या भारतवर्षातल्या भावी पिढीचा भाग्योदय झालाच म्हणून समजला पाहिजे. दे, भगिनी, या तुझ्या भावाला मंगल आशीर्वाद दे. माझ्या वयाच्या वडीलपणाचा वेडा विचार दूर सारून, प्रेमी जीवाला परमेश्वराचं पाठबळ प्राप्त करून देणारा मंगल आशीर्वाद दे. या माझ्या मानवशक्तीला तुझ्या श्रीमंत हृदयांत खेळणारी परमेश्वरी तेजाची संजीवनी अशीच अखंड पाज, आणि स्वार्थत्यागाच्या सर्वेश्वरी. तुझ्या त्यागशील उदार हृदयापुढं नम्र झालेल्या या माझ्या दुबळ्या वृत्तींना असाच कायमचा धीर दे. [ पाय धरतो. ]

**सरोजिनी**:—नरेंद्र, उठा, हें काय ?

**नरेंद्र**:—देवते, ही तुझ्या आत्मयज्ञाची तेजोगंगा ! [ पडदा ]

---

# प्रवेश पांचवा.

[ चर्नीरोड गार्डन—नांव लिहिलेली हँडबॅग घेऊन श्रीयुत प्रवेश करतो. ]

**श्रीयुत**:—तब्बल दोन घंटे झाले. चातकासारखी वाट पहात आहे.

अजूनी तर कांहींच सुगावा लागत नाहीं. अंधारही पडत चालला. कीं अंधारांतच त्या कवियित्रीचा आणि माझा प्रथम परिचय व्हायचा योग आहे ? बाकी, इथं येण्यांत कांहीं नुकसान झालं नाहीं म्हणा. अहो, जो तो माझ्याकडंच सारखे डोळे लावून पहात आहे. ही माझी बॅग म्हणजे काय चीज आहे ! या साडेतीन हात देहाच्या कैलासवासीच्या अगडबंब मेंदूची मिरास या साडेतीन वितीच्या वतनवाडींत पुरली आहे. पांढऱ्यावर काळं करणाऱ्या या श्रीयुताचं वाङ्मय यांत आहे. फडकूं दे तर ही जिवंत जाहिरात अशीच कांहीं वेळ. म्हणजे उद्यां साऱ्या मुंबईभर प्रसिद्धीच प्रसिद्धी ! (इकडे तिकडे फिरतो.) [ वेषांतर केलेली कांता आणि सरोजिनी प्रवेश करतात. ]

**सरोजिनी**:—अग कांते, हा संसार आहे ! हें नाटक आहे. यांत असें हास्यास्पद विचित्र प्रसंग यायचेच. आपला हेतु चांगला आहे. पतिवंचनाचं पाप कसं लागेल ? बरं. या नाटकाची रंगीत तालीम एकदोनदां केलीच आहे आपण. बाकी, या वेळीं तुझा रागरंग खरोखरीच खुमारीचा झाला आहे. बरं मी जाते. [ जाते. ]

**कांता**:—( स्वगत ) या वेषांत ते मला खास ओळखणार नाहींत. ( बाकावर पुस्तक वाचीत बसते. श्रीयुत येतो. )

**श्रीयुत**:—(स्व.) मायगॉड ! ही कोण बुवा सुधारणेची पुतळी ! कीं हींच ती कवियित्री ! छट् ही चढोर, छटेल, नाटकी दिसते आणि ती तर म्हणे अगदीं साधी आहे. ( फोटो काढतो. ) फाल्गुनरावासारखा प्रसंग ओढवला आहे ! पण त्याच्यासारखा माझ्याही नशिबीं रडका फाल्गुनमास न येवो आणि शेवटीं फजिती न होवो म्हणजे मिळविली. ही कोणी तरी वेश्या दिसते. पण कुलीन घराण्यांतली दिसते. कुलांगना कीं वारांगना ? कीं कुलीन वारांगना ? कुणी कां असेना. आपणाला काय ? 'आलिया भोगासी असावें सादर !' पहावं कांहीं सूत जमतं कां ? नाहीं तर हें सूत जमवितां जमवितां त्या सुतानं नव्हे पण त्या सुतापायीं मात्र स्वर्ग गांठायची पाळी यायची. ( बाकाभोंवतीं जरा वेळ फिरून एका बाजूस हळूच बसतो. ) ( पुस्तकांत डोकावून पहात ) आपण काय वाचतां हें ? कसलं पुस्तक ? ( जवळ सरकतो. )

**कांता**:—'शैलबालेचीं गाणीं'. पण तुम्ही कोण ? तुम्हांला कांहीं एटिकेट्स ? शिष्टाचार ! ( श्रीयुत घाबरेपणानें उठून दूर उभा राहतो. )

**श्रीयुत:**—( बॅगवरचें नांव दाखवून ) मी सुद्धां एक कवि असून श्रीयुत 'कैलासवासी' या नांवानें प्रसिद्ध आहे. आज याच पुस्तकाची कवियित्री मला भेटायला येणार होती, म्हणून—

**कांता:**—होय कां ? तेच कां आपण 'कैलासवासी' ?

**श्रीयुत:**—हो-हो. हीच व्यक्ति 'कैलासवासी' म्हणून महशूर आहे, मिस् सरोजिनीबाई—

**कांता:**—आलं लक्ष्यांत. त्या फिरताहेत तिकडं बागेंत.

**श्रीयुत:**—पण म्हटलं त्या असत्या इथं तर त्यांनीं आपला प्रेमाचा परिचय—

**कांता:**—आय सी ! प्रेमाचा परिचयच नां ? माझी तुमच्यावर प्रीति जडली आहे. ( जवळ जाते. ) अगदीं प्लॅटोनिक लव्ह ! नजरेला नजर भिडून लव्ह ॲट दि फर्स्ट साईट अशी अवस्था झाली आहे. (गळ्यांत हात टाकूं लागते. ) हें हो काय ? असं दूर दूर काय पळतां ? असं काय गडे ?

**श्रीयुत:**—( स्वगत ) माय गॉड. ही अलाबला तर गळींच पडूं लागली आहे.

**कांता:**—प्रेमानं माझं अंतःकरण फुलून गेलं आहे.

**श्रीयुत:**—( सुस्कारा सोडून ) हां. माझीही जवळ जवळ तीच अवस्था झाली आहे. पण काय करायचं ? आपण दोघेंही विवाहित आहोंत;

**कांता:**—त्याची नको पंचाईत. माझं लग्न झालं आहे खरं पण आमचे पतिराज कवितेच्या भराऱ्या मारीत जे देशांतराला गेले आहेत ते तिकडंच !

**श्रीयुत:**—रेग्यूलर नॉन्सेन्स ! काय महामूर्ख गृहस्थ हो ! काव्याचा एवढा छंद ! कवितेपुढं संसार करायचंही सुचूं नये म्हणजे खरोखर नालायकपणाच हा ! [ हंसतो. ]

**कांता:**—पण तुमचं लग्न तरी—

**श्रीयुत:**—झालं आहे इतकंच. त्यांत विशेष राम नाहीं. माझी बायको सुंदर आहे. सर्व कांहीं आहे. पण पशू अगदीं पशू ! कविता स्वतः तर करणं दूरच राहिलं पण समजण्याची सुद्धां तिला अक्कल नाहीं. तिच्यांत रोमान्स नाहीं ! ती स्टायलिश नाहीं !

**कांता:**—मग झालं तर. मी आवडते नां तुम्हांला ? असं काय करा-

यचं गडे ! माझं प्रेम खोटं कां आहे ? मी आहे नां स्टायलिश ? (तो दूर पळतो. ती जवळ जाते.)

श्रीयुत:—हो–हो. पण जरा लांबून. [ स्वगत ] हिच्या प्रेमाच्या चव-चव्याखालीं ठारच झालों बुवा ! हिच्यांत कांहीं विनय, लाज, हिनं तर हा गुलावछकडीचा फार्स सुरूं केला.

कांता:—आपण नवा संसार थाटूं. माझ्याशीं लग्न करण्याचं मला वचन द्या. द्यानां वचन.

श्रीयुत:—काय ? लग्न ? तुमच्याशीं लग्न ?

कांता:—हो. प्रीतिविवाह !

श्रीयुत:—( स्वगत ) अरे बापरे, ती एक सांभाळतां सांभाळतां नाकीं नऊ आले आणि ही एक गळफांस लावणारी गळ्यांत पडली म्हणजे माझे तीन तेरा नऊ अठराच व्हायचे.

कांता:—एवढा विचार कसला करतां ? मी आपली तशीच तुमच्या-जवळ राहते. कांहीं नको सेरिमनी ! सेरिमनी पाहिजे कशाला ?

श्रीयुत:—मग ठीक आहे. फार आनंदाची गोष्ट आहे.

कांता:—मग काय ? ठरलं ना ?

श्रीयुत:—हातोहात ठरलं.

कांता:—द्या वचन.

श्रीयुत:—'वचनें किं दरिद्रता' ! दोन्ही हातांनीं वचन देतो कीं ती एक लग्नाची बेडी पायांत असतांही ही दुसरी हातकडी हातांत अडकवून घेण्याला मी एका पायावर तयार आहे. [ एक पाय वर करतो. ]

कांता:—पण माझ्या कांहीं अटी आहेत. त्या अटी अगोदर मान्य करा.

श्रीयुत:—हा प्रेमाचा बहाद्दर, इष्काचा बेदर्द मर्द तुझ्या सर्व अटी मान्य करील. बोल तुझ्या अटी.

कांता:—ऐका. मला एकेरी नांवानं हांक न मारतां नेहमीं 'अहो जाहो' 'यावं बसावं' असं म्हटलं पाहिजे.

श्रीयुत:—( स्व. ) दुर्दैव ! दुसरं काय ? (प्र.) या प्रेमाच्या सौद्यांतील ही पहिली अट मंजूर ! पुढं—

कांता:—मला रोज प्रत्येक तासाला नवा पोषाख पाहिजे. नवं पोलकं—

नव.पातळ ! पाहतांच आहां कीं मी अशी फॅशनबल स्टायलिश आहे— आहे नां स्टायलिश् ? मी स्टायलिश आहे नां ? सांगा आहे म्हणून.

श्रीयुतः—(एकीकडे) सांगायला कशाला पाहिजे बये,हा तुझा चालता बोलता रोमान्स सांगितल्यावांचून कळेल आणि पाहिल्याशिवाय दिसेल.

कांताः—मग माझी मिजास संभाळायची ना ?

श्रीयुतः—(स्व.) हिच्या शृंगाराची मिजास संभाळतां संभाळतांच या कैलासवासाला मेल्यावांचून स्वर्ग दिसणार कीं काय ? (प्र.) बरं, तुझ्या-चुकलों-तुमच्या सर्व अटी झटपट सांगून टाका पाहूं.

कांताः—वाळकेश्वरीं बंगल्यांत राहायचं. स्वयंपाक—

श्रीयुतः—बाईब्राह्मण ठेवूं म्हणे, नाहीं तर ती आहेच कीं घरीं—

कांताः—छे-छे. तुम्ही स्वतः स्वयंपाक करून मला प्रेमानं जेवूं घातलं पाहिजे.

श्रीयुतः—शाबास ! ठीक आहे. प्रेमासाठीं चुलींत तोंड खुपसायलाही हा प्रेमी वीर तयार आहे! पुढं—अहो, पण मी स्वयंपाक करून तुम्ही काय करणार ?

कांताः—काय म्हणजे ? माझा लेखनव्यवसाय ! मला तुमच्याशीं बोलायलाच काय पण तुमच्याकडं नुसतं बघायलाही फुरसत मिळणार नाहीं.

श्रीयुतः—( स्व. ) हा रोमान्स अंगलट आला. सारंच ऑफस् ! हाच तो विलायती सुधारणेचा ऑफस् ! (प्र.)छे, बुवा ! या लग्नाच्या सट्ट्यांत मला नुकसान येणार. तुमचं प्रेम फारच महाग आहे. तुम्ही तर मला हक्काचा पोटावारी नोकर समजणार.

कांताः—ऑफ कोर्स ! तसंच दुसरं, मी केव्हांही कुठंही बाहेर जाणार. माझ्यासाठीं दारांत चोवीस तास मोटार तयार पाहिजे.

श्रीयुतः—( मटकन् खालीं बसतो. कपाळावर हात मारतो. ) नशीब माझं ! हा रोमान्स तर बोकांडीं बसला!

कांताः—तुम्हाला रोमँटिक जिवलगीण पाहिजे नां ? मग मी नाहीं कां रोमँटिक ?

श्रीयुतः—( स्व. ) ही चंचल बिजली माझ्या डोक्यावर नाचून मला जिवंत जाळणार कीं काय ?

**कांता**:—नाथ ! प्राणेश्वर, बोलत कां नाहीं ? मी अशानं किनई रागावेन हं. रोमान्स आहे नां माझ्यांत—

**श्रीयुत**:—( त्रासून ) माझे आई, जगदंबे ! तुझ्या पायां पडतो. साष्टांग नमस्कार घालतो. ( पाया पडतो. ) तुझा रोमान्स घाल चुलींत. माझी रोमान्सची हौस फिटली ! मला रोमान्स पाहिजे पण असा भडक रंगाचा रोमान्स नको बोकाळायला.

**कांता**:—तुम्हांला स्टायलिश बायको पाहिजे नां ? मी नाहीं कां स्टायलिश ?

**श्रीयुत**:—तुमची ही विलायती स्टाईल मला नको. हो—मी आहे स्वदेशी माणूस ! अस्सल पिढीजात हिंदुस्थानी आहे ! छे,देवा, माझी कांता लाखपटीनं उत्तम !

**कांता**:—पण आवडत नाहीं नां ?

**श्रीयुत**:—केवळ तिला कविता कळत नाहीं म्हणून. पण आतां—

**कांता**:—मग एखादी थेट तुमच्या कांतेप्रमाणंच गुणरूपानं असून, शिवाय ती नामांकित कवयित्रीही असली तर ?

**श्रीयुत**:—दुधांत साखरच पडली म्हणायची.

**कांता**:—(वेष बदलून) मग ही घ्या तुमची तशी कांता ! 'शैलबाला' कवयित्री !

**श्रीयुत**:—( आश्चर्यानें ) कोण कांता ? माझी लाडकी कांता ? लाडके, आज झणझणीत अंजन घातलंस माझ्या डोळ्यांत ! हें नाटकच केलंस तूं.

**कांता**:—पण या नाटकाची सूत्रधारीण मी नव्हे.

**श्रीयुत**:—मग दुसरी कोण ?

**सरोजिनी**:—( प्रवेशून ) ही सरोजिनी.

**श्रीयुत**:—( शरमून स्वगत ) या वेळीं माझा फोटो काढायला ही छुपा कॅमेरा तर घेऊन आली नाहीं नां ?

**सरोजिनी**:—कसं काय कविराज ? रोमान्स—

**श्रीयुत**:—माफ करा. तो शब्दसुद्धां पुनः मला ऐकवूं नका. माझी कवितेची, रोमान्सची धुंदी उतरली. आजपासून तो 'कैलासवासी' कैलासवासीच होऊन या कांतेचा आज्ञाधारक असा "कांताकांत' झाला आहे.

एवढा आक्रांत झाल्यावर 'कांताक्रांत' होऊन बायकोच्या नांवावरच जगांत पुढं आलेलं बरं. साऱ्या जन्मांत आज खरा रोमान्स आला!

**सरोजिनीः**—जन्माची आठवण राहिली कां?

**श्रीयुतः**—अहो, जन्माची आठवण नव्हे तर या मरणाचीच आठवण म्हणा.

[पडद्यांत मोटारीचा हॉर्न वाजतो. नंतर गलबला होतो. 'अयाईऽऽमेले—मेले—धांवा—धांवा हो कुणि तरी.' असे शब्द ऐकूं येतात.]

**सरोजिनीः**—काय? काय झालं आहे? लोकांची गर्दी कां जमली आहे? आय सी! हा मोटार ॲक्सिडंट! हे तमासगीर नुसते पहात उभे आहेत. श्रीयुत, चला पहा. (जातात.) (पडदा पडतो. पुढचा प्रवेश रस्त्याच्या कंव्हरसीनवर.) [भीमामावशीला बेशुद्ध स्थितींत घेऊन येतात. तिच्या पायावरून मोटारीचें चाक गेल्यानें बरीच इजा होऊन रक्त वहात आहे

**श्रीयुतः**—(घाबरून) अपघात—भयंकर अपघात! टेरिबल ॲक्सीडंट!

**सरोजिनीः**—श्रीयुतराव, झटपट एक टॅक्सी घेऊन या. जा—

**श्रीयुतः**—व्हिक्टोरिया चालेल नां?

**सरोजिनीः**—कांहीं आणा, पण लौकर आणा—जा. (जातो.)

**भगवानः**—(प्रवेशून) म्हातारी कुठं गायब झाली बुवा. (पाहून) अरेरेरे, मावशीबाई!

**सरोजिनीः**—तूं रे कोण कुठला?

**भगवानः**—बाईसाहेब, मी नंदापूरचा. ही बाई आमच्या गांवची. हिच्या भाच्यानं या बिचारीला काशीयात्रेला नेतो म्हणून फसवून बोरीबंदर स्टेशनावर सोडून दिलं. माझी हिची अवचित गांठ पडली.

**सरोजिनीः**—बरं पण तो इसम कुठं आहे?

**भगवानः**—दोन हजारांची रोकड आणि पांच हजारांचे दागिने, असा सात हजारांवर डल्ला मारून पळून गेला.

**सरोजिनीः**—ठीक आहे. पोलिसांत वर्दी दे. मीही टेलिफोननें सी. आय. डी. कडं कळवितेंच. बरं पण तुझं नांव—

**भगवानः**—माझं नांव भगवान. नरेंद्रराव म्हणून एक डॉक्टर आहेत इथं, त्यांचा हा पत्ता. (पत्त्याचा कागद देतो.) ते चार दिवसापूर्वी इथं आलेच आहेत. मी त्यांच्या बरोबरच यायचा पण कांहीं कामामुळं मागं राहून आज

आलों. स्टेशनावर या म्हातारीची गांठ पडली. मी त्या चोराच्या तपासाला लागलों तोंच ही म्हातारी इकडं धडपडली अन् हा प्रकार झाला.

**सरोजिनी**:—( एकीकडे ) कांते, शामसुंदरचंच हें कृत्य दिसतं. कांहींच सांगतां येत नाहीं. नरेंद्र भेटल्यावर सारा उलगडा आपोआपच होईल.

**श्रीयुत**:—( प्रवेशून ) शेवटीं विक्टोरियाच आणल्या बुवा. (हंसतो.)

**सरोजिनी**:—किती ? दोन ना ?

**श्रीयुत**:—व्हिक्टोरियांना काय तोटा ? या मुंबईत जिकडं तिकडं व्हिक्टोरियांचंच राज्य !

**सरोजिनी**:—चला तर—( सर्वजण जातात. भगवान मावशीला उचलून नेतो. )

---

# प्रवेश सहावा.

[ विमला पलंगावर झोंपली आहे. ]

**विमला**:—( झोंपेंत ) कोण, कोण ते ? कुणाचा हा प्रेमाचा हात माझ्या तोंडावरून फिरत आहे ? नाथ, अगबाई ! हा तर नेहमींच्या परिचयांतला चेहरा ! कोण तुम्ही ? नरेंद्र ! पण हें, हें कोण ? मला कुंकू कोण लावतं आहे ? मला सौभाग्य ! या माझ्या पोळल्या पंचप्राणांना सौभाग्यसुखाची संजीवनी ! मंगल कुंकुमतिलक या विधवेच्या अभद्र कपाळीं ! आपल्या कपाळावरचं कुंकू पुसून माझ्या कपाळाला लावणारी ही कोण जगदंबा ? कोण, कोण ? देवी सरोजिनी ? होय तीच. नरेंद्र, नरेंद्र ! ( नरेंद्र प्रवेशून तिचा हात आपल्या हातांत घेतो.) माझ्या हातांत हा हात कुणाचा ? नरेंद्र—

**नरेंद्र**:—विमल, विमल, जागी झालीस कां ?

**विमला**:—कोण ? नरेंद्र ? ( उठते.)

**नरेंद्र**:—होय, मीच नरेंद्र. पण तूं जागी झालीस कां ?

**विमला**:—जागी झालें. पण जागी होऊन काय करायचं ? अहाहा ! किति मनोहर सुखस्वप्न ! त्या सुखाच्या स्वप्नासाठीं आणि स्वप्नाच्या सुखा-

साठीं चिरंतनाची कालनिद्रा मला लागेल तर किती बहार होईल! अहाहा! आनंदाच्या साम्राज्यांत तरळणारं, प्रेमाश्रूंच्या परिमळानं दरवळणारं किती सुंदर स्वप्न तें!

**नरेंद्र:**—तुला काय स्वप्न पडलं?

**विमला:**—त्या विचित्र स्वप्नानं मनांत अननुभूत विकारांची लाट हेलावल्यामुळं मला तें स्वप्न सांगवतच नाहीं.

**नरेंद्र:**—विमल, लाडके विमल, बाळपणींच्या त्या मुग्धमनोहर स्वैर-तेची स्मृति आहे ना? निर्व्याज, अल्लड प्रेमाच्या पुष्पवाटिकेंत विहार करतांना मी तूं हा आपपर भेदभाव लोपून आपल्या निर्मळ जीवनगंगेचा समसमा संयोग झाला होता. अद्वैताच्या आनंदांत, अल्लड बाळपणींच्या मुग्ध भावनेनं भातुकलीचा चिमणा संसार थाटून माझ्या गळ्यांत प्रेमानं माळ घातलीस—

**विमला:**—अहाहा! किती गोड आठवणी त्या! पण त्याच आतां विषारी शल्याप्रमाणं जिवाला घरे पाडीत आहेत.

**नरेंद्र:**—मग त्यांचीं टोकं बोथट करून नको कां टाकायला?

**विमला:**—टोकं बोथट केली तरी त्यांनीं एकदां केलेली जिवाची जखम काळाच्या मलमपट्टीनंसुद्धां लौकर कशी भरून येणार? मानवी संकल्प सिद्धीमधें दैवाची दारुणता धरणं धरून बसली—

**नरेंद्र:**—पण दुर्दैवाच्या दारुणतेवर मानवी मात होऊं शकते.

**विमला:**—होय. पण दुर्दैवाच्या दाहानं त्या बिचाऱ्या अल्लड आशांची बीजंच जळून खाक झाल्यावर जुन्या आशांना जीवकळेचा नवा जोम कोठून येणार? बाबांचं देहावसान झालं— [रडते.]

**नरेंद्र:**—तोच—तोच करुणप्रसंग! तुझ्या या रक्ताच्या आसवांनीं तुझ्या वडिलांच्या रक्ताचं पाणी झालं! तुला अशा असहाय दुःस्थितींत, वैधव्याच्या पंकांत पिचत ठेवून स्वर्गाच्या साम्राज्यांत प्रवेश करतांना तुझ्या बाबांनीं अंतकाळीं कोणते उद्गार काढले बरं? विमल, ते उद्गार, तुझ्या नसले तरी माझ्या कानांत अद्याप घुमत आहेत. 'बाळे, मी चाललों, आतां तुला नरेंद्रच—!' विमल, हेंच ना त्या विझत्या प्राणज्योतीचे केविलवाणे उद्गार! देवदूतांचे पाश प्राणांवर पडतांना पाहून तुझे माझे हात त्यांनीं प्रेमानें आपल्या छातीशीं धरले, आणि मग शेवटचा श्वास सोडला! विमल, त्या

पुण्यात्म्याच्या प्रेतावर झालेल्या त्या आपल्या स्वाभाविक हस्तमीलनाचा तात्त्विक अर्थ काय असावा असं तुला वाटतं ?

**विमलाः**—त्या अघोर अनर्थांच्या वेळीं सहज घडलेल्या आपल्या हस्तमीलनाचा अर्थ सद्धेतूमूलक असला तरी व्यर्थच आहे. आशेचे धांवते मनोरथ सिद्धीमार्गाकडं सुरळीत जातातच असं नाहीं.

**नरेंद्रः**—तें खरं. पण परमेश्वरी प्रेरणेनंच भूतदयेची भावना जागी झाली आणि मानवी मनोधैर्य स्वार्थत्यागानं सजून कर्तव्यासाठीं खडं झालं तर ; परमेश्वरी पराक्रमालाही पादाक्रांत करणारी अशी कोणती पाशवी शक्ति आहे ? असा कोणता कर्दनकाळ त्या दैवी दिव्यतेलाही दडपून टाकील ?

**विमलाः**—हा आपला समाज ! पुरुषांच्या पक्षाभिमानानं पापाचीही पर्वा न करणारा हा आपला अन्यायी समाज !

**नरेंद्रः**—पण या आत्मवंचक, कृतिशून्य समाजाची दिक्कत कोण धरणार ? पक्षपाती न्यायाचं नटवं साम्राज्य उभारून निर्मळ न्यायमंदिरांत अन्यायाला आश्रय देऊन आपल्या समंजसपणावर प्राचीनमतांचं वेड पांघरणाऱ्या या समाजाची चाड कशी आणि कां बाळगायची ? बहिरंगाच्या भपक्याला भाळणारा, करुणेच्या भावनेला जाळणारा, शोधक समंजस बुद्धीला टाळणारा हा आत्मघातकी समाज ! वर्णसंकराचं वेड डोक्यांत घेऊन ' धर्मग्लानी झाली ' अशी अभद्र घोषणा करणारच ! पण नाहीं. विमल, अहंपणाच्या नशेची धुंदी निवळून आपल्या समाजाचे डोळे आतां दूर दृष्टीनं प्रगतिपथाकडं पाहूं लागले आहेत. आत्मकल्याणाचा मार्ग उजळणाऱ्या सुधारणेच्या उगवत्या उषादेवीनं उत्साहानं स्वागत करण्यासाठीं तो खडबडून जागा झाला आहे. अज्ञात भविष्याकडं आशाळभूत नजर नाचवीत, भूतकाळांचं ओशाळून सिंहावलोकन करीत, वर्तमानकाळाच्या—या विचक्षण वाटाड्याचा—फायदा घेऊन तो कर्तव्याचा मार्ग धैर्यानं आक्रमित आहे असंच मला वाटतं.

**विमलाः**—हीच—हीच ती आत्मवंचना ! या समाजाची दिखाऊ दयेची दरिद्री सोंग, डबडबलेल्या डोळ्याचीं ढोंगं मी पूर्ण जाणून आहे. भावी सुखाच्या आशेनं सोसलेली झीज म्हणजे खरा स्वार्थत्याग काय ?

**नरेंद्रः**—शुद्ध प्रेमाच्या पवित्रतेला सुद्धां पार्थिवतेचा पापी कलंक कसा लागूं शकेल ?

प्रेमलाः—तें खरं, पण अनाथांच्या आळवणीला धांवणारा प्रेमाचा पुरुषोत्तम—

नरेंद्रः—या जगांत आहे हें तुला पटविण्यासाठींच मी आज तुझ्यापुढं उभा आहे. तुझ्या या निराश जीवनापलीकडच्या अकल्पित आनंदाच्या शैलशिखरावर चढविण्यासाठीं हा नरेंद्र तुझ्यापुढं उभा आहे. कर्त्या सुधारकाच्या करारी बाण्यानं या समाजसेवेसाठीं उद्युक्त झालों, पण तुझ्या या पांढऱ्या फटफटीत भालप्रदेशाला ओलांडून जाणं——

विमलाः—म्हणजे? नरेंद्र, तुमच्या बोलण्याचा अर्थ माझ्या नाहीं लक्ष्यांत आला. तुम्हीसुद्धां मला सरोजताईसारखा पुनर्विवाहाचा मार्ग दाखवीत आहां कां? माझ्या या विधवाव्रताच्या जबाबदारीची जाणीव मला नाहीं अशी कां शंका तुम्हाला आली?

नरेंद्रः—छे–छे. तसं नव्हे. तुझा आत्मसंयमी, निग्रही स्वभाव, शुद्ध-शील, निर्दोष वर्तन, खरोखरच महान योगिनीपदावरच तुला पोहोंचवतील खास. स्वर्गातील देवांच्या तेहेतीस कोटीसुद्धां 'बालयोगिनी' 'शापभ्रष्ट देवता' याच नांवानं तुला संबोधतील. ही तुझी योग्यता! पण विमल, तुझ्या आचरणामुळं नव्हे तर या पापबुद्धीच्या मतलबी समाजाच्या निर्दयतेमुळं आणि सृष्टिक्रमाच्या सहज कठोरतेमुळंच माझं मन तुझ्या भवितव्यतेविषयीं साशंक झालं आहे.

विमलाः—संसारांत राहून संन्यस्त वृत्तीनं वागण्याची शहाणी शिकवण सनातन धर्मानं हिंदू विधवांना चांगली सांगितली आहे. अहिल्याराणीचं–त्या देवतेचं उज्ज्वल चरित्र काय दाखविते? हेंच नां? हिंदु स्त्रियांचं वैधव्य पवित्र आहे असंच हिंदूधर्म जगाला ग्वाही देत आहे.

नरेंद्रः—विमल, माझ्या बोलण्यानं तुझ्या भोळ्या भाविक बुद्धीला भाले-बरच्यां बोंचण्याचा माझा हेतु नाहीं. पण सत्तेच्या–सामर्थ्याच्या–श्रीमंती-च्या जोरावर भोळसर बालविधवांना पापाच्या मार्गावर खेंचणारा हा स्वार्थ-साधू समाज–या समाजाचा क्रूर सैतानीपणाच माझ्या तोंडून हे उद्गार काढीत आहे. किती तरी समाजकंटकांनीं आजवर विधवांचं पावित्र्य भ्रष्ट केलं आहे. त्यांच्यावर जुलमी पापी हात टाकून आपल्याबरोबर त्यांना रौरवांत ओढलं आहे आणि पातकी पुरुषांच्या फुसलावणीनं फसून शीलभ्रष्ट झालेल्या त्या शापित देवतांनीं आपल्या पापाचा कालिमा धुवून टाकण्यासाठीं शेवटीं काळ-

सागरांत उडी घेतली आहे. विमल, भोळ्या दृष्टीला दिसतो इतका कां आपला हा समाज नीतिसंपन्न, उदार आणि दयाळु आहे ?

**विमलाः**—मग काय ? गतभर्तृकांना या गौण विवाहाखेरीज जगांत जगायला—जनापवादाच्या ज्वाळेंतून सुरक्षित सुटायला—दुसरा मार्गच नाहीं कां ?

**नरेंद्रः**—पुनर्विवाह, समाजसेवा आणि मरण हे तीनच मार्ग या जगांत जगायला विधात्यानं विधवांना मोकळे ठेवले आहेत. त्यापैकीं पहिल्या मार्गाचा अवलंब करण्याचा अट्टाहास मी चालविला आहे. दे, विमल, तुझा हात मला दे, आणि माझ्या संसारांत सहचारिणीच्या पदावर अधिष्ठित होऊन माझ्या सुखदुःखाची वाटेकरीण हो. नको—विमल, अशी बावरूं नकोस. तुझ्या पडत्या काळाचा कहू फायदा घेऊन तुला या पुनर्विवाहाच्या पेंचांत मी पकडित नाहीं. माझ्या प्रश्नाचा प्रामाणिक विचार कर. माझ्या उच्च ध्येयाच्या उद्रेकाची उत्कट भावना समजून घे.

**विमलाः**—पण नरेंद्र, या छिद्रान्वेषी समाजाच्या वक्र दृष्टीचा विचार तुमच्या विवेकी हृदयानें केला आहे काय ? त्याच्या अस्थानी आक्रोशाची अंधुक कल्पना तरी तुमच्या अंधळ्या आत्मविश्वासाला आहे काय ?

**नरेंद्रः**—आहे, पूर्ण आहे. कूपमंडूकवृत्तीच्या सोंवळ्या धर्मवीरांचा 'धर्म बुडाला' हा पंचाक्षरी पांचजन्य या वेळीं माझ्या एका कानाला बधिर करीत आहे तर लाखों विधवांच्या कर्कश किंकाळ्या माझ्या दुसऱ्या कानाच्या कानठळ्या बसवीत आहेत ! समाजसेवेचें पवित्र कंकण बांधून पाणिग्रहणासाठीं हा हात पुढं करतांना बालविधवांच्या पिचलेल्या कांकणांचा पर्वत—तो पहा मला स्पष्ट दिसत आहे ! वडेपणाच्या वडेजावीला, नादान नर पशूंच्या भिडेला भाळलेल्या, त्या पहा—किती तरी विधवा आपल्या पापाचं पारणं,.पश्चात्तापाच्या पोळत्या अश्रूंनीं न्हाऊन प्राणाच्या मोलानं फेडीत आहेत. कांटेरी कुंपणांत, नदीनाल्यांत, कभिन्न काळोखांत, भ्रष्ट झालेल्या विधवा भराभर बालहत्या करीत आहेत ! त्यांची—त्यांच्या अब्रूचो—त्यांच्या सर्वस्वाची राखरांगोळी झाली ! विमल, जुन्या पिढीनं जरी माझ्या या कृत्याची निषेधबुद्धीनं नालस्ती केली तरी नवी पिढी तितकी अनुदार खास नाहीं. चिकित्सक बुद्धीचं हें क्रांतियुग आहे !

**विमलाः**—तें मला समजतें. तुमचा पवित्र हेतु मी जाणतें. विधवांच्या तुटलेल्या मंगळसूत्रांचेंच मंगल विजयतोरण सुधारणादेवीच्या मंदिराला बांधलं पाहिजे कीं नाहीं याचं उत्तर देण्याला स्वतंत्र आचारा विचाराचा न्यायी समाजपुरुष समर्थ आहे. हिंदुस्थानांतल्या बत्तीस कोटी जिभा एका सुरानं पुनर्विवाहाला पूर्ण संमति देण्याला आज धजत नसल्या तरी उद्यांचा सूर्य विचारवंताच्या हृदयांत प्रकाश खास पाडील ! मी तुमच्याशीं वाद केला तो केवळ लोकांची बाजू पुढं मांडण्यासाठींच.

**नरेंद्रः**—शिवाय, या गोष्टीला माझ्या अधिकारी गुरुदेवतेनंच मला प्रोत्साहन दिलं आहे.

**विमलाः**—तुमची गुरुदेवता ! कोण ? कोण ती ?

**नरेंद्रः**—दुसरी कोण ? सरोजिनीदेवी हीच माझी गुरुदेवता !

## पद ३५

**झरलाच शांत मन-चंद्रकांत । धरि-दया-भाव अंतरिं नितांत ॥ ध्रु० ॥ दावि भावि यश-पथ गुरुदेवी । दे कर हा सखये ! सुख सेवी । अतां कांवि वद मन हो भ्रांत ॥ १ ॥**

मग बोल विमल, तुझं अनुमोदन आहे नां ? बोल.

**विमलाः**—बोलूं ? काय बोलूं ? कशी बोलूं ? अशा प्रसंगीं कोणत्या कृतज्ञ जीवाची जीभ संकोचवृत्तीनं स्तब्ध राहणार नाहीं ! मुक्या मनाची भाषा बोलायला जीभ जडच होणार ! समाधानाच्या समाधींत वाचा विलीन होणार ! अहाहा ! देवी सरोजिनी ! तिच्या स्वार्थत्यागाचं स्वरूप मला दिसलं ! आजवर अमूर्त रूपानं अंतःकरणाच्या अनंत अवकाशांत असणारं प्रेम प्रत्यक्ष स्वरूपांत प्रकट झालं ! रित्या हृदयांत आशेला आसरा मिळाला. आयुष्याच्या अंधेर नगरींत नव्या चैतन्याचा प्रकाश फैलावला !

## पद ३६

**सुधीर आला मज नवा । भ्रमवि लीला तुझी ही देवा ! ॥ध्रु०॥ रवि उदेला । दुरवि तमाला । हंसवि जीवा ॥ १ ॥**

[ नरेंद्राच्या वक्षःस्थलावर डोकें टेंकते. ] [ पडदा. ]

# प्रवेश सातवा

[रस्ता—शामसुंदर सूट पँट घालून हातांत कल्याण—बॅग घेऊन प्रवेश करतो.]

**शाम०:**—हें माझं नाटक या थराला येऊन पोहोंचेल असं मला कांहीं वाटलं नव्हतं. आतां इतकं केल्यासारखं शेवट गोड झाला म्हणजे मिळविली. विमलेची बेअब्रू करण्याचा शक्य तो प्रयत्न केला. पण श्रीयुतानंच आयत्या वेळीं त्या मास्तरिणीच्या देखत म्हणे माझा डाव चव्हाट्यावर मांडला. जाऊं दे तें. आतां या साहेबी थाटाच्या सभ्य पोषाखांत मला बदमाष कोण ठरविणार? पोषाखी जग अशा पोषाखावरच कसं झुलवावं यालाही डोकं लागतं. एवढ्या अवाढव्य मुंबईत माझा सुगावा कुणाला कसा लागणार? शिवाय तसा प्रसंग आलाच तर आपल्याजवळ युक्त्यांची जंत्री कांहीं कमी नाहीं. तरी पण या मुंबईत राहण्यापेक्षां तूर्त ठाण्यालाच ठाणं देणं उत्तम! ( विचार करून ) छट्. कल्याणच गांठावं झालं. या कल्याणबॅगमध्यें माझ्या जन्माचं कल्याण मी कोंडलं आहे. कल्याण गांठलं नाहीं तर इथंच कायमचं कल्याण व्हायचं एखादे वेळीं. बस्स. हाच बेत मुक्रर करावा. ( घड्याळ पाहून ) किती वाजले? नऊ पस्तीस. ए टॅक्सीवाला, चलो. बोरीबंदर स्टेशन. जल्दी चलो. ( जाऊं लागतो. )

**भगवान:**—( बरोबर आणलेल्या पोलिसास ) हाच—हाच तो फरारी इसम. बरा लौकरच मुद्देमालासकट सांपडला.

**१ पोलीस:**—ए गांवठीसाहेब, अगोदर पोलीस स्टेशन, मग रेल्वे स्टेशन—[ मनगट पकडतो. ]

**पोलीस:**—ए शरीफ बदमाष, या बॅगमध्यें काय आहे?

**शाम०:**—यू डॅम फूल! नॉन्सेन्स! पोलीस स्टेशन? मी कुणी चोर, खुनी, कीं दरवडेखोर आहे म्हणून मला पकडतां?

**१ पोलीस:**—सात हजारावर हात मारून वर ही हिकमत?

**२ पोलीस:**—तुझ्यासारखे साळसूद सैतान या मुंबईत पुष्कळ पाहिले आहेत.

शाम०:—पहा, पहा बरं. माझ्या महत्त्वाच्या कामाची खोटी करून माझी भर रस्त्यावर बेअब्रू केल्याबद्दल तुझ्यावर केस चालवीन. मी कोण आहें असं तुला वाटतं ? तुझा नंबर काय ? बोल. ( टिपून घेऊं लागतो. )

२ पोलीस:—आपण कोण ? मांबुड्यांचे महाराज वाटतं ?

शाम०:—स्पष्ट सांगतों, ऐक. मी सी. आय. डी. चा इन्स्पेक्टर आहे.

पोलीस:—कोण आपण कां ?

भगवान:—रामराम ! इन्स्पेक्टरसाहेब!

शाम०:—( स्व. ) अरेच्या, हा आग्यावेताळ या वेळीं इकडेच कुठं धडपडला ! आली कंबक्तीची वेळ ! ( प्र. ) दाखवूं कां हिसा ? पोलीस, बेवकूफ, युनिफार्म उतारो. जलदी उतारो .

इन्स्पेक्टर:—( प्रवेशून ) पकडो काफरको. हातकडी डालो. ( सुंदर थरथर कांपूं लागतो. ) [ नरेंद्र प्रवेशतो. ] डॉक्टरसाहेब, हाच तो इसम ! दिसण्यांत किती सभ्य दिसतो पहा! पण अर्क आहे !

नरेंद्र:—माथेफिरू दिसतो आहे. मी घेतों त्याची हजेरी. कसं काय ? शामसुंदर,

शाम०:—कोण ? नरेंद्र ? ( पिस्तूल झाडतो. तें चुकतं. स्वतः खालीं पडतो. )

नरेंद्र:—मरायला काय धाड भरली आहे? ( शामसुंदराला उठवितो. )

इन्स्पेक्टर:—( पिस्तूल, बॅग काढून घेऊन पोलीस हातकडी घालतात.) खेंचो बदमाषको चौकीपर. डॉक्टर,

नरेंद्र:—थांबा, इन्स्पेक्टरसाहेब, जसे तुम्ही माझे सहाध्यायी आणि स्नेही आहांत त्याचप्रमाणें हा सुद्धां माझा स्नेहीच आहे. निदान मी तरी आजवर याच्याशीं निर्मल मित्रभावानेंच वागत आलों आहे. या सोडून त्याला.

इन्स्पेक्टर:—डेंजरस् मॅन ! ब्लडी व्हिलन ! डॉक्टर, या सापाला असा मोकळा सोडून कसं चालेल ?

नरेंद्र:—तो जितका दुष्ट आहे तितकाच मूर्ख आहे. आणि जगांत मूर्खांची कींवच करावी असं मला वाटतं.

इन्स्पेक्टर:—(शामसुंदरास) पाजी मनुष्या ! पहा, किती उदार मनाचे डॉक्टर आहेत ते ! केवळ त्यांच्या लोभाखातर मी तुला कायद्याच्या कचाट्यांत

पकडत नाहीं. नाहींतर हां हां म्हणतां तुला काळं पाणी दाखविलं असतं. पण याद राख, कीं यापुढं तुझ्यावर हमेशा डिटेक्टिव्हची टेहेळणी राहील.

**शाम०**:—इन्स्पेक्टरसाहेब, हॅव्ह मर्सी अपॉन मी! मला क्षमा करा. [ पाय धरूं लागतो.]

**इन्स्पेक्टर**:—यू फूल, माझ्या कशाला पायां पडतोस? केवळ या महात्म्याच्या मनाचा मोठेपणा म्हणूनच तूं आज वांचला आहेस. यांची क्षमा माग.

**शाम०**:—नरेंद्र, ( गहिंवरतो. ) ( इन्स्पेक्टराच्या सूचनेवरून पोलीस जातात. )

**नरेंद्र**:—मूर्खा, तूं व्हिलनिश नेचरचा आहेस पण व्हिलनला जी अंगची कर्तबगारी किंवा अक्कलहुषारी लागते ती मात्र तुझ्यांत नाहीं. त्यामुळं तूं वरचेवर तोंडघशीं पडलास. एखाद्या नाटककाराला तुझं पात्र रंगवितांना तें दुष्ट स्वभावाचंच रंगवावं लागेल. पण त्याच वेळीं मूर्खपणा-चीही छटा त्यांत दाखवावी लागेल. जातीचा दुष्ट, डोक्याचा ढिला, आणि मनाचा भ्याड असा तूं आहेस. तुझ्यासारखे लोक समाजांत पुष्कळ आहेत. पण अंगांत अकलेची वाण असल्यानें त्यांना आपला दुष्टपणा यशस्वी रीतीनं फैलावतां येत नाहीं. ( भगवान पुढें येतो. ) पण हा कोण? भगवान? केव्हां आलास?

**भगवान**:—मी काल रात्रींच इथं आलों. सरोजिनीबाई म्हणून कुणी डॉक्टर आहेत. त्यांनीं मला तुमची गांठ घालून देते म्हणून सांगितलं. रात्रीं मावशीबाईला मोटारीचा अपघात झाला. पण चला आतां. मागाहून सांगेन सारं.

**नरेंद्र**:—इन्स्पेक्टर साहेब, थँक यू फॉर युअर गुडनेस्—

**इन्स्पे०**:—वः खूप केलीत. डॉक्टर, चांगुलपणा तुमचा कीं माझा? तुम्ही या मोक्याला इथं होतां म्हणून हें प्रकरण इथंच मिटलं. बरं—जातो मी. ( जातो )

**नरेंद्र**:—(शामसुंदरास) पोलीसांच्या हातचा पाहुणचार चुकला, आतां माझ्या इथं प्रेमाचा पाहुणचार तुला देतों, चल.

शामराव:—नरेंद्र, हें काळें तोंड घेऊन कुठं येऊं ?

नरेंद्र:—आतां गतगोष्टींचा विचार कशाला ? लेट् दि पास्ट बेरी इट्स् डेड् ! ( जातात. )

---

## प्रवेश आठवा.

[ सरोजिनीचें मोफत रुग्णालय—मावशी खाटेवर पडली आहे. नरेंद्र, विमल, वारूताई, भगवान वगैरे पात्रें ]

सरोजिनी:—नरेंद्र, आज मला पराकाष्ठेची धन्यता वाटत आहे ! या वर्षप्रतिपदेच्या मंगल मुहूर्तावर माझ्या पवित्र लोककार्याची ही मी मुहूर्तमेढ रोंविली आहे.

नरेंद्र:—आपल्या आकांक्षांना मूर्त स्वरूप मिळाल्यावर कुणाला आनंद होणार नाहीं ?

### पद ३७

**प्रभु तोषला ! सकलां नव मोद झाला ॥ ध्रु० ॥ ज्ञाणि दे सहाया । शुभ काज प्रभुबल धरि सहजाचि तरि मनुज वरि यश-माला ॥ १ ॥**

श्रीयुत:—( प्रवेशून ) नमस्कार मंडळी ! अरेच्या, हा दवाखाना आहे वाटतं ?

सरोजिनी:—हांय. गोरगरिबासाठीं, जनताजनार्दनाच्या निरपेक्ष सेवेसाठीं मी हें मोफत रुग्णालय उघडलं आहे.

श्रीयुत:—मोफत रुग्णालय ? म्हणजे ? फ्री हॉस्पिटल ! पण पेशंट कुठं आहेत ? या मुंबईत पेशंटशिवाय डॉक्टर आणि क्लायंटशिवाय वकील पैशापासरी आहेत.

दीना:—अहो श्रीयुतराव, तुम्हीच पहिले पेशंट. तुमच्या बिघडलेल्या

मेंदूच्या विकारावर इथं मोफत इलाज करण्यांत येईल. हो, पण मेंदू असला तर बिघडायचा.

सरोजिनीः—तो पहा पेशंट. नरेंद्र, हीच ती कालची मोटारच्या अपघातानें दगावलेली म्हातारी.

नरेंद्रः—आणि त्या म्हातारीला फसवून तिच्यावर प्रसंग आणणारे राजेश्री–( शाम० येतो ) हेंच तें. शामसुंदर !

सरोजिनीः—मग ही म्हातारी कोण ?

भगवानः—या विमलाबाईच्या सासूबाई, ( शामसुंदरकडे बोट दाखवून ) या बहाद्दराची भीमा मावशी.

श्रीयुतः—( चपापून ) काय भीमामावशी ? नांवापुरतासुद्धां नाजुकपणा दिसत नाहीं या बाईत.

शाम०ः—( जवळ जाऊन ) मावशी–मावशी, मला क्षमा कर—

सरोजिनी—त्यांना आतां त्रास देऊं नका. ती बिचारी पुरती शुद्धीवर आली नाहीं अजून.

श्रीयुतः—सेन्सलेस आहे वाटतं ?

दिना०ः—तुम्हीसुद्धां सेन्सलेसच आहांत ?

श्रीयुतः—म्हणजे आम्ही बेअकली आहोंत वाटतं ?

नरेंद्रः—मावशी, मावशी, डोळे उघड.

मावशीः—हे उघडले, पुरते डोळे उघडले. पण मी इथं कुठं आलें ? मला कुणी आणलं इथं ? अगबाई, हा तर मेला साहेबाचा दवाखाना ! मला बाटविलं. प्रायश्चित घेतलं पाहिजे.

श्रीयुतः—मिळालं इतकं प्रायश्चित पुरें नाहीं झालं वाटतं ?

कांताः—हा दवाखाना साहेबाचा नाहीं. ब्राह्मणाचा आहे.

चारुताईः—या–या सरोजिनीबाईचा आहे.

मावशीः–(खोल स्वरांत विव्हळत) बाई, तुम्ही फार दयाळू दिसतां! तुमचे उपकार अखंड आहेत. त्या मांगानं मला फसविलं. तरी माझा नरेंद्र मला बजावीत होताच, कीं तो शाम्या दुष्ट आहे. माझ्या सुनेला मी छळलं–भारी

गालस गुणाची पोर. मी चांडाळणीनं तिला दूर केलं.पापाचं प्रायश्चित्त फेडते आहे. माझ्या तोंडांत मरतेवेळीं पाणी घालायलाही आतां कोणी नाहीं. देवा, देवा ! चांगला न्याय केलास. या मुंबईतच म्हणे नरेंद्र डॉक्टर झाला आहे. डॉक्टरीणबाई, मला त्याच्याकडं पोहोंचवा. माझा नरेंद्र, विमल—

**नरेंद्रः**—उभयतां सेवेला हजर आहोंत. मावशी, मला ओळखलंस कां ? मी नरेंद्र—

**मावशीः**—बाळ, तूं माझा वसंतच आहेस. मी चुकलें. मला क्षमा कर. त्या मेल्या शाम्यानं मला शेवटीं फसविलं रे. पळून गेला मेला कुठं !

**शाम०ः**—मावशी–[ पाय धरतो. ]

**मावशीः**—कोण ? शाम्या ! चल हो मेल्या दूर. तोंड दाखवूं नकोस. नरेंद्र, माझी विमल कुठं आहे ?

**विमलः**—सासुबाई, नमस्कार करतें. (नमस्कार करते)

**मावशीः**—अखंड सौभाग्यवती भव !

**श्रीयुतः**—म्हातारे ! हा आशीर्वाद कसला ? तुला म्हातारचळ लागला कीं काय ? विमलाबाई सौभाग्यवती केव्हां झाल्या बुवा !

**सरोजः**—ईश्वरी प्रेरणेनं हृदयांतून सहज उसळलेलं अंतःकरणाचे मंगल आशीर्वाद अनाठायीं कसे होतील ? बाई—

**मावशी**—मी पुर्ण शुद्धींत आहें. पण विमल, मी चाललें, माझा आतां भरंवसा धरूं नकोस. तुला आतां नरेंद्रच—!

**विमलः**—सासुबाई, दोन दिवसांत बऱ्या व्हाल.

**नरेंद ः**—मावशी, घाबरूं नकोस. उद्यां बरी करतों तुला.

**श्रीयुतः**—उद्यांपासून डोंगऱ्यांचं बालामृत सुरू केलं म्हणजे झालं.

**नरेंद्रः**—तूं आतां माझ्या जवळच रहा इथं मुंबईला हरि हरि करीत.

**सरोजिनीः**—आतां एकच इच्छा सफल व्हायची उरली आहे.

**कांताः**—होईल–होईल बरं–लौकरच होईल सफल ! सरोज, या समारंभांत तोही समारंभ होऊं दे साजरा. हं, डॉक्टर–

**सरोजिनीः**—नरेंद्र, विमल, तुमचा विवाह होऊन, विमल, तुझ्या भालप्रदेशावर समाजाच्या पद्धतीनं कुंकुमातिलक लागलेला पाहिला कीं

माझ्या आनंदाला पारावारच उरणार नाहीं. आतां मला—या राष्ट्रसंन्यासिनीला देशसेवेंत देह झिजविण्यापलीकडे कांहींच कर्तव्य उरलं नाहीं.

**कांता:**—(सरोजिनीस) म्हणजे ? हें तू म्हणतेस तरी काय !

**श्रीयुत:**—हा काय ट्रॅन्स्फरसीन झाला बुवा ! नाटकाला प्लॉट काय सुंदर आहे ! टिपून ठेवला पाहिजे. (लिहितो.)

**सरोजिनी:**—विमल, नरेंद्राविषयींच्या माझ्या शुद्ध प्रेमाची सांगता करण्यासाठीं तुझा हात त्यांच्या हातांत देऊन डोळ्यांचं पारणं फेडूं दे. विमल, तुझ्या सामुवाईच्या हृदयस्थ परमेश्वरानं या पवित्र कार्याला संमती दिलीच आहे. आणा तुमचे हात—शुभमंगल सावधान ! [ विमलेला कुंकू लावते. ]

**नानासाहेब:**—[ प्रवेशून ] शुभमंगल सावधान ! या सावधानाची गहन गंभीर गर्जना समाजाला खास सावध करील ! शाबास, सरोज, तुला मी उच्च शिक्षण दिलं त्याचं तूं चीज केलंस.

**श्रीयुत:**—नानासाहेब, किती झालं तरी आपल्यासारख्या कर्त्या सुधारकाची कन्या !

**नाना०:**—असो. आतां सर्वच प्रकार जरी चमत्कृतीपूर्ण झाला आहे तरी त्याचं पर्यवसान बोधप्रद आणि आनंददायक झालं आहे खास ! विमल आणि सरोज, [ जवळ घेऊन ] दोघींबद्दल मला सारखाच जिव्हाळा वाटत आहे. पण सरोज, तुला आपला हट्ट सोडून—

**सरोजिनी:**—नाहीं—बाबा, तसं होणार नाहीं. अविवाहित राहण्याचा माझा निश्चय कायम झाला आहे. समाजालाच संसार समजल्यावर सात्विक सुखाची सीमा सेवावृत्तीच्या समाधानांतच संपत असते मला मोहपाश असा उरलाच नाहीं.

**नाना०:**— तुझी इच्छा ! काय करायचं ?

**श्रीयुत:**—(स्वगत ) आतां भरतवाक्य म्हणायचं! (प्र.) नानासाहेब, ही विसाव्या शतकांतली सुधारणा बोलते आहे. स्त्री—स्वातंत्र्य ! स्त्री—शिक्षण ! त्यांना अशी उदात्त विचारांची वाचा फुटली आहे! रोमान्स, पोइट्री चार्म! सारं एकदम !

नानासाहेबः—सरोज, पित्याच्या हृदयाला जरी तुझा हा दुराग्रह दुःखदायक असला तरी एका देशहितेच्छु सुधारकाला एका प्रकारें समाधानकारकच आहे. नरेंद्र, सरोज, तुमच्याप्रमाणंच भावी पिढी अशीच त्यागशील, स्वार्थत्यागी निपजावी एवढीच त्या त्रैलोक्यनाथाजवळ कळकळीची प्रार्थना आहे. कारणं, विश्वबंधुत्वाच्या भावनेनं निरपक्ष सेवावृत्तीच्या पायावर उभारलेली भावी पिढीची त्यागशील वृत्ती म्हणजच सामाजिक अन्याय नष्ट करणारी समाज-सुधारणेची मूर्तिमंत सौभाग्यलक्ष्मी !

## भरतवाक्य.

**प्रभुवर ! विनवित विनत उदित हो सुविभव-नव-रवि हरो असुख-तम वरो आत्म-प्रभवा हा भारत ! ॥ ध्रु० ॥ न्याय नीति-शुभकृति पर-हित-रति प्रगति-पथिं नित उपजवी जनीं या अनुदिनिं ॥ १ ॥**

६९९

१२५

॥ श्रीलोकनाथार्पणमस्तु ॥

IRBK-0100669

समाप्त.